शनिवार । ५ डिसेंबर १९८१ । एक रुपया

माणूस

# पाटील, तुम्ही नेमके कोणाच्या बाजूने आहात ?

रविवार, ता. २९ नोव्हेंबर. पुण्यातल्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या आटोपशीर सभागृहात आज एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. १९ व २० डिसेंबरला मुंबई येथे भरणाऱ्या मराठी साहित्यसंमेलनाची पार्श्वभूमी पुणेकरांना सांगणं व पुण्यातल्या साहित्यिकांना, प्रकाशक–ग्रंथविक्रेत्यांना आणि रसिक वाचकांनाही संमेलनाला येण्याचं आवाहन करणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश.

वा. ल. कुलकर्णी, श्री. पु. भागवत, रा. भि. जोशी, जयवंत दळवी, माधव गडकरी, सुभाष भेण्डे, गं. वा. सरदार, य. दि. फडके, प्रभाकर पाध्ये, माधव मनोहर, सदानंद रेगे, मंगेश पाडगावकर, अरुण साधू, प्रा. अरुण कांबळे, सरोजिनी वैद्य, सदानंद रेगे अशी मराठी साहित्यातली सध्याची मातब्बर मंडळी हे संमेलन आयोजित करणार आहेत, असं जाहीर झाल्यापासूनच मराठी साहित्यक्षेत्रात एक नवे चैतन्य निर्माण झाले आहे. संमेलनाचे उद्देश, साहित्यिकांच्या भूमिका, त्यांचा पूर्वेतिहास, त्यांची कुवत, शासनाचा वाढता हस्तक्षेप, साहित्य महामंडळाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा लाचारीपणा अशा विविध मुद्द्यांवरून वातावरण अगदी ढवळून निघत आहे. समज–गैरसमज, आरोप–प्रत्यारोप, टीका–टिप्पणी यांच्या फैरी झडताहेत. त्यामुळेच पुण्यातल्या या मेळाव्याला चांगलीच गर्दी उसळली होती. श्री. प्रभाकर पाध्ये मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते व डॉ. विद्याधर पुंडलीक, डॉ. भालचंद्र फडके व 'मुंबई सकाळ'चे संपादक माधवराव गडकरी यांची भाषणे होणार होती.

सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशीच मुंबईच्या या स्वतंत्र साहित्यसंमेलनाची उद्दिष्टे स्पष्ट करणारे पत्रक दिले जात होते. पत्रकात म्हटले होते–

अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे मोठ्या प्रमाणावर सरकारीकरण झालं. मंत्र्यांची व्यासपीठावरील उपस्थिती नुसती वाढली नाही तर त्यांची दडपणेही वाढली. मुंबईत भरणाऱ्या व्यासपीठावर एकही मंत्री असणार नाही, हे या संमेलनाचे पहिले वैशिष्ट्य राहील ! पूर्वी मंत्री चालत होते, आता चालेनासे झाले अशी टीका करणाऱ्यांना इतकेच सांगता येईल की, यापुढे तरी मंत्र्यांशिवाय व सरकारी मदतीशिवाय साहित्यसंमेलने भरावीत, हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचा प्रयत्न हे साहित्य संमेलन करणार आहे......सर्व तऱ्हेच्या राजकीय दडपणापासून मुक्त असे हे संमेलन असेल !

याचबरोबर, संमेलनात भाग घेणारे साहित्यिक स्वखर्चाने संमेलनाला येणार असल्याचे संमेलनाच्या जमा–खर्चावर नियंत्रण ठेवले जाणार असल्याचे व संमेलनाचे स्वागत-सदस्य आणि प्रतिनिधी यांच्यापुरतेच हे संमेलन मर्यादित असल्याचे या पत्रकात जाहीर करण्यात आले होते.

पत्रक वाचत वाचतच स्थानापन्न झालो. मेळाव्याचे अध्यक्ष श्री. पाध्ये यांनी आपल्या प्रास्ताविकात साहित्यामध्ये शासनाचा हस्तक्षेप अमान्य असणाऱ्या साहित्यिकांचे हे संमेलन आहे, असे स्पष्ट करून या कल्पनेचे स्वागत केले.

त्यानंतर डॉ. पुंडलिक यांनी साहित्यिकांची कमी झालेली विश्वासार्हता पुन्हा मिळवण्याच्या दृष्टीने हे संमेलन उपयुक्त होऊ शकेल, असे मत व्यक्त केले.

डॉ. पुंडलिक यांच्या भाषणानंतर 'सोबत'चे संपादक ग. वा. बेहेरे यांनी बोलावे, अशी काही श्रोत्यांनी मागणी केल्याने श्री. बेहेरे यांना भाषण करण्यास सांगण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणात साहित्यसंमेलन आज ज्या पातळीला गेले आहे त्याला शासन जबाबदार नसून साहित्यसंस्था जबाबदार आहेत, असा आरोप केला व मुंबईला आणखी एक संमेलन भरवण्यापेक्षा रायपूरला चला व तिथे तुमचा निषेध व्यक्त करा, असे आवाहन केले

श्री. बेहेऱ्यांनंतर डॉ. फडके यांचे भाषण झाले. अकोल्याच्या साहित्यसंमेलनात घडलेल्या काही अपमानास्पद प्रकारांची आठवण देऊन डॉ. फडके यांनी मुंबई साहित्यसंमेलनाला पाठिंबा व्यक्त केला.

संमेलनाचे निमंत्रक माधवराव गडकरी →

यांनी आपल्या भाषणात आधीच्या वक्त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा,प्रश्नांचाव्यवस्थित परामर्ष घेतला. तसेच मुख्यमंत्री अंतुले यांनी मुंबईच्या साहित्य संमेलनाला पाठिंबा देणारे जे पत्रक काढले त्यामागे ग. वा. बेहेरे यांचा 'हात' असल्याची माहिती देऊन गडकरींनी सभागृहात चांगलीच खळबळ उडवून दिली. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्यिकांचीच कसोटी लागणार आहे, याची जाणीव त्यानी दिली व संमेलनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन केले.

शेवटी श्री. पाध्ये मेळाव्याचा समारोप करण्यासाठी उभे राहिले व त्यांनी बेहेऱ्यांवर टीकेची तोफ डागली. बेहेरे प्रेक्षकांत बसूनच पाध्यांशी वाद घालू लागले. 'मॅजेस्टिक' चे केशवराव कोठावळेही बेहेऱ्यांच्या बाजूने पाध्यांशी भांडायला लागले. एवढ्यात श्री. पु. गोखल्यानीही 'तुम्ही सागितलेले बंधन तुम्हीच स्वत: पाळत नाही' असे सांगून अध्यक्षांचा निषेध केला. थोडक्यात म्हणजे, या मंडळीना साहित्यसंमेलनाच्या उद्दिष्टांबद्दल फारशी आस्था वाटत नसावी, असे त्यांच्या बोलण्यावरून वाटत होते. रविवारची संध्याकाळ अनेकजण टी. व्ही. समोर घालवतात, अनेकजण रस्त्यावर हिंडत घालवतात, तशी ही मंडळी या मेळाव्याला आली असावीत असे त्यांच्या बोलण्या-वागण्यावरून वाटत होते असो.

मेळाव्यातील वक्त्यांनी गेल्या काही वर्षांत साहित्यक्षेत्रात ज्या घटना घडल्या त्याचा आढावा घेऊन या चुका सुधारण्यासाठी स्वतंत्र साहित्यसमेलनाची आवश्यकता प्रतिपादन केली. सध्याच्या काही साहित्यिकांचा बोटचेपेपणा, संधिसाधूपणा, लाचारी हे दुर्गुण मान्य करून ते नष्ट झाले पाहिजेत, असेही बजावले. त्याच दृष्टीने हे संमेलन म्हणजे साहित्यिकांचीच कसोटी आहे, हे श्री. गडकरींचे विधान फार महत्त्वपूर्ण होते.

मुंबईच्या या संमेलनाला विरोध करणाऱ्या किंवा त्यावर टीका करणाऱ्या विद्वानांचा मुख्य मुद्दा असा दिसतो की, आयोजकांपैकी किती तरी जणांनी सर्व सरकारी मानमरातब पुरेपूर उपभोगले आहेत आणि आता नंतर ते सरकारविरुद्ध दंड थोपटून बंडखोरीचा आव आणत आहेत. या आरोपाच्या पुष्टीदाखल प्रत्येकाबद्दल स्वतःला माहीत असलेली, ऐकिवात असलेली काही उदाहरणेही पुढे टाकली जात आहेत. क्षणभर असे गृहीत धरू की, ही सर्व माणसे अक्षरश: तशीच आहेत; पण मग तर असे म्हणावे लागेल की, अरे, याचे जास्तच कौतुक केले पाहिजे. कारण कधी नव्हे ती ही मंडळी विरोधात उभी ठाकत आहेत. यांना आणखी ताकद दिली पाहिजे. जी माणसे पूर्वीपासूनच शासकीय हस्तक्षेपाला विरोध करत आली आहेत त्याचे तर जास्तच कौतुक केले पाहिजे. कारण त्याच्या विचारात आणि वर्तनात सुसंगती व सातत्य आहे. म्हणजेच, पूर्वी कमरेत वाकलेले पण आता ताठ झालेले आणि पहिल्यापासून ताठच असलेले अशा दोन्ही गटाचे या संमेलनाच्या निमित्ताने स्वागत केले पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

अशा स्वरूपाचे संमेलन दरवर्षी भरवण्याचा मानस असल्याचे श्री. गडकरींनी सांगितले. हे खरोखरच होईल का, याचा खल विद्वानांनी करत बसावे; पण सध्या इतरांनी तरी या पहिल्या पावलाचे मनमोकळे स्वागत करायला काय हरकत आहे?

अर्थात हे करत असताना कोणीही गावच्या पाटलाची भूमिका घेऊन वावरू नये! आपले जे काही प्रिय–अप्रिय मत असेल ते स्पष्टपणे सागावे व मोकळे व्हावे. गावच्या पाटलाची भूमिका म्हणजे अशी–एकदा एका गावात एका वाघाने फार धुमाकूळ घातला. शेळ्या–बकऱ्या व गुरे पळवणाऱ्या या वाघाची उडी एक दिवस माणसावरही गेली आणि गावचा पाटील सरपटला. त्याने जिल्ह्याच्या ठिकाणी राहणाऱ्या एका शिकाऱ्याला धरून आणले. वाघाने जिथे हल्ले केले ती सर्व ठिकाणे त्या शिकाऱ्याने स्वत: हिंडून पाहली आणि तो पाटलाला म्हणाला, 'पाटील तो समोरचा कातळ दिसतो ना, त्या कातळाच्या आडोशाने मी बसतो. म्हणजे वाघ समोर दिसला रे दिसला की, मला त्याला लगेच गोळी घालता येईल!'

तेव्हा पाटील म्हणाला, '–पण शिकारी दादा, वाघ जर तुमच्यामागून कातळावरच आला तर?'

'असे म्हणता? मग आपण एक बोकड त्या कातळापाशी बांधून ठेवला आणि मी समोर मचाणावर चढून बसलो तर?'

'अहो दादा, तुम्ही येडे की खुळे? त्या बोकडापेक्षा वाघाला तुमचाच वास आधी येणार आणि मग तो डायरेक्ट मचाणावरच येणार!'

'बरे. मग समोरच्या त्या पडक्या घरात जाऊन त्याच्या खिडकीतून नळी बाहेर काढून बसलो तर?'

'अहो, पण त्या पडक्या घराला मागलं दार आहे. वाघ त्या दारातूनच आत शिरला तर?'

अशीच प्रश्नोत्तरे आणखी काही काळ चालल्यावर शिकाऱ्याची सहनशीलता संपली आणि तो पाटलावर खेकसून म्हणाला–

'पाटील, तुम्ही नेमके कोणाच्या बाजूने आहात, ते आधी सांगा बघू! माझ्या की वाघाच्या?'

मुंबईच्या साहित्यसंमेलनात भाग घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकालाच इथून पुढे हे करावे लागेल.

–सतीश कामत


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे
अंक : सत्ताविसावा
५ डिसेंबर १९८१
किमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

## मुंबई वार्ता

# मुंबईचं कलकत्ता व्हायला सुरुवात झाली आहे !

नोव्हेंबर महिन्याची सुरुवात. चार दिवसांची 'मनाला कसली ना चिंता' वाली दिवाळी उरकून कामाधामाचे मुंबईकर चाकऱ्यांत रुजू व्हायला निघाले आणि पहिल्याच दिवशी संपाचा 'बेस्ट' पैकी फटका मिळाला ! दोन कर्मचाऱ्यांच्या बडतर्फीच्या निषेधार्थ अचानक सुरू झालेला संप. ठिकठिकाणी आळसावून मठ्ठपणे पडून राहिलेल्या बसेस निर्बुद्ध दिसणाऱ्या आणि रिकाम्या. नंतर मग मुंबईकरांनाही संप-प्रकाराची सवय झाली आणि ती आजतागायत टिकून आहे. सेन्ट्रल रेल्वे म्हणजे तिला जाता-येता सर्दी-पडसं व्हायचंच, तसं बेस्ट म्हणजे अशी हटून बसायचीच, हे मुळी आता गृहीतच आहे. स्टॉपवर दहा-पंधरा मिनिटं थाबूनही बस आली नाही, तर संप सुरू झाला असेल असं म्हणून माणसं समजूतदारपणे दुसऱ्या तजविजीला लागतात !

या संप-प्रकरणातली एक महत्त्वाची व्यक्ती म्हणजे नगरसेविका श्रीमती अलका देसाई. त्यांच्या तक्रारीमुळेच शिस्तभंग-कारवाई, चौकशी इत्यादीनंतर दोघा कर्मचाऱ्यांना बडतर्फ केलं गेलं होतं. तेव्हा अलका देसाईंना भेटण्याचं ठरवलं.

अलका देसाई गेली दहा वर्षं नगरसेविका आहेत. विक्रोळी-कन्नमवारनगर हा त्यांचा मतदारसंघ.

'नेमका प्रसंग काय घडला ?' मी त्याना विचारलं.

'८ मेची गोष्ट. कन्नमवारनगरमधून विक्रोळी रेल्वेस्टेशनला जाणाऱ्या ३९४ नंबरच्या बसनं मी माझ्या शाळेत निघाले होते. वेळ दुपारची. बसला गर्दी पुष्कळ होती. माझ्याही हातात पुस्तकाचं बरंच ओझं होतं. तिकीट विचारत कंडक्टर माझ्याकडे आला, तेव्हा मी म्हटलं, माझ्याकडे पास आहे. 'अहो, पास काय,पालिका झाडूवाल्याला पण देते !'कंडक्टरसाहेबांनी मुक्ताफळं उधळली.' बरोबर, जेव्हा सौजन्यसप्ताह सुरू नसतो, तेव्हा असौजन्य पाळायला नको ?

'सामंत कंडक्टरची ही पहिली मुलाखत. बसमधल्या लोकांनी मी नगरसेविका असल्याचं त्याला सांगितलं. वाद नको म्हणून मी पासही काढून दाखवला; पण तरीही त्याचं समाधान होईना आणि तोंडाचा पट्टा बंद होईना. त्याची अर्वाच्य शिव्यागाळ चालूच राहिली. मला उतरता येऊ नये म्हणून माझ्या स्टॉपला बस न थांबवण्याचा पोरकटपणाही त्यानं करून पाहिला !

'त्यानंतर २३ मेला परत याच सद्गृहस्थाची भेट झाली. 'अंधेरी रेल्वेस्टेशन' अशी चुकीची पाटी असलेल्या ३९४ नंबरच्या बसमध्ये मी आणि दोन लेकुरवाळ्या प्रौढ स्त्रिया पाटी पाहून चढल्या. त्यांनी अंधेरीचं तिकिट मागितलं तेव्हा सामंतांचा तोफखाना त्यांच्यावर धडाडू लागला. पाटी वाचून बसमध्ये चढायला काय होतं ? चला उतरा अगोदर खाली !'

'अहो, पण त्या पाटी वाचूनच चढल्या आहेत.'

'ते काम माझं नाही. पाटीकडे बघायचं काम वरच्या डेकच्या कंडक्टरचं आहे !' गुर्मीत उत्तर आलं.

'शेवटच्या स्टॉपला बस पोचली तेव्हा प्रकरण अधिक बिघडलं. सामंत आणि त्याच्या साथीदारांनी मला पोलिसात नेण्याची, बंद करण्याची वगैरे धमकी दिली. शिव्या, असभ्यपणा, अशिष्टपणा हे तर चालूच होतं. बाकीची माणसं चिडून त्यांना मारायला धावली; पण सरकारी पोषाखातल्या माणसाला धक्का लागला तर त्याचे परिणाम किती भयंकर होतात हे मला चांगलं माहीत आहे. लोकांच्या हाता-पाया पडून मी त्यांना काही वेडंवाकडं न करण्याची विनवणी केली. यानतर तिथल्या ड्रायव्हर्स-कंडक्टरनी माझ्या भोवती घेराव घातला, माझ्या मर्जीविरुद्ध मला बसमध्ये चढवलं आणि बस विक्रोळी-पोलिसस्टेशनवर नेली. बरोबरचे बरेच लोक मग त्या बसमध्ये चढले. पोलिसस्टेशनवर मी घडलेली हकिकत सांगितली. लोकांनी माझ्या बाजूने साक्ष दिली. नंतर माझ्या ऑफिसमध्ये येऊन बेस्टकडे मी रीतसर तक्रार नोंदवली.

'यानंतर मी १८ मेला मुंबईबाहेर गेले आणि एक महिन्यानं परत आले. तेव्हा या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग-कारवाईसंबधात चौकशी चालू होती, तिथे मला बोलवण्यात आलं. तीन दिवस चाललेल्या या चौकशीला मला दररोज बेस्टच्या सिक्रेटिव्ह व्हॅननं नेलं-आणलं जाई आणि तरीही व्हॅनच्या मागे माझ्या मुर्दाबादच्या घोषणा देत एखादी बस येत असे. इन्क्वायरी चालू असताना आणि नंतर कागदाचे बोळे, धमक्या, अर्वाच्य बडबड हेही चालूच असे. चौकशी पूर्ण होऊन या कर्मचाऱ्याना बडतर्फ केलं गेलं, अर्थात बेस्टनं काय करावं, हा त्यांचा अंतर्गत मामला आहे. त्यानंतर '१० मर्यादित' बस तिचा मार्ग वळवून माझ्या घराकडे आणण्यात आली, आणि पुन्हा एकदा अशिष्ट निषेध-प्रदर्शनं झाली.'

—अलका देसाईंची गोष्ट ही अशी आहे, विशेष असं की, बेस्टकडे त्यानी केलेली ही पहिलीच तक्रार!

दुसरं वैशिष्ट्य असं की, दहा वर्षांच्या आपल्या पालिकेमधल्या कारकिर्दीत बडतर्फ वाहक-चालकांना परत कामावर घेण्यासाठी खटपट करणाऱ्या नगरसेविका म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

त्यांचा जन्म कामगार घरातला. आणि १९७२ साली कामगार-तंटा, दंगल वगैरे प्रकारात सक्रिय सहभाग असल्याबद्दल गोदरेजमधली त्यांची नोकरीही गेलेली. म्हणजे कामगार-चळवळीच्याच परंपरेतली त्यांची घडण आहे.

बेस्टचा संप चालूच राहिला आणि बडतर्फ कामगाराना परत घेतलं तेव्हाच तो संपुष्टात आला (पण नतर '१० मर्यादित'चा मार्ग बदलून रहदारीचे नियम मोडल्याबद्दल त्याना परत बडतर्फ केल्याचं ऐकिवात आहे) हा सगळा प्रकार एकूणच प्रातिनिधिक आहे.

एखादी स्त्री नगरसेविका आहे आणि सामान्य नागरिकापेक्षा तिच्या हाती काही

जास्त तोकंद आहे, हे कळूनही ही युनिफॉर्मवाली माणसं असं वागतात, तर सर्वसामान्य नागरिकांशी ती केवढ्या औद्धत्यानं वागत असतील ? एवढ्या अरेरावीची धमक कुठून आली ? कशी आली ? प्रवाशांची तेवढी कर्तव्यं, आपल्याला मात्र फक्त अधिकार. आपण बस चालवतो म्हणजे लोकांवर उपकार करतो—हा उद्दामपणा कसा आला ? या प्रकारात बोलविता धनी कोणी वेगळाच आहे, हे तर उघडच आहे. ज्या प्रकारे हा संप हट्टीपणाने चालूच राहिला त्यावरूनही हे स्पष्ट होतं. कुठेही जा, काउंटरमागचा माणूस, किंवा खुर्चीतला माणूस तुमची उपेक्षा करेल, आणि काम करायचंच तर ते उपकार केल्याच्या आविर्भावात करेल, हा काही फारसा दुर्मिळ अनुभव नव्हे. कामचुकारपणा आणि तुसडेपणा हे आपले राष्ट्रीय गुण तर आहेतच. पण संघटना, एकी अशा गोष्टीचं बळ या लोकांच्या डोक्यात हल्ली भलतीकडे चढलं आहे. संघटनेच्या बळावर निरुपद्रवी कबुतरं पारध्याच्या जाळ्यासकट उडाल्याची गोष्ट आता जुनी झाली म्हणायची. नव्या इसापनीतीत गोष्टी येतील त्या संघटनेच्या जोरावर हात बळकट झालेल्या दादाच्या आणि त्यांच्या गुंडगिरीच्या. यांवरून बिथरून युनियनच्या नावानं मुर्दाबाद म्हणण्याची आवश्यकता नाही. बेस्टच्या अधिकृत युनियनचा या संपाला पाठिंबा नव्हता, हे स्वागतार्हच आहे पण भांडवलदारशाहीच्या तोडीस तोड म्हणून कामगारशाही आणि झुंडशाहीच माजवायला हवी, हे लोकशाहीचं विकृतीकरणच झालं.

झुंडशाहीच्या या उद्दाम प्रवाहाला बांध घालण्याचं धैर्य राजकारण्यात नाही. आणि त्यांची तशी इच्छाही नाही. उलट या वाहत्या गंगेत हात धुवून पुण्य मिळालं तर पहावं. याचा जळजळीत प्रत्यय या संप-प्रकरणी आला. सांदी-कोपऱ्यात पडलेल्या कामगार-नेत्यांना उजाळा मिळाला. या दगडावर घासून लोकप्रियता चांगली चकचकीत करून घेता आली. पक्षांध आणि वैयक्तिक स्वार्थासाठी उरल्या—सुरल्या सामाजिक आणि नैतिक मूल्याचा बळी देणारे हे बोलून-चालून भोंदू आणि भाडोत्री नेते. प्रश्न आहे तो एवढाच की, कुंपणच असं शेत खायला लागलं तर सामान्य माणसानं बघावं कुणाकडे ? राजकीय पुढाऱ्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षा आणि कामगारांची हुकुमशाही यांची ही अनिष्ट युती आहे. राहू-केतूची ही जोडी भविष्यात काय काय भीषण उत्पात घडवून आणील याची कल्पनाच करवत नाही. संप, निषेध, मोर्चे, टाळेबंदी या साऱ्या गदारोळात अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थाही कुठे तरीच भटकटत निघाली आहे.

ग्रहणाचे वेध तर लागलेच आहेत. 'मुबईचा कलकत्ता होणार नाही, होऊ देणार नाही;' अशा कागदी वाघांच्या डरकाळ्या तर अनेक ऐकल्या, पण गेल्या काही महिन्यांत उत्स्फूर्त ऑन–द–स्पॉट संप, निषेध, आंदोलनं नित्याचीच झाली आहेत, पाण्यावरून झालेली दोन आंदोलनं—एक गिरणाववाल्यांचं, एक दादर-परेळ या भागातलं. बेस्टचा हा तडकाफडकी सप, संपाच्या काठावर उभे असलेले गिरणी-कामगार. वाढता असंतोष आणि कायदा, 'प्रॉपर चॅनल' इत्यादीवरचा वाढता अविश्वास; आपल्या मागण्यांसाठी तात्काळ रस्त्यावर येण्याची वृत्ती, छोटयाशा गोष्टीनीही तळापासून ढवळून निघणारं समाजजीवन; ही सारी कसली लक्षणं आहेत? मुबईचं कलकत्ता व्हायला खरोखरच सुरुवात झाली आहे, अशी रास्त भीती आता मनात घर करू लागली आहे.

— ललिता बर्वे

---

# बांगलादेश
## अवामी लीगचा पराभव का ?

वा. दा. रानडे

---

बांगलादेशच्या अध्यक्षीय निवडणुकीत अवामी लीगचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर पराभव अनपेक्षित होता अवामी लीगच्या नेत्यांना तर तो अनपेक्षित वाटलाच; पण बागलादेश घडमोडीच्या राजकीय निरीक्षकांनाही त्याबद्दल आश्चर्य वाटले. अवामी लीगच्या सभाना हजारो लोकाची गर्दी होत होती. त्यामानाने सत्तारूढ बागलादेश नॅशनल पार्टीचे सभांना कमी गर्दी असे. मग निकाल एवढा उलटा–पालटा कसा झाला ?

लोकमताचा कल कोणीकडे आहे यासंबंधी सरकारने जे गुप्त अहवाल मागविले होते त्यांचा कौलही सत्तार यांच्याविरुद्ध होता. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात नॅशनल सिक्युरिटी इंटेलेजन्स या नागरी आणि दि डिरेक्टोरेट ऑफ दि फोर्सेस इंटेलेजन्स या लष्करी गुप्तहेर विभागांनी आपले अंदाज सत्तार यांच्याकडे व लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल एच. एम. एर्शाद याच्याकडे पाठविले होते. त्यात अवामी लीगचे उमेदवारास यशाचा अधिक संभव आहे असे म्हटले होते.

अवामी लीगचे डॉ. कमाल हुसेन विजयी झाले तर आपल्याला काही भवितव्य नाही हे ओळखून सत्तारूढ बांगलादेश नॅशनल पार्टीच्या पाच प्रमुख नेत्यांनी देश सोडून जाण्याचेही ठरविले होते. पंतप्रधान शहा अझिझुर रहमान, उपपंतप्रधान जमालुद्दिन, नागरी पुरवठामंत्री ओबेदुर रहमान, बांगला देश नॅशनल पार्टीचे सरचिटणीस डॉ. सय्यद बद्रुद्झा आणि पक्षाचे दुसरे एक नेते ढाक्याचे महापौर अबुल हशनत या पाच नेत्यांनी हा बेत आखला होता. बागलादेश विमान व ब्रिटिश एअरवेजची १६ नोव्हेंबरची लडनची तिकिटेही त्यानी राखून ठेवलेली होती. अवामी लीगच्या हाती सत्ता आल्यास आपले भवितव्य सुरक्षित नाही असे त्यांना वाटावे अशीच त्यांची कारकीर्द आहे. पंतप्रधान शहा अझिझुर रहमान, उपपंतप्रधान जमालुद्दिन आणि ढाक्याचे महापौर अबुल हशनत यांनी १९७१ मधील बांगलादेश स्वातंत्र्यलढ्यात पाक राजवटीशी सहकार्य केले होते. नागरी पुरवठामंत्री ओबेदुर रहमान पूर्वी अवामी लीगचे कार्यकर्ते असले तरी १९७५ मध्ये शेख मुजीबुर रहमान यांच्या खुनाशी त्यांचा संबंध होता. तसेच गेल्या मेमध्ये झालेल्या अध्यक्ष झिया उर रहमान याच्या संबंधातही त्यांचा संशय घेतला जातो. अवामी लीगने निवडणूक जिंकली तर शेख मुजीब आणि झिया उर रहमान यांच्या खुनांची चौकशी केली जाईल असे त्या पक्षाच्या अध्यक्ष मुजीबकन्या हसीना वाजेद यांनी जाहीर केले होते, हेही या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. आपण नव्या सरकारच्या हाती सापडायलाच नको म्हणूनच देश सोडण्याचा बेत या नेत्यानी आखला होता.

मलपृष्ठ २ वर

# □ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (विजयादशमी १९८१)

यशवंत मनोहर

तू गेल्यानंतरची पंचवीस वर्षे
उन्हाळा
तुझ्या आठवणी कवटाळून भिजलेले दु:ख
आज दीक्षाभूमीवर अफाट एकत्र
तुझ्या भेटसुखासाठी लाटावून
उन्हात सावलीत
कुठे रुख्यासुक्या रोटघाचे सुग्रास
तुझ्या आठवणीच्या झिम्म्यात झालेले
चालते फिरते दु:ख
मुके मुके कंठात कुंठीत दु:ख
कणाकणाला आरसा
आणि काळाला पारदर्शक करून नितळ
तुला पाहणारे
वाऱ्यातील शब्द सदेह त्याच्याशी बोलत
आणि आकृतीच्या रेषा तुझ्या मिटत उमलत
प्रत्येकाच्या नजरेत उनसावल्यांची नक्षत्रे
प्रत्येकाजवळ
प्रत्येकापासून दूर स्वतंत्र स्वतंत्र तू
आणि त्यांचे अस्तित्व दीक्षाभूमीवर चांदणे
¤

...आणि माझ्या डोळ्यात पंचवीस पावसाळे हाहा:कार
उध्वस्त जाणिवेने पेटवून दिलेला
बेबीचा देठ
समग्र दीक्षाभूमी सर्वत्र स्फुंदून स्फुंदून
रडणारा हलकल्लोळ
आक्रंदणारे धाय मोकलून
अनाथालय
क्षणातच ओघळून पौर्णिमा तमोत्सव.
बेवारस
एक अथांग शोकभूमी दीक्षाभूमी तुझ्याखातर
एक विराट जाझ
आणि माझे हृदय
रक्त–चिध्या अवकाशभर
एक महाहंबरडा ओथंबून अंतराळ
आणि आसवांनी कोरलेले नाव अवकाशभर तुझे
सूर्याबदली
¤

...मी कुठल्याही क्षणी बांध उध्वस्त
हंबरडा झालो असतो होऊन
पण मी वावरलो छातीतून सरकणारी वादळे
वर, दडवीत काळजाखाली
कंठापर्यंत थडकलेली कुंठा
उत्कंठा परतवीत
या सागरातून चालताना उरावरील
पहाड जराही केला नाही दूर
ऊर भिरभिरत अतीव कोवळ्या व्याकूळ काळजाने
चिध्या आकंठून कधीही असते झाले काळीज
तरी पंख पिसारून डवरलेला मेघमल्हार शिरावर
चिवचिवणारी पाखरे
माझे शब्द तुझ्या अंगाखाद्यावर
भूकबळी नजर माझी पोरकी
दाणे टिपीत आठवणीवर तुझ्या
आणि मी स्वत:ला कोंडून घेतले खिन्न एकान्तात
भरतीचे सुन्दर अलकार झालेल्या
सागरसमारंभात
तू सागर आणि हे अफाट अफाट उसळते लाटावास्तव
तुझ्याखातर
तुझ्याखातर ही सर्वभिन्न स्वतंत्र पौर्णिमा
¤

तुझ्या सागर अफाट अफाट पोरांचा
आणि आपादमस्तक पावसाळ्यांची गर्दी मी
आज केवळच तू महासूर्य त्याच्या घराउरात
आणि विश्वात सर्वांत मोठ्या कुटुंबाचा पिता तू
इथे मरतात सगळेच
पण मरणच सर्वस्वी मरून गेले आहे ज्याचे
असा तू एक अखंड वृद्धिशालिनी जिवंतता
बाईशी केल्याचा लग्नपरिणाम
किंवा दोन शरिरांनी क्षणभर केलेल्या
रक्तगोष्टीची फलश्रुती
म्हणून अब्जावधींना इथे बापपण
त्याशिवाय काही न करताही फुकट पदवीसारखे
मिळते.
दोन बल्ल्यांवर टांगलेल्या बापपणासाठी
तू असतेस धरले आयुष्य वेठीला
तर नवरावायकोच्या जोडप्यांनी एकाच वेळी
त्यांच्या मायबापानी एकाच वेळी
त्यांच्या मुलामुलींनी आजोबा–आजीनी एकाच वेळी
माम्या–काक्यांनी चुलत्या–पुतण्यांनी एकाच वेळी
सगळ्या सगळ्यांनी एकाच वेळी
तुला बाप म्हटले नसते
हे तुझे जगावेगळे बापपण दारूला कळणार नाही
लुटारूला कळणार नाही
दैन्याच्या अज्ञान–माडवलावर
आपल्या नेतृत्वाचे अखंड पीक घेणाऱ्या

मापिकांना कळणार नाही
आयुष्याचा घाऊक बाजार करणाऱ्या कुणा
मान्या-गोम्याला कळणार नाही
¤

तू फुललास डौलदार ज्वालांनी तुझ्यासारखा
दिमाखदार अहंकारी वणव्यासारखा
आणि भोवतीच्या दैन्य–दुःखाचे आक्रंदन कवटाळून
तू रडलालही हळव्या आईसारखा
¤

दीक्षाभूमी :
आणि माझ्या डोळ्यांत पंचवीस पावसाळे हाहाःकार
छातीत गळ्यात अवघडून पहाड जगभरचे
प्रत्येकच क्षण उधाण गर्दी तुझ्याखातर
तुझ्याखातर भरती कणाकणाला कामनांची
तुझ्या नावाला फुटलेले लक्षलक्ष हात
आणि हे लाटांचे अंतराळ तुझ्या हातात
असंख्यता आणि अफाटता
उत्कंठा आणि उत्कटता
आणि पुराव्यासहित केलेला जगातील सकल
परमात्म्यांचा पराभव हा
¤

पंचवीस वर्षांपूर्वी अध्यात्माची कबर बांधून
ठेवलास मजबूत बुद्धाचा पहारा वर
तुला झाले ते शक्य
तुझ्या प्रतिभेची वाट पहात शतकांची प्रेतयात्रा
तू होतास शेवटच्या चिखलाचा आवाज
शेवटच्या काळोख्या झोपडीचा स्वप्नाशय तशी
*धग तुझ्या काळजाला*
आणि शेवटच्या सांगाड्यांच्या हाडांनी
तुझ्या उन्हात सावली केलेली
तुझ्या हृदयाचे एरियल ताणलेले
समग्र बहिष्कृत भारताच्या सीमांवर
नरकात करपलेल्या अंकुरांना तू युद्धलिपी पढवलीस
आणि स्वप्नात बांधून एक स्वप्नसंहिता
स्वप्ने दिलीस तोडलेल्या हातात
तू शिकविलास स्वप्ननिषेध दु:खाला साक्षात
दु:खक्षरे शोधणाऱ्या नजरांचे वाटप तुझ्या शब्दात
दिलीस मुठी आवळणारी मनगटे हातांना
निधडी मस्तके धडांना
आणि सटीप शक्तीसाहित्य पीडांना
तुझ्या हुंकाराने आयुष्ये संवेदना झाली
झाली एकेका हाकेने दऱ्याखोरी युद्धसज्ज
आणि तुझी भाषणे निशाणे.
¤

त्याही वेळी तू पहात होतास
की सुटतो किती मुक्काम
दिसत माणसे कपडे बदलताना, टोप्या बदलताना
पण माणूस बदलतो आहे काय हे तू पहात होतास
हा रुसलेल्या जातीमध्ये फसलेला मुलूख
किडे वळवळत छान दस्तूरखुद्दच्या नरकात
शतके बदलली दृश्ये बदलली नाहीत
मिळून अखंड शतकात एकच
दिवस गेले दिवस आले
मिळून अखंड रात्रता एकच
तू पहात होतास जातिलीलामृत
आणि तपशिलाचा खुळा अतर्क्य पसारा
मरणाहून पल्याडची प्यारी ओझी
तू पहात होतास उत्तरांनीच क्रियेट केलेले
जीवघेणे प्रॉब्लेम्स
उत्तरेच झालेली अवघड प्रश्न
एका बाजूनं प्रश्नांना नाही उत्तरे
मिळून प्रश्न बेवारस
दुसऱ्या बाजूने शतकांनी काढलेली उत्तरे
स्वतंत्रपणे वास्तवाच्या उरावर बसलेली
तू पहात होतास एका अशक्यातून
दुसरे अशक्य कसे शक्य होते ते
¤

आणि अजून आसवांचे संमेलन भरत नाही
डोळ्याची कुळे विस्मरून
जंगले येत नाहीत उफाळून हातांची
मुठीतील जन्मकथा दफन करून
...*तेव्हाही हा प्रश्न उत्तराच्या थडग्यावर* होता पहारेकरी
आजही प्रश्न बदलत नाही चाल
दल बदलतात माणसे
दलदल निर्माण करतात माणसे
आणि माणसे बदलत नाहीत
मिळून कायम अखंड कुरूपता
कठीण आहे हिंदी महासागर अथाग
त्याची स्तोत्रसंपत्ती
प्रदीर्घ त्याची भक्तियात्रता
¤

तू गेल्यावरची ही पंचवीस वर्षे
उन्हाळा
दीक्षाभूमीवर अफाट लाटावून
आणि माझ्या डोळ्यांत पंचवीस पावसाळे
हाहाःकार हाहाःकार

## उत्तरमीमांसा : २९ :

स. शि. भावे

# आंबेडकरवादाच्या दुर्दैवी पराभवाचा अन्वयार्थ

उद्या सहा डिसेंबर. भारताचे महान सुपुत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महानिर्वाणदिन.

बाबासाहेबांच्या महान कार्याचे आज सहजच स्मरण होते आणि त्याचबरोबर असा प्रश्न जाणवतो की, त्यांच्या कार्याच्या बाबतीत आज आपणा साऱ्या भारतीयांची मान कितपत ताठ आहे ?

स्वतंत्र भारताला सार्वभौम प्रजासत्ताक करणारी घटना बाबासाहेबांनी तयार केली. घटना तयार करताना सवलती आणि राखीव जागा याना बाबासाहेबांचा विरोध होता. वाटाघाटीत त्यांनी विरोध मागे घेतला. परंतु सवलतीना फक्त दहा वर्षांची कालमर्यादा ठरवून दिली. सवलतींची गरज उरू नये म्हणून सवलती द्यायच्या असतात. दहा वर्षांनंतर सवलतीची गरज संपेल ही दृष्टी या कालमर्यादेमागे होती.

पण झाले आहे काय ? तर एकोणिससे-साठ, सत्तर, ऐंशी अशी मुदतवाढ सवलतीना मिळत गेली आणि सवलतीची गरज मात्र न संपता कायम राहिली.

'अस्पृश्यता' ही विकृत वस्तुस्थिती कायमची संपावी, म्हणून बाबासाहेबानी हिंदू धर्म सोडला आणि बौद्ध धर्मात प्रवेश केला. पण 'अस्पृश्यता' ही वस्तुस्थिती आजही कायम आहे. अस्पृश्य मानल्या जाणाऱ्याचे हाल आणि शोषण आज जसेच्या तसे आहे. सवलती आणि राखीव जागा यानी अस्पृश्य हे सवर्णांच्या मत्सराचे आणि द्वेषाचे धनी झाले आहेत.

'अस्पृश्यांनीच अस्पृश्यांचे नेतृत्व केले पाहिजे या तळमळीने बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदारसंघ मागितले. पुणे करारातील तडजोड मान्य करतानाही, अस्पृश्यच आपल्या बांधवाचे प्रतिनिधित्व करू शकेल, ही त्यांची दृष्टी कायमच होती.

हे नेतृत्व सुशिक्षित, व्यासंगी, विद्वत्तापूर्ण, आणि कोठल्याही व्यासपीठावर, कोणाशीही बरोबरीच्या हिमतीने बौद्धिक मुकाबला करू शकेल असे भक्कम झाले पाहिजे, या नेतृत्वाच्या विद्वत्तेचा, कर्तृत्वाचा आणि दानतीचा सर्वांना, विशेषत: सवर्णांच्या नेतृत्वाला धाक वाटला पाहिजे, अशी बाबासाहेबांची दृष्टी होती. या दृष्टीने त्यांनी शिक्षणसंस्थांची स्थापना केली, वसतिगृहांची स्थापना केली.

दलितांच्या नेतृत्वाची आजची स्थिती काय आहे ? बाबासाहेबांचे उद्देश आणि अपेक्षा पूर्ण करणारे नेतृत्व आज आहे का ? केवळ दलितांचाच नव्हे, तर सर्व भारताचा विचार करणारे व्यापक नेतृत्व आज आहे का ? राष्ट्रीय नेतृत्वाला ज्याचा रास्त धाक आहे, ज्याचा आदर करावासा वाटेल, असे दलित नेतृत्व आज आहे का ?

या प्रश्नाची उत्तरे आज आपण होकारार्थी देऊ शकत नाही. ही वस्तुस्थिती मन खातावणारी आहे, अपराधीपणा वाढवणारी आहे.

आपण म्हणजे आपण सारे. सारे भारतीय. सवर्ण आणि दलित-दोन्ही प्रकारचे सर्व भारतीय. बाबासाहेबानी जे मनाशी धरले होते ते पुरे करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची होती. कारण त्यानी जे मनाशी धरले होते ते सर्व भारतासाठी आणि भारतीयांसाठी होते. आपल्याला ते आपल्यासाठी आणि आपल्या भारतासाठी पुरे करायचे होते; पण आपण सारे कमी पडलो. जसे इतर क्षेत्रात तसे या क्षेत्रातही कमी पडलो. ¤

स्वतंत्र भारताचे जे स्वप्न बाबासाहेबांनी मनाशी बाळगले होते ते निदान आज स्वातंत्र्यानंतर चौतीस वर्षे झाल्यानंतर, समजून घेऊ या. बाबासाहेबांची महानिर्वाणदिनी होणारी आठवण ही हे स्वप्न समजून घेण्यासाठी चांगली संधी आहे.

बाबासाहेबांच्या सामाजिक कार्याचा प्रारंभ बंडखोरीने झाला. तसे होणे स्वाभाविकच होते. तथापी त्यांच्या कार्याची अखेर व्यापक विधायकतेने झाली हे अधिक महत्त्वाचे आणि आवर्जून समजून घेण्याजोगे आहे.

बंडखोरी आणि विधायकता यांची ही जुगलबंदी बाबासाहेबांच्या जीवनात आणि कार्यात प्रथमपासून दिसते.

चवदार तळ्याचा आणि नासिकच्या राममंदिराचा असे दोन सत्याग्रह हे त्या वेळच्या सनातन्यांना प्रतिकारात्मक, बंडखोरीचे वाटले यात नवल नव्हे. सवर्ण हिंदूंनी स्वहितासाठी ज्या रूढी शतकानुतके पोसल्या होत्या त्या मोडून काढणे हे बाबासाहेबाचे उद्दिष्ट होते आणि त्या दृष्टीने या चळवळी उच्छेदक होत्याच.

तथापी, हिंदू धर्माच्या व्यापक अस्मितेत सामावून जाणे ही या सत्याग्रहामागील विधायक प्रेरणा, निदान आज तरी सवर्ण हिंदूंनी समजून घ्यायला हवी.

बाबासाहेब 'देव नको' म्हणत नव्हते. उलट, त्यांना देवळात प्रवेश हवा होता. देवाची भक्ती मनात बाळगून त्याची पूजा करण्यासाठीच हा प्रवेश हवा होता. बाबासाहेबांच्या या आस्तिक्य बुद्धीने सनातन्याना खरे म्हणजे आनंद व्हायला हवा होता. तथापी त्याना बाबासाहेबांची ही विधायकता उमगली नाही. ज्या थोड्यांना ती उमगली त्यांना ती महत्त्वाची आणि सोयीची वाटली नाही. कारण या सनातनी सवर्णांना खरी आस्तिक्य बुद्धी किंवा हिंदुत्व श्रद्धा महत्त्वाची वाटत नव्हती. त्याना रूढी महत्त्वाची वाटत होती. कारण ही रूढी सामाजिक आणि व्यावहारिक पातळीवरील होती आणि ती सवर्णांच्या हिताची होती.

सनातनी सवर्णांची ही स्वत:चा हितसंबंध सांभाळण्याची दृष्टी महात्मा ज्योतिबा फुल्यांना, त्यांच्याही आधी लोकहितवादीना स्पष्ट झाली होती. तुकाराम-एकनाथ-ज्ञानेश्वर या संतानाही ही दृष्टी स्वानुभवाने उमजली होती. बाबासाहेबाना ही परंपरा ठाऊक नव्हती असे नव्हे; पण या परंपरेचा अनुभव त्यांना स्वत:ला येईपर्यंत त्यांनी सवर्णांच्या धर्मश्रद्धेवर विश्वास ठेवला होता. कोणत्याही मोठ्या मनाच्या पुरुषाचे असेच

असते. स्वतःला अनुभव आल्याखेरीज तो आपला अभिप्राय पक्का करीत नाही.

बाबासाहेब आंबेडकर असेच वागले. चवदार तळ्याचा सत्याग्रह काय अथवा राममंदिर-प्रवेशाचा सत्याग्रह काय, बाबाहेबांनी तत्कालीन सवर्णांच्या घेतलेल्या त्या चाचण्या होत्या. या सवर्णांना हिंदू धर्माची मूलभूत श्रद्धा आणि निष्ठा कितपत प्रिय आहे हे त्यांना पारखायचे होते.

पारख चांगली खडखडीत झाली. निवाडा मिळाला. हिंदू धर्मापेक्षा, हिंदू विचारतत्त्वापेक्षा, हिंदूंची सामाजिक रूढी सवर्णांना अधिक प्रिय आहे असा निवाडा त्याना मिळाला. धर्मतत्त्वांपेक्षा सामाजिक हितसंबंधच अधिक प्रभावी ठरले आहेत, हे त्यांना स्वतः घेतलेल्या या परीक्षेतून चरचरून समजून चुकले.

आंबेडकरांच्या वाटयाला ही निराशा यावी यात नवल नव्हते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाटयाला अशीच निराशा आली होती. सावरकरांनी रत्नागिरीला सर्वांसाठी पतितपावन मंदिर भागोजी कीर यांचेकरवी बाधवले. आजपर्यंत गावोगाव अशी मंदिरे व्हावयास हवी होती. तशी ती झाली नाहीत. बहुतेक सारी देवळे सवर्णांसाठी राखीव आहेत. सवर्ण हिंदूचा देव दलित हिंदूंचा नव्हे हीच भावना कायम आहे. सावरकरानी १९३४ पासून 'किर्लोस्कर'मध्ये आधुनिक दृष्टीचे लेख लिहून रूढी मोडण्याचे प्रखर आवाहन केले. 'अद्यायावत् व्हा', असे त्यांनी सांगितले. 'गाय हा एक उपयुक्त पशू आहे', हे ध्यानात घेण्यास सांगितले. 'अस्पृश्यता ही सवर्णांची मानसिक गुलामगिरी आहे, ती दूर करा', असे सांगितले. सोवळयाओवळयातील मर्यादित देव सोडून द्या आणि विश्वाच्या देवाचा स्वीकार करा असे सांगितले; पण सारे पालथ्या घड्यावर पाणी ठरले !

सावरकरांच्या तेजस्वी लेखनाला आता पन्नास वर्षे होतील; पण हिंदूनी अजूनही सावरकरवाद स्वीकारलेला नाही. सावरकर हिंदूचे आणि हिंदुमहासभेचे अनभिषिक्त नेते. 'हिंदु हृदयसम्राट' ही पदवी सार्थपणे भूषवणारे. त्यांच्या प्रतिपादनाची ही दशा सनातन्यांनी केली. मग बाबासाहेबांच्या चाचण्यांना त्यांनी धुडकावून लावले यात आश्चर्य वाटावयास नको.

¤

सवर्ण हिंदू बदलले नाहीत, हे जाणून बाबासाहेबांनी आपल्या कार्यक्रमाची फेरआखणी केली. सवर्णांची धर्मबुद्धी कधीही जागी होणार नसल्याने, तिच्यावर अवलंबून राहावयाचे नाही असे त्यांनी ठरविले. त्या वेळच्या अस्पृश्यांनी स्वावलंबी झाले पाहिजे. स्वत.चे नेतृत्व स्वतः केले पाहिजे. त्यासाठी स्वतःची लायकी स्वतः वाढविली पाहिजे. अद्ययावत् झाले पाहिजे. समाजाचा अपरिहार्यपणे आवश्यक घटक म्हणून मानाचे, हक्काचे स्थान मिळवले पाहिजे आणि यासाठी निष्ठापूर्वक कष्ट केले पाहिजेत, हे त्यांनी जाणले. सवर्णांकडे जाऊन अर्जविनंत्या करण्याचा कार्यक्रम त्यांनी सोडला आणि *लोकमान्य टिळकांप्रमाणे*, स्व-शिक्षण, असहकार इत्यादी साधनांनी 'सुराज्याऐवजी स्वराज्य' मिळवण्याचा मंत्र अस्पृश्यांना दिला. ते अस्पृश्यांचे 'लोकमान्य' झाले !

एका बाजूने शिक्षणसंस्था चालवणे, उच्च प्रतीचे अद्ययावत शिक्षण देणे हा धडाक्याचा कार्यक्रम त्यांनी सुरू केला. हजारो दलित तरूण डॉक्टर, इंजिनियर, बॅरिस्टर होऊ लागले. अद्ययावत साहेबी पोशाख करू लागले. उत्तम फ्लॅटस् वा बंगले घेऊन राहू लागले. सवर्णांत बरोबरीने ऊठ बस करू लागले. क्वचित एखाद्या सुविद्य सवर्ण तरुणीला आकर्षित करू लागले. दलितांमध्ये जणू एक नवा मध्यमवर्ग निर्माण झाला. इतर दलित या मध्यमवर्गाकडे आपले हक्काचे नेतृत्व म्हणून पाहू लागला आणि साधारण सामाजिक व्यवहारात सवर्णांना या नव्या मध्यमवर्गांचे बरोबरीने वागणे सहन करावे लागले. अस्पृश्यासाठी नवी अस्मिता बाबासाहेबानी प्राप्त करून दिली.

दुसऱ्या बाजूने, भारताच्या राजकीय घडीतही अस्पृश्यांना खास हक्काचे स्थान मिळावे, असा सनदशीर प्रयत्न बाबासाहेबांनी आरंभिला. विभक्त मतदारसंघाची मागणी त्यासाठी होती. एकत्र कुटुबात थोरल्याच्या कृपेवर अवलंबून राहावे लागते. विभक्तपणात कदाचित साजूक तूप मिळत नाही; पण वेगळा स्वाभिमान असतो, हक्क असतो. बाबासाहेबांना कृपा नको होती, हक्क हवा होता.

महात्माजींच्या 'हरिजन' या नावाला आणि त्या नावापाठीमागील दयाळू वृत्तीला त्यांचा यासाठीच विरोध होता. दयाळूपणात वरचढपणाचा उदात्तपणा असतो. तो त्यांना नको होता. थोरल्याने कधी दूर लोटायचे, कधी जवळ करायचे. पण दूर–जवळ करण्याचा हक्क स्वत.जवळ ठेवायचा, हे त्यांना नको होते. हिंदूशी त्यानी भाऊबंदकी मांडली. युधिष्ठिराने वेगळी पाच गावे मागितली तसे बाबासाहेबानी विभक्त मतदारसंघ मागितला कृपा म्हणून नव्हे, तर हक्क म्हणून मागितला. भाऊबंदकी माडण्यात वाटा मिळाला नाही तरी भाऊपणा सिद्ध होतो. अस्पृश्यांचा सवर्णांशी बरोबरीचा भाऊपणा बाबासाहेबाना सिद्ध करायचा होता. महात्माजीनी आपल्या उपोषणाच्या दडपणाने हक्काचे देणे पुढे ढकलले खरे; पण *या वादात 'भाऊपणा'* सिद्ध झाल्याने तात्त्विक विजय बाबासाहेबाचाच होता. सवर्णांच्या मनात जे मालकनोकरपणाचे नाते रुजलेले होते ते काढून त्या जागी भाऊपणाचे नाते त्यांना प्रस्थापित करायचे होते. 'पुणे करारा'चे भाऊपणाचे हे नाते प्रथमच अधिकृतपणे मान्य केले गेले.

¤

स्वतत्र भारताची प्रजासत्ताक घटना तयार करताना भाऊपणाच्या हक्काचे तत्त्वच बाबासाहेबांच्या मनात होते. म्हणूनच, 'अस्पृश्यता नाहीशी झाली' असे जाहीर करण्याबरोबरच 'सवलती–राखीव' याचेही विसर्जन करावे अशी त्यांची धारणा होती. कारण, 'सवलतीं'त सवलत घेणाऱ्याच्या भूतकाळाची आठवण जागी राहते, मालकनोकरपणाची आठवण जागी राहते. ही आठवण त्यांना कायमची बुजवायची होती.

तथापि, घटनासमितीतील सवर्णांनीच सवलतीचा हट्ट धरला. एक प्रकारच्या अपराधीपणापासून सवर्ण सुधारकानी हा आग्रह धरला. तर, 'द्या एकदाच्या सवलती आणि गप्प बसवा,' अशी भूमिका सवर्ण सनातन्यांनी पत्करली. फक्त दहा वर्षांची मर्यादा घालून बाबासाहेबानी हे दान स्वीकारले खरे. पण ते स्वीकारले नसते तर बरे झाले असते, असे आज वाटते.

पण हे वाटणे तीस वर्षांच्या अनुभवानंतरचे आहे. बाबासाहेबांच्या मनात त्या काळी सवर्णांबद्दल पूर्ण अविश्वास पक्का

झाला होता. पुढे कदाचित् काहीच मिळणार नाही, तर निदान सवलती तात्पुरत्या असू देत, असा विचार त्यांनी केला असेल हे शक्य आहे. शिवाय धर्मांतर केल्याने हा प्रश्न वेगवेगळ्या रीतीने सुटेल असेही त्यांना वाटले असावे. छप्पन्न साली त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्या वेळी सर्वच दलितांनी स्वाभिमानाने ही धर्मांतराची क्रांती राबविली असती तर बाबासाहेबांना जो चमत्कार घडवायचा हवा होता तो घडलाही असता !

गंमत अशी की, सवर्णांबद्दल अनुभवाने एवढा अविश्वास मनात भिनला असूनही हिंदू परंपरेच्या व्यापक चौकटीला धक्का लावण्याचे साहस बाबासाहेबानी केले नाही. हिंदू परंपरेबाबतच्या विरोध-भक्तीची विधायकता त्यांच्या या अखेरच्या आणि सर्वांत महत्त्वाच्या निर्णयात देखील होती. सवर्ण हिंदूंची उपेक्षा, त्यांनी केलेली अवहेलना लक्षात असूनही हिंदू परंपरेचा द्वेष करणाऱ्या धर्मात प्रवेश करावा, असे त्यांनी ठरवले नाही. ते भारतीय परंपरेच्या बौद्ध धर्मातच गेले.

स्वधर्मीयांपैकी एका भागाला स्वधर्माबाहेर ठेवणाऱ्या अंध, रूढिग्रस्त धर्मात मरणार नाही हा निश्चय बाबासाहेबानी खरा केला. त्याचे एक समाधान त्यांना मिळाले असेल; पण हिंदू धर्माच्या चौकटीत मानाने जागा मिळविण्याचा त्यांचा, चवदार तळ्यांच्या सत्याग्रहापासून सुरू झालेला, विधायक प्रयत्न मात्र विफलच झाला !

¤

बाबासाहेबांच्या कार्यामागील या विधायक प्रेरणेचे मोल सनातनी सवर्णांनी कधीच जाणले नाही. जाणले असते तर त्यांनी बाबासाहेबांना 'पूज्य, प्रातःस्मरणीय' असे म्हणावे एवढी आंबेडकरांची योग्यता व एवढे त्यांचे कर्तृत्व होते; पण हिंदू राष्ट्राच्या घडणीचे ध्येय बाळगणारे सनातनी हे कर्तृत्व समजू शकले नाहीत.

आपल्या आजच्या सामाजिक दुरवस्थेतील ही पराकोटीची दुरवस्था आहे. बेलछी, देवळी येथे जे होत आहे ते केवळ या दुरवस्थेचे बाह्य लक्षण आहे. दलितांच्या हिंदुत्वाचा सवर्णांना अभिमान अथवा कैवार नसणे हा खरा रोग आहे. हा रोग जोपर्यंत आहे तोपर्यंत येथे एकात्म राष्ट्रभावना निर्माण होऊ शकणार नाही !

¤

या दुरवस्थेची आणखी एक कोटी आहे. ती मन उद्ध्वस्त करणारी आहे. बाबासाहेबानी ज्यांना स्वकर्तृत्वाने आत्मोन्नती साधण्याचा मार्ग दाखविला ते दलितांतील मोजके भाग्यवंत, प्रबोधन झालेला दलितांतील तो मध्यमवर्ग—तो बाबासाहेबांची विधायक शिकवण आज विसरून गेला आहे.

या नेतृत्व करणाऱ्या मंडळीत आज चिरफळ्या पडल्या आहेत. या फळ्यांत परस्परांविषयी संशय आणि दुरावा आहे. बाबासाहेबांची वस्त्रे, त्यांची परंपरा, दीक्षाभूमी यांवर हक्क कोणाचा यासंबंधीचे वाद विकोपाला गेले आहेत. बाबासाहेबांच्या कार्याची वारसदारी पत्करून निर्भयपणे विधायक मार्ग स्वीकारावा, स्वतःच्या विद्वत्तेचा आणि कर्तृत्वाचा रास्त धाक समाजात निर्माण करावा असे कोठल्याही फळीला वाटत नाही.

जहाल वृत्तीच्या आणि प्रचंड कर्तृत्वाच्या पुरुषाचे इतिहासात अनेकदा जे होते, तेच बाबासाहेबांचे झाले आहे. सूर्य प्रखर, पण सूर्याची पिल्ले मवाळ. त्याची इस्टेटीवरून आपसात भाडणे. या भाडणात प्रत्येक फळीने सवर्णांची मदत मागणे आणि मदत घेता घेता पुन्हा एकदा नवे मिंधेपण पत्करणे. आंबेडकराचा पराभव अनुयायानीच केला आहे.

दलित चळवळीला आंबेडकरवाद नव्याने जिवंत करणे भाग आहे. आजची चळवळ हे आव्हान स्वीकारणार आहे काय ? □

---

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ बहुगुणा व गढवाल पोटनिवडणूक

निवडणूक महामंडळाने रद्दबातल ठरवलेली गढवाल लोकसभा पोटनिवडणूक जर ठरल्या दिवशी म्हणजे बावीस नोव्हेंबर रोजी पार पडली असती तर बहुगुणा पुन्हा संसदेमध्ये प्रविष्ट झाले असते; असेच एकंदर गढवालमधील वातावरण होते. श्री. बहुगुणा पोटनिवडणूक रद्द झाल्यापासून या मतदारसंघाशी संपर्क ठेवून होते. ही निवडणूक जिंकायचीच, अशा जिद्दीने ते प्रचार-कार्यामध्ये गढून गेले होते. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मतदारसंघ खणून काढला होता. प्रसिद्धिपत्रकावर भरपूर पैसा खर्च करण्यात आला होता. निवडणूक प्रचार अखेरच्या टप्यात असताना बहुगुणा याचे पारडे जड होते आणि असे अनुकूल वातावरण असताना अचानकपणे निवडणूक-मंडळाने फतवा काढून ही निवडणूक पुढे ढकलली. स्वाभाविकपणे बहुगुणा पुन्हा एकदा प्रकाशझोतामध्ये तेजाळून निघाले. त्यांनी केंद्र सरकारवर व निवडणूक मंडळावर टीकेची झोड उठवली. आपल्या मतदारसंघामध्ये असतानाच बहुगुणा यांना अपघात झाला आणि दिल्लीच्या ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स या संस्थेमध्ये त्यांना उपचारासाठी रहावे लागले. गुडघा दुखावल्यामुळे त्यांचा पाय प्लॅस्टरमध्ये असला तरी त्यांनी आपली प्रचारयंत्रणा सतत कार्यरत ठेवली होती. स्वाभाविकपणे ही निवडणूक रद्द झाल्याने ते काहीसे निराश झाले आहेत. या संदर्भात आपली प्रतिक्रिया नोंदवताना ते म्हणाले : निवडणूक-खर्चापोटी मला भिकेला लावून मी निष्कांचन झालो म्हणजे मग ही पोटनिवडणूक घेण्याचा केंद्राचा विचार दिसतो आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये उमेदवाराला किती प्रचंड खर्च करावा लागतो हे मी वेगळे सांगण्याचे कारण नाही. केवळ तीन वर्षांच्या काळात मला तीन वेळा हा खर्च करावा लागला आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी माझ्यामागे इंदिरा काँग्रेसची ताकद असली तरी मला मोठा खर्च करावा लागला होताच. पुढे पक्ष सोडल्यावर मी लोकसभेमधील आपली जागाही सोडली. त्यानंतर जी पोटनिवडणूक झाली आणि जी निवडणूक महामंडळाने रद्द ठरवली, त्या पोटनिवडणुकीतही मला अफाट खर्च करावा लागला. मतमोजणी होण्यापूर्वीच ती निवडणूक रद्द झाली

आणि मी पुन्हा निवडणुकीच्या तयारीला लागलो. निवडणूक मंडळाने तारीख घोषित केल्यानंतरच मी प्रसिद्धिपत्रकांवर खर्च केला. प्रचारयंत्रणा उभी केली आणि आता निवडणूक मंडळाने ही निवडणूकच बेमुदत पुढे ढकलली आहे! निवडणुकीवर खर्च करण्याची माझी शक्ती मर्यादित आहे. आता निवडणूक रद्द झाल्याने माझा सर्व खर्च मातीमोल झाला असून मला भरपूर मनस्तापही झालेला आहे. या साऱ्या प्रकाराने बहुगुणा निराश झालेले दिसतात. ही निवडणूक आयत्या वेळी रद्द केल्याने विरोधी पक्षांनी निवडणूक महामंडळावर कठोर टीका केली असून हा निर्णय राजकीय कारणासाठी घेण्यात आला आहे, असा दावाही केला आहे. ही निवडणूक रद्दबातल करवून घेण्यामागे इंदिराजींचा प्रत्यक्ष हात असल्याचा आरोप बहुगुणा यांनी केला आहे.

निवडणूक ज्या परिस्थितीमध्ये रद्द झाली ती परिस्थिती पाहता निवडणूक राजकीय कारणासाठीच रद्दबातल ठरवण्यात आली, असे अनुमान काढावे लागते. या मतदारसंघाचा दौरा केल्यानंतर मुख्य निवडणूक-आयुक्त शकधर यांचे सचिव गॅन्सन यानी ही निवडणूक ठरल्या वेळी होईल, असे घोषित केले होते आणि त्यानंतर केवळ दोनच दिवसांनी म्हणजे, १४ नोव्हेंबर रोजी एका प्रसिद्धिपत्रकामध्ये निवडणूक-आयुक्तांनी ही निवडणूक रद्द करून टाकली! या प्रसिद्धिपत्रकात अनेक उलट-सुलट विधाने आहेत. या पत्रकामध्ये एका ठिकाणी ते म्हणतात की, या मतदारसंघामधील नेमकी परिस्थिती काय आहे याची खातरजमा करून घेणे मला शक्य नाही. मात्र या विधानानंतर येणाऱ्या परिच्छेदामध्ये ते म्हणतात की, राज्यशासन शांततापूर्ण वातावरणामध्ये आणि शिस्तबद्धपणे ही निवडणूक घेऊ शकणार नाही याबाबत आपली खात्री झाली आहे. ही खात्री कशाच्या आधारे झाली आहे, हे मात्र ते सांगत नाहीत. स्वाभाविकपणे निवडणूक मंडळाच्या स्वायत्ततेबद्दल संदेह निर्माण झाला असून आधीच वादग्रस्त असलेले शकधर यांच्यावर पुन्हा एकदा टीकेची झोड उठली आहे. बहुगुणा याच्याबाबत हात राखून असलेले काही विरोधी पक्षही या प्रकाराने संतप्त झाले आहेत. विरोधी पक्षांनी या संदर्भात आपला तिखट विरोध नोंदवला असून लोकसभेच्या चालू अधिवेशनामध्ये त्याचे तीव्र पडसाद उमटणे स्वाभाविक आहे. खेरीज, या साऱ्या प्रकाराविरुद्ध त्यानी राष्ट्रपतींकडे तक्रार केली असून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीकडून या प्रकाराची चौकशी करावी, अशी मागणीही केली आहे. राष्ट्रपती या संदर्भात काय करू शकतात ? या संदर्भात कोणतीही प्रथा नाही. कारण अशा प्रकारे राष्ट्रपतीनी काही करावे अशी मागणी अशा निवडणूक रद्द झाल्याच्या प्रकरणात या पूर्वी राष्ट्रपतीकडे करण्यात आलेली नाही. तथापि, घटनेमधील या संदर्भातील तरतूद पाहता, राष्ट्रपती निवडणूक-मंडळास आपल्या निर्णयाबाबत फेरविचार करण्यास सांगू शकतात. समजा, तसे त्यानी सांगितले तर त्याचा सरळ अर्थ असा की, निवडणूक राजकीय कारणांसाठीच रद्द करण्यात आली आहे याबाबत त्यांची खात्री झाली आहे. अर्थात त्यानी असा आदेश देणे म्हणजे निवडणूक-मंडळावर अविश्वास दाखवण्याचाच प्रकार आहे. खेरीज, हा अधिकार ते स्वतंत्रपणे बजावू शकतात की, केंद्र शासनाच्या सल्ल्याने या संदर्भात आपले मत त्यांना बनवावे लागते, या बाबतही संदेह आहे. राष्ट्रपती या संदर्भात काही करतील अशी परिस्थिती नाही.

ही निवडणूक रद्द झाल्याने बहुगुणा यांचे महत्त्व थोडे-फार वाढले आहे. ते लोकसभेमध्ये आले असते तर सत्ताधारी पक्षाला थोडा-फार तडाखा बसला असता हे खरे; पण त्यांच्या लोकसभेमधील आगमनाने काही फार मोठा फरक पडला नसता. ज्याला फार मोठे पाठबळ नाही, परंतु तरीही ज्याची व्यक्तिगत ताकद लक्षणीय आहे असा एखादा बहुगुणा यांच्यासारखा नेता लोकसभेमध्ये आला असता, तर प्रचंड बहुमत असलेल्या इंदिरा काँग्रेसच्या हिशेबी विरोधी बाकावर आणखी एक नेता येऊन बसला असता, यापेक्षा काही फरक पडत नव्हता; परंतु इंदिराजी आणि त्यांचा पक्ष बहुगुणांकडे इतक्या निकोप नजरेने पहात नाहीत. सत्ताधारी पक्षाने गढवाल पोटनिवडणूक हा प्रतिष्ठेचा विषय केला होता. मतदान झाल्यावरही ही निवडणूक एकदा रद्द झाल्याने कडवटपणा आणखी वाढला. राजकीय परिस्थितीमध्ये फारसा फरक पडला नसता तरी बहुगुणा याचे लोकसभेमधील आगमन सत्ताधारी पक्षाला गैरसोयीचे होते. विशेषतः, सत्ताधारी पक्ष अनेक आघाड्यावर विरोधी पक्षाचे हल्ले सहन करत असताना गढवालसारख्या साऱ्या देशाचे लक्ष वेधून घेणाऱ्या महत्त्वपूर्ण पोटनिवडणुकीमध्ये इंदिरा काँग्रेस पराभूत झाली असती तर लगोलग त्याचा संबंध या पक्षाच्या घटत्या लोकप्रियतेशी जोडला गेला असता. तेव्हा हे गैरसोयीचे प्रकरण गुलदस्तात ठेवून देणे हितावह मानले गेले. ज्या पोटनिवडणुकीमध्ये सत्ताधारी पक्षाला अनुकूल दान पडण्याची शक्यता आहे, त्या विविध राज्यातील विधानसभेच्या २१ जागांच्या व लोकसभेच्या अन्य दोन जागांच्या पोटनिवडणुका मात्र ठरल्या वेळापत्रकाप्रमाणे पार पडत आहेत. गढवाल पोटनिवडणूक रद्द झाल्याने बहुगुणा मात्र पुन्हा प्रकाशझोतामध्ये आले आहेत.

लोकसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले असून काही किमान प्रश्नावर विरोधी पक्षाचे एकमत झाल्याने हे विशिष्ट प्रश्न लोकसभेमध्ये लावून धरण्याची तयारी विरोधी पक्षानी केली आहे. हे अधिवेशन सुरू होण्याच्या दोन दिवस आधी प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांची एक बैठक नवी दिल्ली येथे भरली होती. या बैठकीला सर्व विरोधी पक्षांचे प्रमुख नेते हजर होते. आतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मिळणारे अवाढव्य कर्ज, गढवाल पोटनिवडणूक रद्द करण्याचा निर्णय, खलिस्तान चळवळ व पंजाबमधील अस्थिर वातावरण या गरमागरम विषयांना विरोधी पक्षांकडून प्राधान्य दिले जाईल. खेरीज, आसाम-प्रश्न, अंतुले-प्रकरण, हरिजनावरील अत्याचार, यांसारखे जुने विषयही संधी मिळेल त्याप्रमाणे पुढे रेटण्यात येतील. विरोधी पक्षांच्या नेत्यानी वर उल्लेखलेल्या प्रश्नाबाबत चर्चा करून काही विशिष्ट भूमिका घेतली असल्याने विरोधी पक्षाच्या लोकसभेमधील कामगिरीला धार येईल, अशी अपेक्षा आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार याचे संबंध, या विषयावर बोलताना अलीकडेच राष्ट्रपतींनी काही वादग्रस्त विधाने केली आहेत. राज्याला अधिक स्वायत्तता देण्याच्या मागणीचा त्यानी पुरस्कार केला असून भारतासारख्या खंडप्राय देशाचे ऐक्य अबाधित रहायचे असेल तर राज्य सरकारांना असंतुष्ट ठेवून चालणार नाही, असेही विधान त्यानी केले आहे. केंद्र सरकारची याबाबतची भूमिका व धोरणे वेगळी

आहेत आणि म्हणूनच या धोरणापेक्षा राष्ट्रपती जेव्हा काही वेगळे बोलतात तेव्हा त्याचेही पडसाद संधी मिळाल्यास उठवले जातील.

## □ केंद्र-राज्य संबंध—एक वादाचा नाजूक विषय

राज्य आणि केंद्र यांचे सबंध कसे असावेत ? राज्यांना कोणत्या बाबतीत आणि कितपत स्वायत्तता असावी ? आर्थिक बाबतीत राज्याना केंद्र शासनावर फार मोठ्या प्रमाणात अवलंबून रहावे लागते, ते कितपत योग्य आहे ? केंद्र सरकारला अनुकूल नसणारी परंतु राज्य सरकारला हितावह वाटणारी अशी धोरणे राज्य सरकारला कितपत वापरता येतील? यासारखे अनेक प्रश्न-उपप्रश्न या गुंतागुतीच्या प्रश्नाभोवती लगडले असून त्या प्रश्नांची उत्तरे सहजगत्या मिळत नाहीत आणि म्हणूनच केंद्र—राज्य संबंध हा एक सतत चर्चेचा विषय होऊन राहिलेला आहे. १९६७ सालापर्यंत केंद्रामध्ये व राज्यामध्ये एकाच पक्षाचे शासन असल्याने केंद्र व राज्य यांचे संबंध सुरक्षित होते; परंतु १९६७ नंतर राज्यामध्ये विरोधी पक्षाची मत्रिमंडळे आणि या पक्षाची विचारसरणी, धोरणे आणि कार्यक्रम, केंद्र शासन आणि तेथे सत्ताधारी असलेला पक्ष यापेक्षा वेगळी असल्याने स्वाभाविकपणे प्रथम चर्चेला, मग मतभेदाला आणि पुढे संघर्षाला तोंड फुटले. हा प्रश्न तसा महत्त्वाचा असल्याने आणि त्यावर बरीच उलटसुलट चर्चा झाल्याने केंद्र शासनाने हा प्रश्न शासकीय सुधार समितीकडे सोपवला. १९६९ साली तामिळनाडूमध्ये तेथील राज्य सरकारने याच प्रश्नाचा सांगोपाग विचार करण्यासाठी मद्रास उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती पी. व्ही. राजमन्नार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. राज्य-केंद्र संबंधाबाबत घटनेमधील तरतुदींचा अभ्यास करून त्यामध्ये कालसुसंगत असे कोणते बदल करता येतील, हे पण या समितीला तपासून पहाण्यास सांगण्यात आले.

शासकीय सुधार समितीने घटनेमधील तरतुदीचा पाठपुरावा केला, तर राजमन्नार समितीने राज्यांना अधिक स्वायत्तता मिळाली अशी मागणी केली. शासकीय सुधार समितीने देशाच्या एकतेच्या दृष्टीने केंद्र—राज्य संबंधामधील घटनात्मक तरतुदी आहेत त्याच स्वरूपात राबवण्यात याव्यात, असे मत नोंदवले. त्या तरतुदींमध्ये कोणतेही बदल करण्याची आवश्यकता नाही, असा स्पष्ट अभिप्राय या समितीने दिला. तसेच केंद्र व राज्य यांच्यामधील संबंध सुरक्षित रहावेत यासाठी घटनेमधील तरतुदी पुरेशा असून याबाबत निर्माण झालेल्या कोणत्याही तरतुदीला तोंड देण्याची क्षमता या तरतुदींमध्ये असल्याने घटनेमध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही, असेही स्पष्टपणे म्हटले याउलट राजमन्नार समितीने घटनेमधील विद्यमान तरतुदीने राज्यांना दुय्यम स्वरूप प्राप्त झालेअसून राज्याना अधिक स्वायत्तता मिळावी, अशी शिफारस केली व याबाबत घटनेमध्ये दुरुस्ती करण्यात यावी,असे मत नोंदवले. तामिळनाडू शासनाने या अहवालाचे स्वागत करून जे टिपण तयार केले त्यामध्ये केंद्र सरकारने केवळ संरक्षण परदेशविषयक धोरण, राज्याराज्यामधील वाहतूक-व्यवस्था व समान चलने एवढ्या गोष्टीबाबत निर्णायक अधिकार ठेवावेत व राज्याना भरपूर स्वायत्तता देण्यात येऊन त्याना विशेषतः आर्थिकदृष्ट्या केंद्र शासनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून रहावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी, असे सुचवले. केंद्र सरकाने शासकीय सुधार समिती, राजमन्नार समिती यांच्या अहवालांचा अभ्यास केला. तामिळनाडू शासनाचे टिपणही विचारात घेतले गेले; परंतु केंद्र शासन राजमन्नार समितीच्या अहवालाबाबत अनुकूल नव्हते. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने बळकट केंद्र शासनाची आवश्यकता असल्याचे सांगून राज्य—केंद्र संदर्भात शासकीय सुधार समितीने ज्या शिफारसी केल्या होत्या त्याचप्रमाणे मानल्या. काही काळ या वादावर पडदा पडला. तरी जेथे विरोधी पक्षाचे सरकार सत्तेवर होते त्या राज्यांनी वेळोवेळी अधिक स्वायत्ततेची मागणी पुढे रेटलीच. केंद्रामध्ये जनता शासन असताना प. बंगाल सरकारने केंद्र—राज्य संबंधाबाबतचे एक टिपण त्या वेळचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांच्याकडे पाठवून दिले. त्या वेळी प. बगालमध्ये डाव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार सत्तेवर होते आणि डावे कम्युनिस्ट जनता पक्षाचे मित्रपक्ष असल्याने केंद्र शासनाबरोबर प. बगालचे संबंध तसे सलोख्याचे होते. मात्र तरीही ज्योती बसूना राज्य—केंद्र संबंधांबाबत एक टिपण केंद्र सरकारकडे पाठवणे आवश्यक वाटले. या टिपणामध्येही अधिक स्वायत्ततेची मागणी करण्यात आली होती. राष्ट्रीय सुधार समिती व योजना समितीच्या कार्यपद्धतीमध्ये महत्त्वपूर्ण बदल सुचवणाऱ्या या टिपणामध्ये घटनेमधील ३६० वे कलम काढून टाकण्याची मागणी करण्यात आली होती. या कलमाप्रमाणे आर्थिक अस्थिरतेच्या कारणांसाठी राष्ट्रपतीना राज्याच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करता येतो. तसेच राष्ट्रीय उत्पन्नापैकी एकूण ७५ टक्के उत्पन्न राज्यांना देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. घटनेचे स्वरूप संघ राज्यात्मक असले तरी प्रत्यक्षात घटनेने केंद्र शासनाला अवाजवी बलशाली केले आहे. राष्ट्रीय हित लक्षात घेऊन लोकसभेमध्ये एखाद्या विशिष्ट राज्यामधील परिस्थितीबाबत लोकसभेमध्ये चर्चा करता येते. या चर्चेस अनुमती देणारे घटनेमधील २४८ वे कलम काढून टाकावे, अशीही मागणी प. बंगाल शासनाने केली. घटनेमधील ३५६ व ३५७ व्या कलमाखालील तरतुदीचा आधार घेऊन राष्ट्रपती राज्य सरकार बडतर्फ करू शकतात व कोणत्याही राज्यामधील विधानसभा विसर्जित करू शकतात. तेव्हा या कलमाचा पुनर्विचार व्हावा, अशीही मागणी करण्यात आली. केंद्र सरकार या असल्या मागण्याना दाद देणे शक्य नाही, हे प. बंगाल शासनालाही माहीत असल्याने निदान या प्रश्नावर राष्ट्रव्यापी चर्चा घडवून आणावी व जनमताची चाचपणी करण्यात यावी, अशा सूचना पुढे करण्यात आल्या. मोरारजीभाईंना या मागण्याचा विचार करण्याचीही गरज भासली नाही. २२ जून १९७८ रोजी त्यांनी बंगलोर येथे स्वच्छ सांगून टाकले की, राज्याना अधिक स्वायत्तता देण्याच्या दृष्टीने घटनेमध्ये कोणत्याही तरतुदी करण्याची आवश्यकता नाही. घटनाकारानी सर्व गोष्टीचा सारासार विचार करूनच राज्याचे केंद्राबरोबरचे संबंध निश्चित केले आहेत. राज्याना स्वायत्ततेची मागणी करणारांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, अशी मागणी मान्य केली गेली तर देशाचे तुकडे पडल्याखेरीज रहाणार नाहीत. या प्रश्नावर राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणण्याची मुळीच आवश्यकता नाही, असेही त्यानी सुस्पष्टपणे सांगून टाकले. पुढे केंद्र सरकारचेच बूड जागचे हलल्याने हा प्रश्न तसाच मागे पडला. केंद्रावर दडपण आणण्यासाठी विरोधी पक्ष सत्तास्थानी असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यानी एकत्र येऊन ही मागणी पुढे रेटण्याचे प्रयत्न केले; परंतु या दबावाचाही उपयोग झाला नाही.

राज्य सरकारे रिझर्व बँकेकडून मोठ्या प्रमाणावर ओव्हरड्राफ्टस्

घेतात. राज्याच्या आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने ही गोष्ट आवश्यक असली तरी या ओव्हरड्राफ्टस्‌मुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठाच ताण पडतो. ज्या राज्यांनी अशा पद्धतीने रकमा उचलल्या आहेत अशा १२ राज्यानी आपले हे व्यवहार पूर्ण करून डिसेंबर-अखेर रिझर्व बँकेच्या या रकमा परत कराव्यात, असा आदेश केंद्र शासनाने दिला. पूरग्रस्त राजस्थानचाच फक्त अपवाद करण्यात आला. १२ राज्यापैकी ११ राज्यांनी, आपण प्रयत्न करून दिलेल्या मुदतीत हा व्यवहार सरळ पातळीवर आणू, असे आश्वासन दिले आहे. प. बंगालने मात्र असे आश्वासन देण्यास स्वच्छ नकार भरला असून ओव्हरड्राफ्टस् सवलतीचा जास्तीत जास्त लाभ या राज्य-शासनाने घेतला आहे. या संदर्भात प. बंगालने नवीन कर लादून रकमा उभ्या करण्याची क्षमता संपल्याचे नमूद केले आहे. केंद्र-शासनाने अबकारी कर वाढवून उत्पन्न ३० कोटी रुपयांनी वाढवले; अन्य करातही वाढ झाल्याने राज्य शासनाला आपले उत्पन्न वाढवण्यास वाव नाही अशी तक्रार केली आहे. उपलब्ध भांडवल आणि अन्य सुविधा यांच्या राज्य व केंद्रामधील वाटपाबाबतच्या सध्याचा धोरणांचा फेरविचार झाला पाहिजे, अशी प. बंगालची मागणी असून ही मागणी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेने उचलून धरली आहे. केंद्र-राज्यांच्या आर्थिक संबंधांचा ही संस्था परिपूर्ण अभ्यास करत आहे. राज्याचे आर्थिक परावलंबित्व कमी होण्याच्या दृष्टीने काय करता येईल या संबंधात या संस्थेने काही सूचना केल्या आहेत. राज्याच्या आर्थिक क्षेत्रामध्ये केंद्र शासनाचे वाढते आक्रमण होत असल्याचे या संस्थेने आपल्या अहवालात नमूद केले आहे. वानगीदाखल सार्वजनिक क्षेत्रामधील कर्जउभारणीचा उल्लेख केला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत या कर्जापैकी राज्यांचा वाटा ६२·७ टक्के होता; परंतु आता परिस्थिती बदलली असून केंद्र सरकार सार्वजनिक क्षेत्रात उभारलेल्या कर्जाच्या रकमेपैकी ६० टक्के रक्कम वापरते, तर राज्याना केवळ ४० टक्के वाटा मिळतो. ही वस्तुस्थिती वर उल्लेखलेल्या संस्थेने आपल्या अहवालात नोंदवली आहे. केंद्रीय अर्थमंत्रालयाने या अहवालाचा गंभीरपणे विचार केला असला तरी झळ पोचलेल्या अनेक राज्य सरकारांनी या अहवालाचा विचार व्हावा, अशी विनंती केली आहे. राष्ट्रपतीनी राज्याना अधिक स्वायत्तता मिळावी व त्यांचे आर्थिक परावलंबित्व कमी व्हावे, अशी मागणी केल्याने राज्य-केंद्र संबंधावरून पुन्हा एकदा वादळ उठले आहे.

## □ गिरणगावात दत्ता सामंत

डॉ. दत्ता सामंत यांच्याबद्दल विविध स्वरूपाची मते असली तरी ते मुंबईच्या कामगार-जगतामधील एक शक्तिशाली व्यक्तिमत्त्व आहे आणि कामगाराना त्यांच्या नेतृत्वाचे जबर आकर्षण आहे' याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. अलीकडेच कामावरून काढलेल्या बेस्ट कामगाराचा जो संप झाला आणि जो यशस्वी ठरला त्यामागे डॉ. सामंत याची ताकद होतीच. बेस्टच्या संपात ते प्रथमच उतरले आणि मोठ्या प्रमाणावर यशस्वीही ठरले. या प्रकरणात जॉर्ज फर्नांडिस याची तशी फरफटच झाली. बेस्टमध्ये सामंत यानी पाय रोवले नसूनही जेव्हा काढलेल्या दोन कामगारांना परत घेण्यात आले आणि जॉर्जने संप मागे घेण्याचा आदेश दिला, त्यानंतरही सामंतांनी बेस्ट-कामगारांसमोर भाषण करून, त्याना कामावर जाण्याचे सांगितल्यावरच कामगार कामावर गेले. बेस्ट-संपाबाबत सामंतांना जो पाठिंबा मिळाला त्यामुळे कामगार जगतामधील अनेक मंडळी चक्रावून गेली आहेत. औद्योगिक जगतामधील कामगारामध्ये मोठी ताकद उभी केल्यावर दत्ता सामंत आता मुंबईच्या गिरणगावात उतरले आहेत. आज मुंबईत साठ कापड-गिरण्या असून या गिरण्यांतून दोन लाख पन्नास हजाराहून जास्त कामगार काम करत आहेत. आतापर्यंत गिरण-कामगार हा मुख्यत्वे इंदिरा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय मिल मजदूर संघाशी बांधलेला आहे. खेरीज, उजव्या कम्युनिस्टांचेही या क्षेत्रात काम असून त्याच्यामागे गिरण-कामगारांचीही बऱ्यापैकी शक्ती आहे. गिरण-कामगाराच्या प्रश्नाबाबत शिवसेनेनेही लक्ष घातले असून एक दिवसाचा त्याचा 'गिरणी-बंद' चांगलाच यशस्वी ठरला. सामंतांनी गिरण-कामगाराची एक नवीन युनियन स्थापन केली असून, या युनियनच्या वतीने जी पहिली सभा घेण्यात आली त्या सभेला उसळलेली प्रचंड गर्दी आणि मिळालेला कामगारांचा प्रचंड प्रतिसाद पाहता, दत्ता सामंत गिरणगावात मजबूतपणे उभे राहणार, असे दिसते आहे. डॉ. सामंत तसे कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधलेले नाहीत. मुख्यमंत्र्यांबरोबर त्यांचे सध्या सलोख्याचे संबंध दिसतात. एक्सप्रेस गटाच्या वृत्तपत्रामध्ये दत्ता सामंत यांनी जो संप घडवून आणला त्यामागे अंतुलेजीचीच प्रेरणा होती, असे बोलले जाते. आता गिरणगावात जर सामंत स्वतःच्या ताकदीवर अथवा शिवसेनेच्या सहकार्याने उभे रहात असले तर अंतुलेजीनाही ते हवे असावे. अंतुलेजीच्या अडचणीच्या काळामध्ये त्यांच्यावर चारही बाजूनी टीका होत असताना राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या एका मोठ्या गटाने अंतुले-विरोधी हालचालीमध्ये सक्रीय भाग घेतला होता. या नेत्याचा वसंतदादांना पाठिंबा असून, दादांशी हा गट अजूनही एकनिष्ठ आहे. 'दत्ता सामंत' या नावामध्ये जादू आहे याची जाणीव कामगार क्षेत्रामधील डाव्या आघाडीच्या संघटनांनाही झाली असून या संघटनांनीही डॉ. सामंताचा पाठपुरावा चालवला आहे. त्याच्याशी सहकार्य करण्याची तयारी दाखवली आहे. मुंबईतल्या गिरणगावामधील कामगार जगतामध्ये दत्ता सामंत व शिवसेना यानी प्रवेश केल्यामुळे नवे चैतन्य आले असून कामगारही संघर्षाच्या आणि संपाच्या तयारीत आहेत. आपल्या पहिल्याच सभेमध्ये डॉ. सामंतानी पंधरा दिवसाची मुदत दिली आहे. त्या मुदतीत काही सन्मान्य तडजोड न झाल्यास गिरण-कामगाराना बेमुदत संपावर जाण्याचा आदेश ते देतील आणि त्याची मोठ्या प्रमाणावर अंमल-बजावणी होईल. असा संप झालाच तर कितपत यशस्वी होतो आणि डॉ. सामंत कामगाराच्या मागण्या मान्य करण्यात कितपत यशस्वी होतात यावर त्यांचे गिरणगावामधील भवितव्य अवलंबून आहे. आज तरी चित्र असे आहे की, डॉ. सामंत सर्वांनाच हवे आहेत. त्यांच्या सहाय्याने राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेत्यांना धडा शिकवता आला तर तो मुख्यमंत्र्यांनाही हवा आहे. गिरणगावात पाय रोवण्यास उपयोगी पडणार असल्याने शिवसेनेलाही डॉ. सामंत हवेच आहेत. गिरणगाव हातून सुटू नये म्हणून कम्युनिस्टही सामंतांचा पाठपुरावा करतच आहेत. तात्पर्य, डॉ. सामंत गिरणगावात आले आहेत आणि त्यांच्या स्वागताचे नगारे वाजू लागलेले आहेत. ते शरद काँग्रेसमध्ये जाणार असा बोलवा होता; परंतु ते त्या वाटेला गेले नाहीत. डॉ. सामंताच्या राजकीय उद्देशाबाबत शंका असली तरी कामगार-नेता म्हणून त्याना मान्यता आहे आणि कापडगिरणी कामगार आणि बेस्ट-कामगार ज्या आपुलकीने त्याच्याजवळ गेले आहेत आणि जितक्या मोठ्या प्रमाणावर त्याचे स्वागत झाले आहे त्यावरून डॉ सामंत गिरणगाव हलवून सोडणार अशी लक्षणे दिसत आहेत महिन्याभरातच त्यांच्या ताकदीची कसोटी लागेल आणि येऊ घातलेला संप किती यशस्वी होतो हे समजून येईल. □

## सैबेरियातून केलेल्या चित्तथरारक पलायनाची कथा ( लेखांक दुसरा )




**अनुवाद : श्रीकांत लागू**

### पलायन-योजना

'तो पहा तिथं उभा आहे.' मॅकोव्हस्कीनं एका माणसाकडे बोट दाखवून म्हटलं. दुसऱ्या दिवशी दुपारच्या सुटीत आम्ही माणसं न्याहाळत होतो. रुंद खांद्यांचा माणूस होता तो. अत्यंत ढगळ कपडे घातले असले तरी त्याची पीळदार शरीरयष्टी लपू शकत नव्हती.

'तू घोडदळातून आलायस्. तेव्हा त्या जातीची माणसं तू सहज ओळखू शकशील !' मॅकोव्हस्की म्हणाला.

'कोण आहे तो ?'

'पोलिश आहे. अ‍ॅन्टन पालुकोविज्. पोलंडच्या घोडदळात सार्जंट होता. आहे ४१ वर्षांचा; पण अत्यंत दणकट ! कुठल्याही प्रसंगाला तोंड देईल असा आहे. अत्यंत तयार गडी आहे ! त्याच्याबरोबर कुठंही उडी घ्यायला मी मागे-पुढे पहाणार नाही. आपण वाटलं तर बोलू या त्याच्याशी !'

आम्ही त्याला गाठून त्याच्याशी बातचीत केली. मला अ‍ॅन्टन एकदम आवडला. त्यानं आमची योजना एखादी युद्धाची कामगिरी स्वीकारावी तितक्या उत्साहानं तात्काळ स्वीकारली. मी पोलिश घोडदळात लेफ्टनंट होतो याचाही त्याला आनंद झाला.

'आपण हे करू या !' तो म्हणाला, 'हे काम सोपं नाही; पण आपण नक्की पार पाडू.'

संध्याकाळी कोलमेनोला गाठलं. तो हसला. म्हणाला, अरे 'तू आहेस का ? बोल !'

'कोलमेनो, मी इथून आणखी काही जणांबरोबर पळायचं ठरवलं आहे. तू येणार का ?'

त्यानं माझ्या खांद्यावर आपला जबरदस्त पंजा ठेवून विचारलं, 'खरंच म्हणतोयस् तू ? पूर्ण विचार केलायस् का तू ?'

मी मान हालवून म्हणालो, 'विचार पक्का आहे. लवकरच अंमलात आणायचा निश्चय झाला आहे !'

तो हसला आणि आपल्या दणकट हातानं दोनदा थोपटून म्हणाला, 'मीही येईन. नुसतं येईन नव्हे, तर गरज लागली तर तुला खांद्यावर वाहूनसुद्धा नेईन !'

आता आम्ही चौघे झालो. तातडीनं आमच्या योजनेला आकार द्यायचं काम सुरू झालं. मार्च संपत आला होता, याचा अर्थ फार सवड मिळणार नव्हती. एकूण परिस्थितीचं फार निरखून अवलोकन करणं सुरू झालं. अनेक गोष्टी लक्षात येऊ लागल्या. त्यापैकी एक म्हणजे, कुंपणाबाहेर रात्रीची गस्त चालू असताना संत्री पुढे जायचे आणि गस्ती–कुत्रे मागे. मागे ठेवल्याबद्दल ते कुत्रे सारखे गुरगुरायचे. हे भुंकणं साधारण दोन तासांच्या अंतरानं ऐकायला यायचं. असंही लक्षात आलं की, त्यांची फेरी उलट घडीच्या दिशेनं व्हायची. फेरीची सुरुवात दक्षिणेकडच्या सर्वांत लांबीच्या बाजूनं व्हायची. तेव्हा एक विचार नक्की झाला, तटबंदी ओलांडायची ती दक्षिण बाजूला असलेल्या बराकीत. तंबाखूची लाच देऊन

जागा पटकावणं सुरू झालं.

अॅण्टननं झारोला या कटात सामील केलं. युजीन झारो. बाल्कन राष्ट्रातून आलेला युगोस्लाव्ह असावा. तिशीचा होता. रशियनाच्या तावडीत सापडण्यापूर्वी कारकून होता. ' वाटेत थोडी मौजमजा हवी असेल तर झारोसारखा मनुष्य नाही ! ' अॅण्टननं सांगितलं.

मॅको, अॅण्टन आणि मी अशा आमच्या तिघांच्या चाचणी समितीनं झारो भोजनरांगेत असताना त्याची पहाणी केली. उंचीनं ठेंगणासाच होता; पण बांधा मात्र चांगला मजबूत होता. जवळपास काळ्या डोळ्यांत एक हसरी आणि अत्यंत मिस्किल छटा झळकत होती. आजूबाजूच्या कैदी-जनांत त्याच्यामुळं हास्याचे फवारे उडताना दिसत होते.

' ठीक आहे. घेऊ या त्याला आपल्यात ! ' मी ठराव पास केला.

' मला प्रवास करायची आवड होतीच. हा बेत झकास जमेल ! ' आमच्यात सामील होताच झारो म्हणाला.

' एक लक्षात ठेव ! ही काही मौजेची सहल नाही. भयानक अडचणींना तोंड द्यावं लागणार आहे. ' मी सुनावलं.

' मला कल्पना आहे आणि तरीही मी तुमच्याबरोबर येणार आहे ! ' तो म्हणाला. थोड्या वेळानं म्हणाला, ' या रशियन गाढवांना विनोदबुद्धी कशाशी खातात हे माहीतच नाही. त्यांच्यापासून लांब जायला मला आवडेलच ! '

झारो आला आणि आम्ही पाचजण झालो.

माझा कारखान्यातल्या शेगडीमागे पाव सुकवण्याचा कार्यक्रम चालूच होता. सुकवून झालं की दूर कोपऱ्यात घसरपट्ट्यांच्या प्रचंड ढिगामागे लपवून ठेवायचं.

सहावा भिडू कोलमेनोनं आणला. झकॉरियस मार्चिन्कोव्ह. २८ वर्षांचा हा वास्तुशिल्पी लिथुआनियातून आला होता. उंचापुरा, दणकट बांध्याचा आणि अत्यंत तरतरीत. पिंगट डोळ्यांचा. त्याला पहाताक्षणीच माझं त्याच्याविषयी अनुकूल मत झालं. त्यानं या प्रकारच्या योजनेचा खूप विचार केलेला दिसत होता. येणाऱ्या अनंत अडचणी लक्षात घेऊनही आपल्या प्रयत्नांना यश येण्याची आशा त्याला वाटत होती.

आमच्या गुप्त चर्चेत सार्जंट अॅण्टननं श्मीडचं नाव सुचवलं. नावावरून हा रुसो जर्मन असावा असा माझा समज झाला. आमच्या तुरुंग-वाटेवर उरलमधल्या ऊफा इथं त्याला गाडीत चढवलं होतं. ही जर्मन नावाची रशियन माणसं म्हणजे ' पीटर द ग्रेट 'नं कित्येक वर्षांपूर्वी जे जर्मन कुशल कारागीर आयात केले होते त्यांचे वंशज असावेत, असा माझा अंदाज होता.

मी सार्जंटला विचारलं, ' तो जर्मन आहे काय ? '

' मला ठाऊक नाही; पण त्याचं नांव श्मीड आहे एवढं खरं. तो रशियन अतिशय चांगलं आणि सफाईनं बोलतो. तो इतरांपासून साधारणपणे अलिप्त असतो. खूप विचारही करतो. मला त्यानं अनेक गोष्टींबाबत फार चांगला सल्ला दिला आहे. मी त्याची शिफारस जरूर करीन ! '

मॅकोनं आणि मी श्मीडला भेटण्याची तयारी दर्शवताच अॅण्टन खूष होऊन म्हणाला, ' श्मीड कुठला ते मी तुम्हाला दाखवीन ! '

श्मीड भोजनरांगेत कॉफीसाठी पुढे सरकताना अॅण्टननं मानेनं खुणावलं. मॅको आणि मी त्याच्याजवळ सरकलो.

प्रथमदर्शनीच या सर्व साहसामध्ये तो अडचणींना कितपत तोंड देऊ शकेल याविषयी माझ्या मनात शंका निर्माण झाली. चांगलाच वयस्कर दिसत होता. निदान पन्नाशीचा असावा. तसा अंगा-खांद्याने मजबूत दिसत होता. रुंद आढं आणि कंबरेतही बारीक होता. दाट केसांत आणि दाढीत वयाची निशाणी दिसू लागली होती. आम्हाला जवळ येताना पाहून, बहुधा अॅण्टननं आधी कल्पना दिल्यामुळं, त्याच्या चेहऱ्यावर कसलंच आश्चर्य उमटलं नाही. ' आम्हाला तुमच्याशी काही बोलायचंय्. ' मी रशियनमध्ये म्हणालो. तोही त्याच भाषेत उत्तरला, ' तुमच्या बराकीच्या दिशेनं चला, मी तुम्हाला गाठतो ', असं म्हणून तो रांगेत पुढं सरकला.

हातामध्ये कॉफीचा बंपर घेऊन तो आम्हाला येऊन मिळाला आम्ही थांबलो. आमच्याकडे पाहून हसला व म्हणाला, ' मित्रांनो, माझं नाव ' स्मिथ. ' मला कळलं की, तुमची काही योजना आहे ' आम्ही आ वासून बघतच राहिलो. ' स्मिथ ' ! आम्ही पुनरुच्चार केला.

' होय माझं नाव स्मिथ, मी अमेरिकन आहे. तुम्हाला फारच आश्चर्य वाटलेलं दिसतंय् ! ' त्याला एकूण गंमत वाटत होती.

' आश्चर्य कसलं ? 'आमची तर त्यानं चक्क दांडीच उडवली होती. तो रशियन तर सुरेख बोलत होता. कसलाही अनाघाती उच्चार जाणवत नव्हता.

' विश्वास ठेवणं कठीण आहे. ' मी म्हणालो; ' पण मग तू इथं कसा आलास ? '

' तुमचा विश्वास बसणार नाही म्हणून पुन्हा सांगतो. मी अमेरिकन आहे. व्यवसायानं इंजिनियर आहे. आम्हाला साधारण ९ ते १० वर्षांपूर्वी मॉस्कोमधील भुयारी रेल्वेचं, मेट्रोचं बांधकाम करण्यासाठी रशियन सरकारनं बोलावलं होतं. ५० जण होतो. त्यांनी मला ३६ साली पकडलं आणि ठरवून टाकलं की, मी कुणी तरी धंदेवाईक हेर आहे. बस् ! आणि २० वर्षांची शिक्षा ठोठावली ! ' तो कॉफी भुरकत बोलत होता. अतिशय सहजसंथ, एखाद्या पट्टीच्या वक्त्याप्रमाणे त्याची शैली होती. आम्ही बावळटासारखे त्याच्या तोंडाकडे पहात राहिलो. ' मी माझा बंपर परत भरून आणतो आणि मग आपण बराकीकडे बोलत बोलत चालू ! '

आम्ही स्मिथला आमच्या झोपडीत आमंत्रण दिलं. एप्रिल सुरू झाला होता. एव्हाना मी आणि मॅकोनं शेवटच्या बराकीत दरवाज्याजवळच्या जागा मिळवल्या होत्या. कोलमेनोनंही तिथं प्रवेश मिळवला होता आणि बाकीचेही लवकरच आमच्याच बराकीत जागा मिळवतील अशी आशा होती. मॅकोच्या बाकड्यावर आम्ही जमलो. आजूबाजूचा कानोसा घेत मी योजनेची कल्पना दिली. यश मिळायचं असेल तर दक्षिण दिशेचा मार्ग अवलंबावा लागेल. अतिशय दीर्घ पल्ला आहे; पण इलाज नाही ! आमच्यापैकी काहीजण मात्र पूर्वेकडे कामचारका गाठण्याची कल्पना सोडायला नाखूष होते.

त्यानं उत्तर द्यायची अजिबात घाई केली नाही. त्यानं अत्यंत हुषारीनं काही शंकांचं निरसन करून घेतलं. त्याला विचार करायला संधी देत आम्ही स्वस्थ बसून राहिलो. थोड्या वेळानं तो म्हणाला, ' मित्रांनो, तुमच्यात सामील व्हायला मला अभिमानच वाटेल.

मलाही वाटतं की, दक्षिण दिशेचा मार्गच योग्य आहे. माझ्यावर विश्वास ठेवा !'

आम्ही स्मिथबरोबर बराच वेळ बसलो. एकमेकांच्या वैयक्तिक माहितीची देवाण–घेवाण केली. आमच्या रशियातल्या वास्तव्याला, इथल्या हालचालींना विशिष्ट वळण होतं. आमच्या अटक–कथा साधारणतः एकाच धाटणीच्या होत्या. स्मिथ फक्त वेगळा होता. त्यानं आम्हाला खूप काही सांगितलं; पण आपलं बारशातलं नाव काही सांगितलं नाही ! त्या वेळी नाही आणि नंतरही नाही. आम्ही सहा युरोपीय एकमेकाला पहिल्या नावानं संबोधू लागलो; पण अमेरिकन मात्र नुसता मिस्टर स्मिथच राहिला !

त्याच्या चेहऱ्यावर जखमेचा एक प्रचंड व्रण दिसत होता. डोक्याच्या उजव्या कोपऱ्यापासून खाली मानेच्या डाव्या कोपऱ्यापर्यंत जवळपास नऊ ते दहा इंचांची जखम होती. मेट्रोच्या बांधकामावरची परात कोसळून अपघात झाला, असं तो म्हणाला.

'हा एक अपघात सोडला तर माझं मॉस्कोमध्ये छान चाललं होतं. कामसुद्धा तसं मनोरंजक होतं. पगारही भरपूर मिळत होता. रशियनांच्याबरोबर काम करायला अवघड काहीच जात नव्हतं. खरं पहाता त्यांच्यामधेही चांगले कुशल तंत्रज्ञ होते; पण महत्त्वाच्या जागा मात्र माझ्यासारख्या परदेशी माणसाकडे होत्या. त्याचं साधं कारण असं असावं. मेट्रोचं बांधकाम हा त्यांच्या प्रगति–योजनेतला फार मोठा टप्पा होता. तेव्हा त्यात जर काही घोटाळा झालाच तर आमच्यासारख्या परकीयाच्या डोक्यावर खापर फोडायला सोपं जावं. मी एकूण खूष होतो. मला रशिया खूप पहायचा होता आणि त्या अनुभवासाठी माझी आर्थिक स्थितीही उत्तम होती.

युद्धामधून थोडी उसंत मिळून पंचवार्षिक योजनेच्या आधारे प्रगती करणाऱ्या मॉस्कोसारख्या शहरात स्मिथ आणि त्याचे मित्र अत्यंत सुखात होते. रहायला उत्तम जागा होत्या. स्थानिक लोकांचा जिथे प्रवेश परवाना लागत असे तिथे हे लोक चैनीच्या वस्तूंची खच्चून खरेदी करत असत. स्मिथकडे मोटार होती आणि त्यातून तो मनसोक्त भटकत असे आणि तेच बहुधा रशियन गुप्त पोलिसांच्या डोळ्यावर आलं असावं. त्याच्याबद्दलची, त्याच्या हालचालींची माहिती गुप्त अहवालात जमा होत होती. त्याला एक रशियन मैत्रिणही होती. ते पोलिसांना आवडत नसावं; पण ते जाणून-बुजून दुर्लक्ष करीत होते.

'काही तरी धोका आपल्याकडे वाटचाल करतोय हे मला कधी कळलंच नाही. सुमारे एक वर्षाच्या कामानंतर करारानुसार ठरलेला पगार अचानक दुप्पट केला गेला. मी तर कसलीच मागणी केली नव्हती. बांधकामाच्या अत्यंत समाधानकारक प्रगतीचं हे बक्षीस असावं. तेव्हापासून त्याचं माझं चांगलं सूत जमतंय असं वाटायला लागलं होतं.'

१९३६ सालच्या एका संध्याकाळी स्मिथ आपल्या मैत्रिणीला आपल्या राहत्या फ्लॅटवर रहायला घेऊन गेला होता. मध्यरात्रीनंतर केव्हा तरी गुप्तहेर खात्याच्या एका तुकडीनं त्याच्या घरावर धाड घातली. अत्यंत सफाईनं घातलेली धाड होती ती ! आजूबाजूच्या फ्लॅटमधल्या रहिवाशांना जराही पत्ता लागला नाही. त्या दोघांनाही पकडण्यात आलं. त्यानंतर त्याला ती पुन्हा दिसलीही नाही ! पहाट झाली तेव्हा स्मिथला लुब्यांकामधल्या एका कोठडीत डाबण्यात आलं होतं. त्यानंतर सहा महिने तेथेच त्याचा मुक्काम होता. अमेरिकन दूतावासातील कुठल्याही अधिकाऱ्याची साधी भेटही त्याला नाकारण्यात आली !

'नशिबाचा काय चमत्कारीक फेरा आहे बघा !' स्मिथ म्हणाला, 'आदल्या रात्रीपर्यंत एक अत्यंत यशस्वी, उपयुक्त इंजिनियर आणि दुसऱ्या दिवशी महाघातकी परकीय हेर ! याचा अर्थ माझ्या दैनंदिन हालचालींवर लक्ष होतंच; पण मी घरी पाठवत असलेल्या पत्रावरही त्याचं लक्ष असलं पाहिजे. इथल्या गमती-जमती पत्रात लिहिल्या, त्याचा अर्थ त्यांनी इथली '**माहिती**' मी अमेरिकन दोस्तांना कळवत होतो असा लावला होता.

'त्यानंतरचा खटला अत्यंत गुप्ततेच आणि लुटुपुटीचा चालवला गेला. वीस वर्षं सक्तमजुरी लावली. माझी गाडी, माझ्या खाजगी मालकीच्या इतर वस्तू जप्त केल्या. मला वाटतं मला उदारपणे दिलेला जादा पगार याच मार्गाने वसूल केला असावा !'

त्यानं आमच्या योजनेविषयी खूप आस्थेनं चौकशी केली. सगळ्या योजनेचं जास्तीत जास्त स्पष्ट चित्र त्याला हवं होतं. त्यानं अनेक महत्वपूर्ण शंकाही विचारल्या. एकूण अंतरांबद्दलही तो अत्यंत विचक्षण होता. नुसती मंगोलियाची हद्द बर्फातून फरफटत गाठायची म्हणजे साधारण १००० मैलांची चाल आहे, याचीही कल्पना त्याच्या मनात होती. आम्ही बराच वेळ कुजबुजत बोलत होतो. त्याच बराकीतले इतर सहवासी अंगावरची बर्फुल झटकून टाकत, शेगडीजवळ जाऊन ऊब घेत, इकडे-तिकडे त्यांची वर्दळ चालूच होती; पण त्याना आमच्या बेताचा सुगावा लागला किंवा नाही हे कळत नव्हतं; पण बहुधा नसावा. स्मिथलाही आमच्याच छपराखाली आणणं आवश्यक होतं. त्याबाबतीत मदत करण्याचं आम्ही त्याला आश्वासन दिलं; पण एकूण वेळ थोडा होता. घाई करायला हवी होती.

तो उठला, विचारमग्न होत मान हलवली आणि म्हणाला, 'बराय् मंडळी, मी निघतो, भेटू लवकरच !' तो गेला. सर्वांनी त्याचा सातवा आणि शेवटचा भिडू म्हणून उत्साहानं स्वीकार केला होता.

एप्रिलचा पहिला आठवडा संपताना आम्ही सर्व जण एकाच झोपडीत आलो होतो. प्राथमिक तयारीचा एक भाग यशस्वी झाला होता. साधनसामुग्री, शिधा साठवण्याचं काम जोमानं चालू होतं. कोलमेनोनं त्याच्या लाकूड वाहण्याच्या फेऱ्यांच्या वेळी, बाहेरच्या तारावरची कातडी, एकएक करून बरीच काढून आणली होती. कारखान्यात एक जाडजूड ६ इंची खिळा मी सपाट करून, धार लावून तयार केला. अनेक गोष्टींसाठी त्याचा उपयोग होऊ शकत होता. आम्ही जमा केलेल्या कातड्यामध्ये सेबल, अर्मीन, सैबेरियन कोल्हे यांची कातडी होतीच. शिवाय कोणा अधिकाऱ्याने शिकार

**नुसती मंगोलियाची हद्द....बर्फातून फरफटत....१००० मैल....**

ठलेल्या हरणाचंही एक कातडं आम्ही मिळवलं होतं किंवा पळवलं होतं, असं म्हणू या. कातडयाचे तुकडे करून त्याच्याच वादयांनी मोजडया शिवून तयार केल्या, कबरेचे पट्टे केले. थंडीपासून बचाव करण्यासाठी केसाळ कातडं (सैनिकांच्या लक्षात येऊ नये म्हणून) आतल्या बाजूला करून जाकिटाच्या आत घालण्यासाठी बंडया केल्या. गायांचं रक्षण करण्यासाठी आवरणं तयार केली.

आमचं हे सर्व काम रात्रीच्या वेळी चालत असे. सतत भीतीचं दडपण असायचं, कोणी चहाडी-चुगली करील की काय ! कारण आमच्या कामाचा अहोरात्र चालणारा झपाटा कुणाच्याही सहज डोळयांवर आला असता. कोणी असा निघालाच असता तर त्याला रशियन सैनिकांकडून जादा शिधा, पण नक्कीच मिळाला असता; पण कुणी सूर्याजी पिसाळाचा वंशज निघाला नाही !

कर्नल–पत्नीला, मला सहा साथीदार मिळाल्याचं सांगितलं. ते कोण अशी चौकशी तिनं केली नाही, म्हणजे तिला त्याची गरजही वाटली नसावी. तिनं मला एक अत्यंत अनमोल भेट दिली. कुऱ्हाडीचं एक धारदार पातं होतं ते !

'हे पातं मला जन्मभर खात राहील ! आयुष्यात ही पहिलीच चोरी मी केलीय !' तिचं मन तिला खात होतं.

मी कुऱ्हाडीसाठी दांडा तयार केला. तो दांडा आपल्या विजारीच्या मागच्या पट्टयात जाकिटाच्या आड कायम लपवण्याची जबाबदारी कोलमेनोनं घेतली.

अशीच आणखी एक अत्यंत उपयुक्त वस्तू मी तयार केली. १ फूट लांब आणि ३ इंच रुंदीच्या एका जाड करवतीच्या पात्यापासून एक सणसणीत सुरी तयार केली. आकार देण्यासाठी कारखान्यातील शेगडी आणि धार काढण्यासाठी दगड होताच. लाकडाचे दोन तुकडे चामडयाने भक्कम बांधून त्याची मूठ तयार केली. कोलमेनोनं कुऱ्हाडीचा ताबा घेतलाच होता. मी सुऱ्याचा पालक झालो. यापैकी काहीही उघडकीला आलं असतं तर कंबक्तीच होती !

वाटेत शेकोटी पेटवायची झाली तर काय करायचं, याचंही उत्तर आम्ही शोधलं होतं. आगपेटयांचा विचार करणं वेडेपणाचंच होतं इतक्या त्या दुर्मिळ होत्या; पण त्याऐवजी एका प्राचीन मार्गाचा अवलंब करायचं ठरवलं होतं. त्या भागात झाडांवर बुरसटलेल्या शेवाळासारखं किंवा स्पंजासारखं काही तरी वाढत असे. रशियन भाषेत त्याला 'गुबका' म्हणतात. ते उकळून वाळवलं की त्याचा जळण म्हणून उत्तम उपयोग होत असे. ते तयार करून आमच्या जाकिटांतून भरून ठेवू लागलो. ठिणगीसाठी गारगोटया आणि लोखंडी खिळे यांचाहि साठा करून ठेवला.

१९४१ एप्रिलच्या १३ तारखेला ईस्टरचा रविवार येत होता. त्याआधी ६ तारखेलाच आमची तयारी पूर्ण झाल्यासारखीच होती. तयारीच्या साधनांनी आमची बाकडी भरली होती. डोकं आणि मान एकाच वेळी झाकली जाईल अशा केसाळ कातडयाच्या सात '*बाला क्लाव्हा*' टोप्या तयार केल्या होत्या. पलायनाची जय्यत तयारी झाली होती. कातडी, कुऱ्हाड, सुरा, सुका पाव वगैरे. त्यातच त्यातलं काही चोरीला तर जाणार नाही ना, अशी धास्तीही सतत मनात असायची.

आणि त्याच दिवशी कर्नल-पत्नीनं निरोप पाठवून मला बोलावलं. 'नवरा याकुत्सला गेला आहे.' म्हणूनच त्या दिवशीच्या कवायतीला तो हजर नव्हता. 'तुमच्यासाठी वाणसामानाच्या गोणत्यापासून ७ थैल्या केल्या आहेत. एक एक करून तुम्हाला त्या न्याव्या लागतील !' हे सर्व बोलताना ती अतिशय शांत भासत होती. माझं मात्र काळीज धडधडत होतं. पहिली थैली तिनं दिली तेव्हा ती गरजेच्या वस्तूंनी भरलेली पाहून मी थक्कच झालो ! ही न्यायची कशी ? जाकिटाच्या आत काखेजवळ ती दाबून धरली. दोन्ही हात विजारीच्या खिशात घातले आणि सावधपणे सटकलो. रोज एक याप्रमाणे सातही थैल्या हस्तगत केल्या !

शेवटच्या काही दिवसांत आम्ही एक मेंढीच्या कातडयाचं जाकीट मिळवलं. कोणा सैनिकानं वापरून जीर्ण झाल्यावर टाकून दिलं होतं. चोर–शिकारी वापरतात तसली युक्ती आम्हाला उपयोगी पडणार होती. जंगलात चोरून शिकार करताना कुत्र्यांना आपला वासावरून माग काढता येऊ नये म्हणून हे चोर–शिकारी आपल्या माग असलं मेंढीचं कातडं फरफटत नेत. म्हणजे त्याच्या उग्र वासात मानवी वास लपत असे. याच युक्तीचा वापर करून बघायचं आम्ही ठरवलं होतं.

हवामानाचा अंदाज घेत योग्य संधीची आम्ही वाट पहात होतो. आम्हाला बर्फुलाचा पाऊस हवा होता. चांगला लफ्फेदार बर्फुलांचा जोरदार वर्षाव होणं अत्यंत आवश्यक होतं. त्यामुळं आमचं पलायन लपणार होतं. सोमवारी थंडी खूप होती; पण आकाश स्वच्छ होतं. मंगळवारी जोरदार वाऱ्यासह गाराचा पाऊस कोसळला. बुधवारी मात्र सकाळी दहा – अकरा नंतर आम्हाला हव्या असलेल्या संधीची लक्षणं दिसू लागली. आकाश शिशाच्या रंगासारखं काळंभोर होऊन, बर्फुलांच्या पावसाला सुरुवात झाली. जोर वाढला. 'निर्मनुष्य' जागेत बर्फ साचू लागला. तारेपर्यंतची जागा भरून येऊ लागली. दुपारच्या भोजनसुट्टीत आम्ही सात जण एकमेकांना भेटलो. इशारा-निरोप दिला गेला 'हाच तो दिवस !'

दुपारी ४ वाजता घसरपट्टीच्या कारखान्यातून मी बाहेर पडलो, तो शेवटचाच ! बाहेर पडताना माझ्या फुफैका जाकिटात सुक्या पावाचा साठा लपवला, सुरा पोटरीभोवती गुडाळला. त्याचा थंडगार स्पर्श अंगावर काटा आणत होता. संध्याकाळचं कॉफी-पावाचं भोजन संपवलं आणि एकएक, दोघदोघं असे बराकीत परतलो.

बराकीत योजनेवर शेवटची चर्चा, दबल्या आवाजात, पण जोरात चालू झाली. संडासाच्या फेऱ्या वाढल्या. त्या फेऱ्यांतच ही चर्चा सुरू होती. फार घाई करुन उपयोगी नाही. सर्व छावणी तळ विसावल्यानंतरच हालचाल करायला हवी होती. स्मिथनंच ही कल्पना मांडली आणि पटवली. मध्यरात्र हीच पळायला योग्य वेळ, तोपर्यंत आपण अत्यंत शांत राहिलं पाहिजे. चेहऱ्यावर कसलीही अधीरता दिसता उपयोगी नाही. त्यानंच हे सुचवलं. आम्हालाही ते पटलं. मधल्या काळात बर्फुलं मात्र आशीर्वाद दिल्यासारखी पडत होती. चांगली मोठी मोठी कापसाच्या बोचक्यासारखी पडत होती. सगळा परिसर गच्च भरून गेला.

तेवढयात झारोनं आचरट कल्पना माडली. तो म्हणाला 'आज बुधवार आहे. पॉलट्रिकच्या प्रचारसभेला जाऊन बसू या. तेवढाच वरा वेळ जाईल !'

आम्ही हसलोच. पण मॅको तेवढ्यात म्हणाला, ' खरंच, काय हरकत आहे ? जाऊ या. पॉलट्रिकलाही बरं वाटेल. '

शेवटी आम्ही सातहीजण निघालो. आमचा मौल्यवान खजिना आपापल्या बाकड्यावर तसाच ठेवून दिला होता. दिवसभर इतकं चांगलं घडत असताना शेवटच्या क्षणी वाईट काहीही होऊ शकणार नाही, असा मनभर विश्वास आम्हाला वाटत होता. आम्ही प्रचार-वर्गात अगदी मागच्या जागांवर बसलो. त्यानं आश्चर्योद्गार काढत आमचं स्वागत केलं. आम्हीही सस्मित त्याचा स्वीकार केला. चेहरे अत्यंत स्वस्थचित्त ठेवले होते.

आजवर हजर राहिलेल्या राजकीय सभांमधे त्या रात्रीची सभा अत्यंत थरारक झाली. अर्थात त्याचं श्रेय पॉलट्रिकच्या भाषणाला अजिबातच नव्हतं. उषाकॉव्हच्या गैरहजेरीत तोच तुरुंग-छावणीचा सर्वेसर्वा होता. त्यामुळे जोषात होता. तेचतेच चऱ्हाट पुन्हा ऐकलं. रशियानं राज्यक्रांती करून घडवलेला चमत्कार, श्रमजीवींचं खरंखुरं मोल आम्हीच कसं जाणलं, राष्ट्रशिस्तीच्या चौकटीत राहून पाळायच्या स्वयंशिस्तीचं महत्त्व, साम्यवादी विचाराचं जगात वाढत चाललेलं महत्त्व. अनेक विषय त्यात होते.

साधारण दीड तास त्याची बडबड ऐकून आम्ही जायला निघालो. एकमुखानं ' गुड नाइट ' केलं. त्यानंही ' गुड नाइट ' म्हणून प्रतिसाद दिला,

आमच्या बराकीत सर्वांची विसावण्याची तयारी चालू होती. दाराजवळच्याच बाकड्यांवर स्मिथ आणि झारो होते. त्यांनी आम्हाला इशारा करायचा होता. आम्ही आपापल्या बाकड्यावर चढून वाट पहात आडवे झालो. आम्ही सहाही जण सताड जागे होतो; पण माझ्याच खालच्या बाकड्यावर कोलमेनो मात्र मदसप्तकात घोरायलाही लागला.

माझ्या हृदयातील ठोके मलाच धाडधाड ऐकू येऊ लागले. मला आठवलं की, आपण कर्नल-पत्नीचा निरोपही घेतला नाही. कदाचित तिलाच ते अवघड वाटलं असतं.

किती तास गेले कुणास ठाऊक, वेळ जाता जात नव्हता. बराक हळहळू शांत झाली. क्वचित कुणाच्या घोरण्याचा आवाज असेल किंवा कुणी तरी झोपेत बडबडत असेल, तेवढंच.

स्मिथनं माझ्या खांद्याला स्पर्श करून म्हटलं, ' आत्ता ! '

मीही कोलमेनोला हळूच जागं करून म्हणालो, ' आत्ता ! '

¤

## पलायन

आमच्या थैल्याचे बंद हातात धरून आम्ही बाकड्यांवरून झटक्यात उतरलो. गादीवजा शेवाळं उशीच्या जागी रचून ठेवलं. ' सगळे तयार ?' मी विचारलं, सगळ्यांकडून घशातल्या घशात उत्तर आलं ' होय ! ' 'कुणाला अजून विचार बदलायचाय ?' कोणाकडूनच उत्तर आलं नाही.

' चला तर मग ! ' पॅको म्हणाला.

मी दाराजवळ थैली टाकली आणि बाहेर पाऊल ठेवलं. सगळी छावणी शांत होती आणि धमाल ' कापूस ' वृष्टी चालू होती. तारेचं कुंपण जवळपास कुठे दिसेनासं झालं होतं. आग्नेयेचा मनोरा हे आमचं सगळ्यात जवळचं धोक्याचं ठिकाण; पण तिथून २० यार्डांवरचसुद्धा काही दिसू शकत नव्हतं. इतर तुरुंग-छावण्यांतून असतात तसे प्रकाशझोत, विजेच्या तारा वगैरे काहीही नव्हतं याबद्दल आम्ही त्यांचे आभारच मानायला हवेत.

तारांचं आतलं कुंपण आमच्यापासून १०० यार्डांवर होतं. बर्फामुळं एकजीव घट्ट झालेल्या तारांचं भेंडोळं जमिनीच्या उंच - सखलपणाला बिलगून नव्हतं ही गोष्ट आम्ही पूर्वीच हेरली होती. ती अजूनही तशीच असेल अशी आशा आम्हाला वाटत होती. त्यावरच सर्व अवलंबून होतं. आमच्या समोरच जमिनीचा भाग थोडा खालवटला होता. तिथला बर्फ थोडासा उकरला तर तारांच्या खालून पलीकडे निसटता येईल अशी खात्री होती.

एकएक मिनिटाच्या अंतरानं आम्ही पुढं सरकू लागलो. झारो सगळ्यांत पुढं होता. पहिल्याच फटक्यात त्याला योग्य जागा सापडावी अशी प्रार्थना आम्ही करत होतो. त्याच्यामागून लियुआनिअन, मग स्मिथ होते. पाठोपाठ मॅको, पालुको होते. प्रचंड कोलमेनो माझ्यापुढंच होता. मागं वळून मला म्हणाला. ' देव करो आणि झारोला माझ्यासाठी प्रचंड फट करण्याची बुद्धी देवो ! '

कोलमेनो ठरल्याप्रमाणं पुढं पळत सुटला. थैली तारेखालून आधी ढकलण्यासाठी पुढ्यात धरली होती. आता माझी पाळी होती. तळहातांना घाम सुटला होता. बराकीत शेवटची नजर फिरवली. सगळं शांत होत. मी धूम सुटलो.

मी तारेजवळ पोचलो तेव्हा दोघेजण पलीकडे होते आणि स्मिथ निसटण्याचा प्रयत्न करत होता. आम्ही खाली दबून पाळी येण्याची वाट पहात होतो. मन अधीर करणारा वेळ भराभर चालला होता. आहू अई असे तसे बारीक घसमटलेले आवाज काढत सार्जंट आणि मॅकोही निसटले. त्यानंतर महाकाय कोलेमेनो आधी थैली मग आपलं डोकं फटीतून पुढ सरकवलं. माझा श्वास थाबला. तो अर्धा सरकला आणि वरच्या काटेरी तारेनं त्याच्या पाटीवरच्या जाकिटात आपली नखं अडकवली. मी खिसफिसत म्हणालो, ' थांब, अजिबात हालचाल करू नको. आणखी अडकशील. '

पलीकडून कोणी तरी त्याची थैली ओढून घेतली आणि तारेतून सुटका करायला सुरुवात केली. मिनिटामागून मिनिटं सरकत होती. अतिशय अस्वस्थतेमुळं माझा जबडा घट्ट दावला गेला होता. हाताच्या बोटांवर तबल्याचा ताल धरावा तसे सेकंद मोजत होतो. पलीकडंच कुणी तरी कुजबुजलं आणि कोलीची सुटका झाली. मी नि:श्वास सोडला. पाठोपाठ मीही निसटलो. पूर्ण २० मिनिटं मोडली ह्या प्रकारात ! पहिला अडथळा पार झाला होता !

आता पुढचा अडथळा म्हणजे खोल चर. त्यात आम्ही उतरलो. कोलो पलीकडच्या काठाला म्हणजे लाकडी कुंपणाच्या बाजूला टेकून उभा राहिला. ती बाजू घसर-उताराची होती. कोलो आपल्या दोन्ही पंजांचा उपयोग करून आम्हाला एकेकाला वर पोचवू लागला. वर चढलं की, लाकडी भिंतीला अगदी चिकटून उभं रहावं लागत होतं.

कारण वर जागाच नव्हती; पण खुद्द कोलोला वर खेचून घेण्यात आमचा बराच वेळ गेला. केवढं धूड होतं ते! मग पुढचा कार्यक्रम. बर्फामुळं १२ फुटातील थोडीशी उंची कमी झाली होती. कोलोच्याच खांद्यावर चढून, पूर्ण हात उंचावून वरचा काठ गाठला. नशिबानं पलीकडचा आधार-खांब वरपर्यंत होता. त्यावर नीट उभं राहून खालच्या माणसांना खेचून घेणं सोपं जात होतं.

पुन्हा एकदा कोलोला वर ओढायचं म्हणजे प्रश्नचिन्ह उभं राहूयलं. मी व मॅकोनं नीट उभं राहून, खाली वाकून कोलोचे दोन्ही हात धरले. त्याला खेचण्याचा प्रयत्न करू लागलो. तीन–चार इंच काम राहिले आणि आमची ताकद संपली! त्याला खाली सोडावं लागलं. असा प्रकार तीन वेळा झाला. आम्हाला त्या श्रमानं तसल्या थंडीतही घाम फुटला. हात–पाय कापायला लागले. काय करायचं? पुन्हा एकदा जीव तोडून त्याला उचलला आणि या वेळी मात्र त्याच्या बोटाना वरचा काठ लागला. त्याबरोबर त्यानं आमचा हात सोडून स्वत:च्याच अफाट ताकदीवर वर येण्याचा प्रयत्न केला आणि तो आला! आणखी, आणखी वर आला आणि खांबावर उभा राहिला. लाकडी भिंतीला लागूनच एक ताराचं भेंडोळ होतं. आम्ही सर्वांनी धबाधब त्याच्या पलीकडे बर्फाच्या ढिगांवर उड्या मारल्या. एकदोघांच्या उड्या नीट पडल्या नाहीत. त्यांना थोडं-फार खरचटलं; पण त्याकडे लक्ष द्यायला वेळ होता कुणाला? आता आम्ही गस्त-गल्लीमध्ये उभे होतो. त्याच वेळी जर गस्त-फेरी झाल्याचा इशारा कुत्र्यानी दिला असता तर आमची काय अवस्था झाली असती कुणास ठाऊक! वेळ भराभर सरकत होता.

आम्ही पलीकडच्या कुंपण-भिंतीशी धावतच गेलो. ही त्यामानानं कमी उंच होती. या वेळी सर्वांनी जोर करून कोलोला आधी उचललं, तो वर पोचला. सर्व चालू असताना आमची थोडी खिसफास, कुजबूज चालू होती. आवाज होता थोडाच; पण नीरव शांततेत आम्हालाच तो भयंकर वाटत होता. कोलोनं आम्हाला एकेकाला खेचून घेतलं आणि पलीकडे टाकलं. या वेळी मी सगळयात शेवटी होतो. पलीकडे उतरताच शेवटच्या अडथळयाकडे जीव घेऊन धूम ठोकली. त्याच झपाटयात तारेच्या भेंडोळयावरून कोलांटया घेतल्या. कोणाकोणाला किती लागलं याची चौकशी केली आणि पुढच्याच क्षणाला पळायला सुरुवात केली. सगळी कुंपणं पार करून झाली होती. मी मेंढीच्या कातडयाचं जुनेरं काढलं आणि आमच्यामागं फरफटवत पळू लागलो.

आम्हाला प्रचंड धाप लागली होती. श्वासोश्वास करणं पावलागणिक अशक्य होत होतं. घशाला कोरड पडली होती; पण पळणं भाग होतं. बर्फुलाचे कपडे घातलेल्या झाडांच्या प्रचंड जंगलात आम्हाला शिरायचं होतं. दक्षिणेकडे आमची तोंडं होती आणि छावणी आमच्या पाठीमागं होती. एकेकजण धडपडायला सुरुवात झाली. एकमेकाला हात देत पुढं पळत होतो. पळण्याचं रूपातर हळूहळू दुडक्या चालीत झालं. त्याच पद्धतीनं तासन तास, पहाट झाली तरी पुढं सरकत होतो. पुढचा सबंध दिवस तसाच ढकलत जाव लागलं. इलाजच नव्हता. जितक्या दूर जाता येईल तेवढं जायला हवं होतं. पळताना आमच्या थैल्या आमच्या पाठीवर लदालदा आपटत होत्या. जरासा श्वास घेऊन झाला की, मी पुन्हा सगळयांना हाकलत होतो. हा प्रकार सकाळी अकरापर्यंत चालला आणि त्यानंतर पुढं पाऊल टाकणं कुणालाही अशक्य झालं! मी मेंढीचं कातडं उचलून घेतलं. एकमेकांकडे थकल्या नजरेनं सगळेजण बघू लागले. पालुको ओणवा होऊन गुडघ्यावर हात टेकून प्रचंड धापा टाकत होता. श्वास घ्यायचा प्रयत्न करत होता. दोघंजण ढुंगणावर बसून दम खाऊ लागले. आमच्या सगळयांची तोंडं वासली होती. कुत्र्यासारख्या जिभा बाहेर काढून श्वासोश्वास करण्याचा प्रयत्न चालू होता.

हा भू-भाग एखाद्या घमेल्यासारखा होता. झाडी थोडीशी विरळ होती. आम्ही इतके थकलो होतो की, पलीकडचा किंचितसा चढही चढणं अशक्य होतं. तिथं आम्ही सुमारे दहा मिनिटं उभे होतो. तोंडातून शब्दही फुटणं अशक्य, अशी धाप होती. शून्यांशाखाली तपमान असलेल्या हवेतही आम्हाला दरदरून घाम सुटला होता!

अजूनही बर्फ पडतच होतं; पण आता जोर ओसरला होता. त्याची जागा वाऱ्यानं घेतली आणि तो झाडामधून वाहताना कण्हल्यासारखा आवाज होऊ लागला. काटकुळया फांद्या विचित्र करकरू लागल्या. शिकार होऊ घातलेल्या जनावरांसारखे आम्ही कान टवकारून होतो. पाठलागाची काही चाहूल लागते का, याचा कानोसा घेत होतो. कुठं कुत्र्याचं भुंकणं ऐकू येतं का, पहात होतो; पण आवाज येत होता तो फक्त वाऱ्याचा, भुरभुरणाऱ्या बर्फुलांचा आणि सळसळणाऱ्या झाडांचा!

आमच्या डाव्या हाताला वरच्या अंगाला झाडी जरा दाट होती. मी न राहवून म्हणालो, ' आपण तिथं जाऊ या. तिथं आडोसा चांगला आहे. आपल्याला बऱ्यापैकी लपता येईल!' अंगात त्राण नसल्यामुळं सगळे कुरकुर करू लागले. स्मिथ माझ्या मदतीला आला. म्हणाला, ' रावीज् म्हणतो ते बरोबर आहे. चला लवकर!'

कसेबसे चढ चढून गेलो. एका प्रचंड बुंध्याच्या झाडापाशी आसरा घ्यायचं ठरलं. बुंध्याजवळचा सहा-सात चौरस वाराचा भाग सपाट केला. तिथनं काढलेल्या बर्फाची छोटीशी भिंतच उभारली. कोलोनं काही फांद्या तोडून आणल्या आणि झाड आणि बर्फाची भिंत यांच्या आधारानं छप्पर तयार केलं. त्यावर बर्फ पसरला आणि झकास आडोसा तयार झाला. सैबेरियात शिकलेला हा पहिला धडा होता. वाऱ्यापासून बचाव करा, तोच तुमचा मारेकरी होईल. आजूबाजूला बर्फाचा आडोसा करा आणि खुशाल त्याच्या आड झोपा! परांच्या गादीवर झोपल्यासारखं उबदार वाटेल.

इथं आम्हाला आमचं सामान नीट पहाता आलं. प्रत्येकाच्या थैलीमध्ये एकेक भाजलेल्या पावाची लादी होती, थोडा मैदा. सुमारे अडीच किलो बार्ली, थोडं मीठ, कोरीझकी तंबाखूचं एकेक पाकीट आणि जुना रद्दी कागद, एवढं सामान होतं. याशिवाय मी सुकवून साठा केलेला पाव होताच. प्रत्येक थैलीवर आम्ही केलेल्या मोजक्या आणि इतर कातडयाचे तुकडे होते. आम्ही छोटयाशा बर्फकुटीत शिरलो. अगदी एकमेकाला घट्ट बिलगून पडलो. हळुवार आवाजात कुजबूज सुरू झाली. पहिला मुद्दा निघाला, धूम्रपान करायचं की नाही? सर्वानुमते असं ठरलं की, धूम्रपान करावं. त्याचा मनावरचा, शरीरावरचा ताण कमी व्हायला फार उपयोग होईल. धूर दिसला तरी त्या मानाने धोका कमी आहे. झालं! सगळयाचं धूम्रपान सुरू झालं.

निळ्या धुराकडं पहाताना सर्वांच्या चित्तवृत्ती शिथिल झाल्या.

आम्ही तुरुंगतळापासून तसे काही लांब आलो नव्हतो. त्यामुळं शेकोटी पेटवण्याचा प्रश्नच नव्हता. तेव्हा कोरड्या पावाचे थोडे-थोडे लचके आम्ही तोडले. ते खाताना एक गोष्ट अचानक लक्षात आली. घोडदळातून आलेल्या सार्जंट पालुकोच्या तोंडात एकही दात नव्हता ! असला कडक-कोरडा पाव खाणं म्हणजे त्याच्या जिवावरचं काम होतं. पाव भिजवून खाणं एवढाच मार्ग त्याच्याकडे होता. इथं तर पाण्याचा थेंबही नव्हता ! त्यानं पाव बर्फातच घोळवून मऊ केला आणि कसाबसा घशाखाली रेटला !

'मला पकडलं तेव्हा माझ्या तोंडात छान कवळ्या बसवलेल्या होत्या. त्या राडेच्या रशियन सैनिकांनी मला थोबाडून त्या बाहेर काढल्या आणि जमिनीवर आपटून फोडून टाकल्या. केवढं प्रचंड शौर्य गाजवलं असं हसत होते साले ! माझ्यासमोर मात्र संकटच उभं राहयलं. तुरुंगातला तो पाव बोळक्या तोंडानं खायचा म्हणजे काय महाकर्म होतं, ते तुम्हाला कसं सांगू ? समजत नाही. आपण जिथे जाणार आहोत तिथं पोचलो की, पहिल्यांदा दातांचं काम करून घेऊ !'

पालुकोच्या या केविलवाण्या निवेदनावर झारोनं विनोदच केला. म्हणाला, 'आपण त्या कवळ्यांना सोनेरी मुलामा देऊ. त्या तुला शोभतीलच !' सगळेच या विनोदावर हसू लागलो. पालुकोही सामील झाला.

त्या दिवसाचा बाकीचा वेळ आम्ही झोपून काढला. आळीपाळीनं, एकानं बिळाच्या तोंडाशी जागं राहून पहारा करायचा. कोलो तर एखाद्या रांगून रागून दमलेल्या लहान मुलासारखा झोपला ! छान गोड आवाजात घोरायला लागला. मार्चिनकोनं आम्हाला जागं केलं तेव्हा दिवस मावळायला आला होता. आम्ही थोडासा पाव खाल्ला, एकेक सिगरेट ओढली आणि बिळातून रांगत बाहेर पडलो. अगदी झिरमिर बर्फ पडत होता. थंडी तर मी म्हणत होती. आमची शरीरं मात्र श्रमानं, अत्यंत आवून गेली होती !

आम्हा सातही जणांना तुरुंगतळापासून आपण शक्य तितक्या लवकर आणि शक्य तितक्या दूर गेलं पाहिजे, याची मनोमन पूर्ण जाणीव होती. ती दुसरी रात्र आम्ही चालत आणि पळत काढली. आजूबाजूला पसरलेल्या बर्फाळवंटात गडद अंधार कधीच दाटला नाही, पण कधी कधी तीन-तीन फूट भुसभुशीत बर्फुलांतून चालायचं म्हणजे नाकी नऊ येत होते. पहाटेच्या वेळी एक गोठलेला ओढा पार केला. पलीकडेही जंगल होतंच. त्या जंगलात आम्ही आमचा मुक्काम टाकला.

पहिले चार ते पाच दिवस आम्ही हाच कार्यक्रम ठरवला होता. रात्रभर चालायचं आणि दिवसभर बर्फाचीच गुहा करून त्यात विश्रांती घ्यायची. नशिबानं पाठलागाचं कसलंही चिन्हं दिसत नव्हतं. आमचं पलायन लक्षात येताच तपास सुरू झाला असणार, पण रात्रभर पडलेल्या बर्फानं आमच्या पाऊलखुणा पूर्णपणे झाकल्या गेल्या असणार ! साहजिकच तपासाची दिशा पूर्वेकडे म्हणजे सगळ्यात जवळच्या सीमेकडे वळली असणार. अर्थात हे असंच असेल, असं वाटून घेण्यापलीकडे आम्ही काहीच करू शकत नव्हतो. दक्षिणेची वाट धरल्याबद्दल आम्ही आमचंच सावधपणे अभिनंदन केलं. दिवसा वाटचाल करायला सुरवात केली. एकाच ओळीत पण विखरून चालत असू. दिवसाकाठी साधारण तीस मैलांची वाटचाल होतं होती. दक्षिण दिशा समजायला आम्हाला सूर्याचा उपयोग होत होता. त्याचप्रमाणे झाडांवर सावलीच्या बाजूला वाढलेल्या शेवाळ्याचीही मदत होत होती. वाटेत अनेक छोटे-छोटे गोठलेले ओढे लागले आणि त्यांच्या दिशेवरून ते दक्षिणेकडे असलेल्या मोठ्या लेना नदीला मिळत असावेत, असाही अंदाज आम्ही बांधला. वाट अत्यंत कष्टाची होती. थंडी आणि दमछाक यांच्याशी सामना चालू होता; पण आमची हिंमत दांडगी होती. आम्हाला सारखं वाटायचं, कुठं तरी शेकोटी पेटवावी; परंतु आम्ही स्वतःलाच बजावलं होतं की, लेना नदी आल्यावर मगच आगोटी पेटवायची !

सुमारे आठवड्याच्या प्रवासानंतर आमच्यात आपोआप विभागणी होऊ लागली. समविचाराचे, समव्यावसायिक एकत्र चालू लागले. खऱ्या अर्थानं सैनिक असलेले मॅको आणि पालुको यांची जोडी जमली. मार्चिन तसा गंभीरच; पण कधीकधी अनपेक्षित वेळी तो कोरडा विनोद करून जायचा. त्याची आणि कोलोची गट्टी जमली. स्मिथ, अमेरिकन असला तरी त्याचा मनमोकळा स्वीकार आम्ही केला होता. तो माझा जिगर झाला. स्वच्छंद, गमत्या झारो सर्वांशी मिसळून वागत होता, सर्व जोड्यांबरोबर संवाद साधून होता. झारो हा काही तरी वेगळाच मनुष्य होता ! बघावं तेव्हा आनंदी, काही तरी थट्टामस्करी करायच्या तयारीत असलेला. आता आम्ही दिवसभराच्या श्रमानं थकून रात्रीच्या विश्रांतीसाठी थांबलो की केव्हा झोपेच्या आधीन होतो असं व्हायचं; पण झारोला विनोद करायची लहर यायची. आमच्या आणि त्याच्याही दमछाकीची नक्कल करायचा. फतकल मारून बसायचा काय, रशियन नाचाचे प्रकार काय करून दाखवावयाचा, सगळी मजाच ! कोलो तर त्याच्या विनोदी चाळ्यांमुळं इतका हसायचा की त्याच्या डोळ्यांतून दाढीवर पाणी गळायला लागायचं. चिडणं, घाबरणं म्हणजे काय ते झारोला ठाऊकच नव्हतं. आजवर अनेक विनोदी माणसं भेटली, पण झारोसारखा नाहीच. अत्यंत कठीण प्रसंगातसुद्धा विनोदबुद्धी कशी शाबूत ठेवावी, हे झारोनच आम्हाला शिकवलं.

आठव्या किंवा नवव्या दिवशीचा प्रवास त्या मानानं बराच सुकर झाला होता. सारा प्रदेश दक्षिणेकडे मंद उतारानं पसरला होता. दोन झाडांमधल्या जागेत खास सैबेरियन कडक गवताचे पुजके दिसू लागले. झाडांवर शेवाळाचे थर दाट होऊ लागले. मध्यान्ह टळता टळताच जंगल एकदम विरळ होऊ लागलं आणि लेना नदीच पात्र साक्षात आमच्या पुढ्यात उभं राहिलं ! अर्धा मैल रुंदीचं पात्र संपूर्ण गोठून प्रचंड लादी तयार झालेली होती. आर्टिक महासागराला मिळायला या नदीला अजून किमान १५०० मैल तरी वाहायचं होतं. तरी इतक्यावरसुद्धा जलमार्ग म्हणून वापरायला चांगलंच रुंद पात्र होतं. आम्ही आडोसा घेत एका ओळीत पण विखरून उभे राहिलो.

## रात्रभर चालायचं आणि दिवसभर बर्फाच्या गुहेत....

न्याहाळत, कानोसा घेत बराच वेळ थांबलो. दिवस अगदी स्वच्छ होता आणि दूरवरचा आवाजदेखील ऐकू आला असता, पण सगळीकडे अगदी शांत दिसत होतं.

स्मिथ माझ्याजवळ आला आणि म्हणाला, 'आजची रात्र आपण याच तीरावर काढू आणि उद्या तांबडं फुटताच नदी पार करू.' मी संमती देताच आम्ही तळ ठोकला. नेहमीप्रमाणे बर्फाची गुहा तयार केली. अंधार होताच. आम्ही पहिली आगोटी पेटवली. गुबका जातीचं शेवाळं आणि आम्ही जाकिटात भरून आणलेल्या वाळक्या काड्या यांचा छान उपयोग झाला.

वरच्या फांद्यांमध्ये हळुवार तरंगत नाहिशा होणाऱ्या धुराच्या साक्षीनं आम्ही समारंभ साजरा केला.इतक्या दिवसांनंतर प्रथमच गरम भोजनाचा आस्वाद घेतला. भोजन म्हणजे काय, तर बर्फ वितळून आधी पाणी करायचं,त्यात थोडी बार्ली, थोडा मैदा,चवीला थोडं मीठ असं घालून शिजवायचं की झाला'काश्का'नावाचा पदार्थ. आमच्याकडे शिजवायला मोठं भांडं म्हणजे अर्धा लिटर पाणी मावेल एवढं एक अल्मीनचं डबडं होतं. त्यात 'काश्का' उकळायचा, लाकडाचे तुकडे तासून कामचलाऊ चमचे केले होते. ते वापरून आळीपाळीनं काश्का थोड-थोडा ओरपायचा. पटकन संपावयचा की पुन्हा उकाळा सुरू. पालुकोला त्याचा पाव त्या गरम 'काश्का'त बुडवून मऊ करायची परवानगी दिली. त्या सुंदर गरम जेवणाबद्दल आम्हीच आमचं कौतुक केलं. ती धुनी आम्ही पेटत ठेवली. पहारा करणारानं ती सतत पेटत ठेवायची होती.

पहाटेच्या अंधुक प्रकाशात आम्ही लेना नदी पार केली. प्रचंड नद्या असलेल्या या देशातील ही एक अशीच मोठी नदी होती. पलीकडच्या उंच काठाशी रेलून आम्ही काही काळ मागे पहात उभे राहिलो. गेल्या काही आठवड्यांतील प्रचंड मानसिक ताण आता खूप सैल झाला होता, लेना नदीपर्यंत पोचूच शकणार नाही, अशी भीती मनात सदैव वावरत होती आणि आता आम्ही ती पार करून पैलतीरावर सुरक्षित, कसलाही अडथळा न येता उभे होतो. मनाला नवी उभारी मिळाली होती. पुढच्या प्रवासासाठी नवा विश्वास प्राप्त झाला होता.

नदी पाहिल्यामुळे की काय, कुणी तरी माशांचा विषय काढला आणि माझे विचार धावू लागले. जुन्या आठवणी जाग्या होऊ लागल्या. मी त्यांना सांगायला लागलो की, पोलंडमध्ये असताना आम्ही बर्फाला भोक पाडून मासे पकडत असू.

झालं! आम्हाला विषयच मिळाला. 'हो. बर्फाला भोक पाडायचं आणि मग काय करायचं? शिटी वाजवून माशांना बाहेर बोलवायचं!'

'नाही, नाही', मी त्यांना समजावून सांगू लागलो,'बर्फ फोडण्याच्या आवाजानं खालचे मासे विचलित होतात आणि प्रत्यक्ष भोक पडतं तेव्हा हवेच्या दाबात फरक पडल्यानं पाणी उसळून बाहेर येतं त्याबरोबर मासेही बाहेर फेकले जातात.' हे ऐकल्यावर सगळेजण हॉ, हॉ करून हसायला लागले. माझी टर उडवायला लागले. पाठीवर थापा मारून मी किती थोर्थोर कथाकथक आहे असं सांगू लागले.

मी हटायला तयार नव्हतो.म्हटलं, 'प्रात्यक्षिकच करून दाखवतो'. लगेच कोलोनं एक दांडगं लाकूड पैदा केलं. आम्ही काठापासून साधारण वीस एक-वार दूर आत गेलो. कोलोनं आपल्या मजबूत पंजानं ते दांडक उचललं, झारोनं आणि मी दिशा देण्यासाठी खालच्या बाजूला पकडलं आणि दणके मारायला सुरुवात केली. एकदाचं भोक पडलं. पडलं मात्र, आतून थंडगार पाणी कारंज्यासारखं उसळून वर आलं. आजूबाजूला आमच्या पायांभोवती पसरू लागलं आणि आश्चर्य म्हणजे चक्क चार मासेही त्याबरोबर बाहेर आले. चांगले हेरिंगच्या आकाराचे होते. आमच्या आनंदाला पारावार राहिला नाही. झडप घालून ते मासे काबीज केले. आम्ही नाचू लागलो. माझ्यावर शाबासक्यांचा वर्षाव झाला. झारोनं, माझी थट्टा केल्याबद्दल क्षमायाचनाही केली. त्याचवेळी स्मिथ आजूबाजूला पहात म्हणाला, 'आपण आपल्या नशिबाची परीक्षा फार वेळ पाहू नये! आडोसा घेत आपल्याला निघायलाच हवं!' आम्ही लेना नदीचं थंडगार स्वच्छ पाणी पिऊन मार्गस्थ झालो.


पुन्हा दक्षिणेकडे तोंड करून नदीचा उंच काठ चढून पलीकडच्या जमिनीवर चालायला आरंभ केला. आमचं पुढचं उद्दिष्ट होतं, बैकल सरोवर.

त्या रात्री नदीपार प्रदेशात एका टेकाडाच्या आश्रयाला मुक्काम टाकला. काटक्यांवर मासे भाजले. थोडा थोडा 'काश्का' तयार करून ताज्या अन्नाची मेजवानी केली.

एव्हाना आमचे रबरी बूट केव्हाच फेकून दिले होते. आम्ही तयार केलेल्या मोजक्या चामड्याच्या वाद्या पायाला बांधून टाकल्या होत्या. दिवसाला साधारण दहा तास चाल आणि तीस मैल या वेगानं वाटचाल सुरू होती.

(क्रमशः)


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तकं

# नोंद . . .

## ▫ सार्वमत

बरोबर दोन वर्षांपूर्वी, ६ डिसेंबर १९७९ रोजी महाराष्ट्रात एक मोठा सामाजिक लढा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या महानिर्वाणदिनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा लढा पुकारला गेला. पण त्याच काळात माणसातल्या पशुत्वाचं विद्रुप दर्शन इथं घडलं. सामान्य माणूस या घटनांनी स्तंभित झाला, फ. मु. शिंद्यासारखं कवि-मन तर पार कोळपून गेलं. त्यातूनच एक काव्यसंग्रह निर्माण झाला– सार्वमत !

या निर्मितीमागील प्रक्रिया सांगताना श्री. शिंदे म्हणतात– नामांतराच्या प्रस्तावाच्या निमित्तानं मराठवाडा प्रदेशात प्रचंड दंगली उसळल्या. पिढीजाद नाती क्षणार्धात संपुष्टात आली. मानवी मूल्ये बेदरकारपणे पायदळी तुडवली गेली. हे स्वातंत्र्यात घडलं. विशेष म्हणजे लोकशाहीत घडलं. केवढा हा उपहास आणि दैवदुर्विलास ! नामांतर हा एक समतेचा प्रतीकरूप प्रश्न. मराठवाडा हा एक भू–भाग. दोन्हीची विशिष्टता वगळली तरी मानवी प्रवृत्ती शिल्लकच राहते. त्याच प्रवृत्तीचा अनेक दृष्टींनं वेध घेणाऱ्या ह्या कविता दाहकता 'न्यूड'च्या स्वरूपात उभी असते. तिला सामोरं जाताना मी शरमून गेलो. माझी मला तर लाज वाटलीच; समाजाचीही कीव आली. जिवंत संवेदनांना अशा वेळी अनेकविध अंकुर फुटतात. तेच अंकुर इथं पाना-फुलातून जाणवून देण्याचा प्रयत्न आहे. आत्मप्रौढी नाही. चिंतनाची फुशारकी नाही. आहे ती फक्त आत्म्यांची अस्वस्थ अवहेलना.माझी. सत्यावर जीव टाकणाऱ्या सर्वांची. मी केवळ नाममात्र. इतिहास अटळ, अपरिहार्य. आतरिक जिवा-भावाचा. तो जपावा. अर्थपूर्ण विद्रोहासाठी. एवढंच.'

या काव्यसंग्रहाचं वैशिष्ट्य म्हणजे, इथे निरनिराळे अनुभव काव्यरूपाने सलगपणे मांडले आहेत. या कवितांना शीर्षक नाहीत, क्रमांक नाहीत. एकेक पान उलटत जायचं की एकेक अनुभव शब्दरूपाने साकार होत जातो. उदाहरणार्थ–

भजनातून आली
चिरकत भीति
टाळांची टाळांनी
रगडिली नीती
रात्रीचे संत झाले
पहाटेस वैरी
अभंगच ओकले
बंदुकीच्या फैरी
किंवा–
बेईमान झाडाच्या मग
सावलीचे साप झाले
अश्रूत बुडून बुडून
आकाशीचे बाप मेले
रान गाजर गवताने
सुसाट सारे माजलेले
ज्याचे त्याने तळहाती
मन घेतले भाजलेले

पण या उद्विग्नतेबरोबर, नैराश्याबरोबरच संग्रहाच्या अखेरीस दुर्दम्य आशावाद, नवी उमेदही बांधली आहे–

नीट ऐका माझ्या मित्रांनो
ते आपल्याच बाणांचे आवाज
ते आपल्याच बादळाचे आवाज
कुशीत येत आहेत
ते आपलेच पहाड
ऐका माझ्या मित्रांनो !

या काव्यसंग्रहाच्या उत्पत्तीमागल्या प्रेरणा फार ताकदवान आहेत, यात शंका नाही; मात्र त्या अनुभवांचं रौद्रत्व, अमानुषत्व या काव्यातून तितक्या ताकदीनं व्यक्त होत नाही.वर उल्लेखिलेल्या काही ओळी सोडल्या तर बाकी संग्रहात उथळ आक्रस्ताळेपणाच जास्त दिसतो. मानवता चुरगाळून टाकणाऱ्या अनुभवांचं व्यक्त होणं–ही तसंच, तितकंच उग्र आणि भडक असावं लागतं का, असा प्रश्न, इतर दलित साहित्याप्रमाणे हा सग्रह वाचतानाही मनात निर्माण होतो. ▫

सार्वमत (काव्यसग्रह)
फ. मु. शिंदे
पृष्ठे, ४८, मूल्य १० रु.

## ▫ पी. डी. ए. वार्षिक '८१

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन (पी. डी. ए.) या पुण्याच्या नाट्यसंस्थेनं आपला तिसावा वर्धापनदिन अगदी साधेपणानं, गाजावाजा न करता साजरा केला. यानिमित्त नाट्यविषयाशी संबंधित विषयाचा ऊहापोह करणारी एक स्मरणिका पी. डी. ए.ने प्रसिद्ध केली. नाट्यक्षेत्रातील गेल्या तीस वर्षांतील विविध घडामोडीचा, निर्माण झालेल्या वाटाचा, प्रवाहांचा, नव्या समस्यांचा ऊहापोह या स्मरणिकेत अपेक्षित होता; पण प्रत्यक्षात मात्र नाटक आणि संबंधित विषयावरील लेखवजा संग्रह म्हणजे ही स्मरणिका झाली आहे.

प्रायोगिक नाटक मंदावले की बंदावले ? हा नाट्यसमीक्षक प्रा. मनोहर यांचा छोटेखानी लेख पी. डी. ए. सारख्या प्रायोगिक, हौशी आणि भाविक नाट्यसंस्थेच्या स्मरणिकेत योग्यच आहे. प्रायोगिकवाल्यांना त्यात चांगले 'बोधामृत' आहे. नवनाट्य आणि लोकनाटक हा अशोकजी परांजपे यांचा परिचयात्मक लेख लोकनाटकाच्या इतिहासाचा परिचय घडवतो, तर प्रा. लक्ष्मण देशपांडे यांचा नाट्य-प्रशिक्षणाचा व्यावसायिक नाटकाशी असलेला नातेसंबंध उलगडवून दाखवणारा लेख वेगळ्या विषयाकडे लक्ष वेधून घेणारा आहे.

नाट्यसंमेलनाध्यक्ष आत्माराम भेंडे यांच्या नाट्यजीवनाची नाट्यमय ओळख करून देणारे आत्मचिंतन, डॉ. वि. भा. देशपांडेंचा यक्षगान लोकनाटकाची ओळख करून देणारा लेख आणि चित्तरंजन कोल्हटकर याचे 'जसं आठवतंय तसं' हे आत्मवृत्त याचाही स्मरणिकेत समावेश आहे. इंदोरचे बाबा डिके यांचा 'आपला दाम खोटा' हा लेखही वेगळ्या पद्धतीने लिहिला असल्याने वाचनीय आहे.

स्मरणिकेचे संपादक केशवराव घुले यांनी सुरुवातीला व्यक्त केलेले मनोगत पुण्यातल्या कोणत्याही नाट्यसंस्थेला सध्या लागू पडणारे आहे.

मुख्यत्वे, जाहिरातीद्वारे पैसा उभा करण्याचे साधन म्हणून स्मरणिकेकडे पाहिले जाते, त्यात काही वावगे आहे, असेही नाही. जाहिरातीसाठीच स्मरणिका असल्याने बरी-

चशी पाने जाहिरातीमध्येच खर्च होणेही स्वाभाविक आहे. नाटयरसिकांची अपेक्षा एवढीच की, लेखांसाठी उपलब्ध असलेल्या पानांमध्ये काही तरी कसदार वाचायला मिळावे. त्यासाठी स्मरणिका काढणाऱ्यांनी आणि त्यामध्ये लेख लिहिणाऱ्यांनीही स्मरणिकेकडे थोडे जास्त गंभीरपणाने पाहायला हवे. स्मरणिका, जाहिरातदारांव्यतिरिक्त अन्य वाचकांनाही संग्राह्य वाटावी, यासाठी जास्त गंभीरपणाने प्रयत्न करायला हवेत, एवढंच या निमित्ताने सांगावेसं वाटते.

पी. डी. ए. वार्षिक '८१
तिसावा वर्धापनदिन
संपादक : केशवराव घुले

□

## फिनिक्स निवड

# The Eisenhower Diaries

By : Robert Ferrel

असे म्हटले जाते की, राजकारण, क्रिकेट आणि पुण्याच ट्रॅफिक या तीन गोष्टी अगदी अनप्रेडिक्टेबल असतात ! यापैकी क्रिकेट व राजकारण याविषयीचं माझं अज्ञान ब्लॅक होल्स इतकं आहे; पण मला कुणी विचारलंच तर 'पॉलिटिक्स ऐवजी पोर्नोग्राफी वाचा' असेच मी त्यांना सांगतो ! आणि क्रिकेटच्या संदर्भात त्याना बर्नार्ड शॉचं 'क्रिकेट इज ए गेम प्लेड बाय सम फूल्स' वगैरे; पण पुण्याच्या ट्रॅफिकबद्दल (म्हणजे अनप्रेडिक्टेबल वगैरे) हे म्हणणे मला पटते. मुंबईच्या ट्रॅफिकसाठी 'रांग मोडू नका !' असा सल्ला TV वर येतो. पुण्याच्या ट्रॅफिकसाठी रांग मोडणे हाच एक नियम आहे व 'रांग मोडू नका' हा एक अपवाद !

तसं पाहिलं तर या जगात प्रेडिक्टेबल काय आहे ? तुम्हाला टॅक्सेस भरावे लागतील व तुम्हाला मरण येईल याच काय त्या जगातील प्रेडिक्टेबल गोष्टी आहेत ! (हो ! हो ! हे बेंजामिन फ्रँक्लिन किंवा रुझवेल्ट का दुसऱ्या कुणी तरी माणसानं सांगितलं होते. माझं ते ओरिजिनल नाही. मान्य. माझं लिखाण फॉरिन मेल, फॉरिन बुक्स, फॉरिनर्स व आउटसाइडर्स यांच्या भोवतीच घिरटया घालत असतं. मान्य.)

इतिहासकार कोणत्या व्यक्तीला कधी महत्त्व देतील हा सुद्धा पुण्याच्या ट्रॅफिकसारखाच प्रकार आहे. त्यांच्या हयातीत एखाद्या व्यक्तीचा कोण उदोउदो होत असतो! कालांतरानं काही मूर्तिभंजक त्याला खाली पाडतील. परत काळाच्या थोडया वाटचालीनंतर काही इतिहासकार त्याला उचलून घरतील अनेक हिरोचे रूपांतर व्हिलनमध्ये झालं आहे. जे प्रामाणिक होते त्यांना दुतोंडी म्हटलं गेलं आहे, तर काही सामान्य व्यक्तीना अनेक वेळा इतिहासकारांनी व्यासपीठावर बसवलं आहे. तेव्हा 'Do not try to carve for yourself a niche in history. Your place in history is never assured.' हेच तत्त्व खरं मानायला हवं !

फार काय, अमेरिकेच्या प्रेसिडेंटचंच बघा. काही इतिहासकार काही अध्यक्षाना कीर्तीच्या व्यासपीठावरून खाली ओढत आहेत, तर इतर काही इतर अध्यक्षांना वर बसवण्यात गर्क झाले आहेत ! फ्रॉइडचेच बघा. हयातीत पाय ओढणं, नंतर इतिहासात उच्चस्थान व आता परत पाय ओढणं !

अमेरिकेत जेव्हा मंदीची प्रचंड लाट आली होती त्या वेळेला अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्टनी जी लक्षणीय कामगिरी केली त्याची नोंद इतिहासकार काल–परवापर्यंत करीत होते, पण तो महाकपटी होता असं आता सिद्ध झालं आहे ! Janus faced. म्हणजे दुतोंडी. त्याचं व्यक्तिमत्त्व इतकं दुतोंडाळ होतं की, काही लोकांना त्याबद्दल आता आश्चर्य वाटत आहे.

केनेडी, व्हिएतनाम, बाया, बे ऑफ पीग्ज वगैरेविषयी तर अनेकांना माहिती आहेच.

आता इतिहासाच्या क्षितिजावर ड्वाईट डी. आइसेनहॉवरचा तारा उगवत आहे. यांची बुद्धी म्हणे भलतीच तल्लख ! पृथ्वीच्या एकोणिसशे पन्नाशीचा काळ प्रस्थापित व्यवस्थेचा होता. तो काळ उपनगरीय सामान्यतेचाही (Suburban mediocrity) होता. माझी नोकरी, माझे शेजारी वगैरे वगैरे !

पण फिरत्या भिंगरीसारख्या इतिहासात हा काळ अत्यंत स्टेबल होता. चलनवलन फुगवटा अत्यंत अल्प होता. बहूकडे सर्वांगीण, आर्थिक विकासाची वाटचाल सुरू होती. तांत्रिक ज्ञानाने नुकताच बा मुलाहिजा, बा होशियार केलं होतं.

आईक म्हणे त्या काळचा अमेरिकेचा 'फादर फिगर' होता. ('फादर फिगर' मिळाल्याने मानसशास्त्रीयदृष्टया सर्वांगीण विकास होतो असे म्हणतात.) निव्वळ त्याच्या ओठावरील रुंद स्मिताने (broad grin म्हणतात ना) ते व्हाइट हाऊसमध्ये शिरले असे काही लोकाना वाटले. आईकच्या डायरीचा काही भाग आता प्रसिद्ध झाला आहे. या डायरीमध्ये विचारांची भलतीच तर्कसंगती आहे. बऱ्याच गोष्टीचे अंतर्ज्ञान आहे. (म्हणजे मिलिटरी गोष्टींचं !)

जनरल मॅकार्थरचा खवचट व अरेरावीपणा व त्याच्या व्यक्तिमत्त्वातील Witch-huntingची छटा आयसेनहॉवरनी १९३६ मधेच ओळखली होती.

'त्याचं हास्यच तसं आहे,' फील्ड मार्शल मॉंटगोमेरी म्हणायचे, 'त्याला स्मित करताना पाहिलं की आपण त्याच्यावर पूर्ण विश्वास टाकतो.' 'टाईम' मासिकाने एकदा असे लिहीले होते की, या आईकचे स्मित 'मोनालिसा' सारखे प्रख्यात झाले होते ! मी एकदा असेही वाचले होते की, मोनालिसाचे स्मित हे उत्स्फूर्त स्मित नव्हते. ती फेशियल पाल्सीची Paisy चीपरिणती होती. पुढच्या वेळेला मी जेव्हा मोनाचं "इडियॉटिक स्मित पाहिलं तेव्हा चित्राची व माझी हवाच निघून गेली !

आयसेनहॉवरच्या या डायरीची सुरुवात २७ डिसेंबर १९३५ पासून होते. त्या वेळेला ते मनीलामधे होते. डग्लस मॅकार्थर तेव्हा फिलिपाइन्समध्ये सैन्य उभारत होते. तेव्हा आईक ४९ वर्षांचे व फक्त मेजर होते. भविष्य फारसं निश्चित नव्हतं.

एक समीक्षक तर फार पुढं गेला. या महाशयानी आईकची डायरी वाचून असे वक्तव्य केले की, मॉकियाव्हॅलीलासुद्धा आयसेनहॉवरनी राज्यनीतीबद्दल पाठ पाजले असते ! आता याउपर काय लिहायचे ?

डायरीमध्ये शेवटची नोंद मात्र मार्च '१४' १९६७ ची आहे. ही नोंद आईकने त्याच्या मृत्यूच्या आधी दोन वर्षे केली होती. पण ज्याचा इतिहासकार आता उदोउदो करीत आहेत, त्याच आईकचा भाव १९६२ मध्ये

फारच कमी होता. कोणती गोष्ट आधी करावी, कोणती गोष्ट होऊ शकणार नाही, अशा गोष्टीचे आईकला बरेच अंतर्ज्ञान होते. आईक 'सेन्स ऑफ प्रपोर्शन'ने तुडूब भरले होते. १९५१ मध्ये फ्रेंच लोक व्हिएतनाममध्ये लढत होते त्या वेळेलाच आईकने प्रश्न टाकला होता की, 'या दलदलीच्या प्रदेशात कोण जिंकणार?' १९५५ साली आईकच्या कॅबिनेटमधील सर्वांना वाटत होतं की, आता फॉर्मोसा स्ट्रेटमध्ये लाल चीनशी युद्ध होणार. पण आईक असे म्हणाले की, ज्या गंडांतराची आपल्याला भीती असते ती बहुतेक प्रत्यक्षात येतच नाहीत. (कृतीपेक्षा नेहमी विचारातच भीती जास्त दडलेली असते.) शिरच्छेद करणाऱ्या तलवारीपेक्षा टांगती तलवारच भयाण असते. बऱ्याच वेळा टांगती तलवार शिरच्छेद करीतच नाही.

आईक इतके प्रॅक्टिकल होते की त्यांच्या व्यक्तिमत्त्वात रंगच नाही असे काहीना वाटे!

परंतु आर्मी चीफ जॉर्ज मार्शल हा त्या 'काही'मधला नव्हता. त्याने आईकचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे जोखले व ३६६ सिनियर ऑफीसर्सना डावलून आईकला युरोपमधील सुप्रीम कमांडर करून टाकले! चर्चिलच्या फुग्याप्रमाणे फुगलेल्या अहंतेचा, द गॉलच्या मॅगॅलॅमेनियाचा, किंवा पॅटनचा 'विक्षिप्त स्वभाव दुसऱ्या कुणी सहन केला असता? हे सर्व आईकने सहन केले व ते कागदावर 'कॅथॉर्सिस' करू लागले! अमेरिकेचे नेव्ही ॲडमिरल अर्नेस्ट किंग यांच्यावर आईक फारच चिडत असे. 'याला मारल्याशिवाय युद्ध जिंकता येणार नाही. तो उद्धट आहे, कधीच सहकार देत नाही व दुसऱ्यावर नेहमीच वरचष्मा ठेवतो!' असे या व्यक्तिविषयी ते सारखे म्हणत असत.

कसलेही विधायक कार्य असेल तरच आईक खर्चाला मंजुरी देत असे. योग्य प्राधान्य नसलेल्या गोष्टीवर खर्च केला तर अमेरिकन अर्थव्यवस्था धोक्यात येईल, असे ते नेहमी म्हणत आणि त्यांनी तसे करून दाखवले. आठ वर्षांत मिलीटरी बजेटमध्ये त्यांनी फार कमी बदल केला.

आईक तसे काही नियमित लिहिणारे नव्हते! त्यामुळे अनेक व्यक्ति व घटनांच्या नोंदी इथे करायच्या राहिल्या आहेत. या डायरीतल्या नोंदी म्हणजे एक भावनाविरहित लिखाणाचा नमुना आहे. कान्सासच्या ज्या विस्तीर्ण पटागणावर आईक वाढले त्याच पटागणासारखं हे लिखाण व्यापक, विस्तीर्ण व सपाट आहे. डिटॅच्ड, ऑब्जेक्टिव्ह, बॅलॅन्स्ड.

'राग केल्याने काहीही साध्य होत नाही. राग करणारा स्वतःच अनेक बाबतीत मार खात असतो!' असा आईकचा दृष्टिकोन होता. चर्चिल म्हणत असे, 'The word perfection spells PARALYSIS.' तसेच आईकच्या दृष्टीने 'The word anger spells PARALYSIS.'

आईकची स्टेट ऑफ द युनियनची भाषणे ही नेहमीच निसर्गासारखी संतुलित आणि स्वच्छ असत. (म्हणजे प्रदूषणयुगाच्या आधी!)

त्याची पत्नी मॅमी व त्यांचा मुलगा जॉन या विषयी आईकने डायरीत काहीच लिहिले नाही!

आईकच्या त्या कान हालवणाऱ्या रुंद स्मितामागे काय काय दडलेलं होतं याचं एक नवीन कोडं ही डायरी वाचून इतिहासकाराना पडलं आहे.

—जे. एन्. पोंडा

---

रंगभूमी । सदानंद बोरसे

# हॅण्ड्स अप्

## रंजक रहस्यनाट्य

समजा, तुमचे आणि तुमच्या पत्नीचे भांडण झाले; तेही तुमच्या मधुचंद्राच्या काळात आणि तुमची पत्नी चिडून निघून गेली. 'जाते कुठे? येईल थोड्या वेळानं,' असा विचार करून तुम्ही स्वस्थ बसता. तीही थोड्या वेळाने खरेच परत येते. किंवा ती येतही नाही. तुम्ही अस्वस्थ होता. घरी किंवा तिच्या माहेरी चौकशी करता आणि त्या ठिकाणी ती सापडते. हे असे काही घडले तर त्याबद्दल आपल्याला मुळीच आश्चर्य वाटत नाही.

पण समजा—

रविराज प्रभू नावाचा एक जाहिरातकंपनीतील अधिकारी. आपल्या लाल रंगाच्या 'पद्मिनी' मोटारीतून एका हिलस्टेशनवर मधुचंद्रासाठी आलेला. त्याचे आणि त्याच्या बायकोचे—मरियाचे—भांडण झालेले. ती घरातून निघून गेलेली. दोन दिवस ती न आल्यामुळे रविराज काळजीत पडलेला आणि अशा वेळी त्याला एक ख्रिश्चन फादर—फादर डिसूझा—भेटायला आलेला. फादरने 'मिसेस प्रभू' म्हणून एका भलत्याच पण सुंदर मुलीला आणलेले. रविराज म्हणतो, 'ही माझी मरिया नाही.' तर ती फादरबरोबर आलेली सुंदर तरुणी त्याच्या गळ्यात पडून म्हणते, 'मीच तुझी मरिया!'

समजा, असे काही घडले; तर?

तर तुम्ही गोंधळात पडाल. हे काही तरी लफडे दिसतेय, अशी तुमची स्वाभाविक प्रतिक्रिया.

रविराजचीही प्रतिक्रिया अशीच. 'ही तरुणी माझी बायको नसताना असं नाटक का करतेय? मग माझी बायको कुठं आहे? माझ्या इस्टेटीवर याचा डोळा आहे म्हणावं, तर माझ्याजवळ इस्टेटच नाही. मग माझ्याकडून याना काय हवय? माझी पॉलिसी—हां, माझी दीड लाखाची पॉलिसी; पण त्यासाठी मी मेलो पाहिजे. म्हणजे ही बाई माझा खून तर—बाप रे! आणि तो फादर डिसूझा ता तिचा साथीदार असला पाहिजे.' या विचाराने झपाटलेल्या रविराजने पोलिसांना फोन केला आणि इन्स्पेक्टर यादव हजर झाले. पण निःपक्षपातीपणे चौकशी करणाऱ्या यादवानी उलटा पेच टाकला, 'या खऱ्या मिसेस प्रभू; पण तुम्हीच हे नाकारत नसाल कशावरून? कारण काहीही असू शकेल. म्हणजे तुमचे डोके ठिकाणावर नसल्यामुळे तुम्ही त्या मिसेस प्रभू असल्याचे कबूल करीत नाही.' रविराज हादरलेला. त्यातच इन्स्पेक्टर नसताना ती तरुणी आणि तिचा साथीदार फादर डिसूझा ऊर्फ रंगा रविराजला उघडपणे धमकावत होते. त्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी रविराजने टाकलेला प्रत्येक पेच त्याच्याच अंगलट येत होता, गुंता वाढत होता. आणि या सगळ्याचा कळस म्हणूनच की काय, रविराजच्या हातून एक खरा आणि एक खोटा खून घडला. हताशपणातून रवि-

राज जवळजवळ वेडा व्हायला आलेला;त्याला शेवटचा धक्का म्हणून त्याच्या लक्षात आले की, आपण ज्याच्यावर विश्वास टाकला ते इन्स्पेक्टर यादवही त्या तरुणीला सामील आहेत. हे लक्षात आल्यानंतर मात्र रविराजचा स्वतःवरचा ताबा गेला आणि—

या भयंकर कटाचा शेवट काय ते नाटकात प्रत्यक्ष पाहण्यातच गंमत आहे.

इंडियन नॅशनल थिएटरने रंगमंचावर आणलेल्या ' हँड्स अप् ' (जाहिरातीत आणि तिकिटावर 'हॅन्डस् अप्' असे चुकीचे उच्चाररूप का छापले आहे ?) या वसंत कामतलिखित नाटकाचे हे कथानक किंवा अर्ध-कथानक. 'कॅच मी इफ् यू कॅन्' या मूळ कृतीवर आधारलेले हे नाटक. गुन्हेगारावर प्रचंड मानसिक दबाव आणून एका बेसावध क्षणी त्याच्याकडून त्याने केलेल्या गुन्ह्याची कबुली घेणे, अशा कथासूत्रावर आधारित ' इकरार ' नावाचा चित्रपट दोन-तीन वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. तेच कथासूत्र आणि तशाच समांतर पण संख्येने कमी व्यक्तिरेखा असलेले हे नाटक. एखाद-दुसरा अपवाद वगळता गेल्या काही दिवसामध्ये मराठी रंगभूमीवर पानचट प्रहसनांचे तण आणि मनोविश्लेषण या समस्याप्रधान नाटकाच्या आवरणाखाली उगवणाऱ्या बोजड, अवजड शरीरांची भू–छत्रे महापूर वाढली होती. या सगळ्या गर्दीत कथेला प्राधान्य मिळालेले, ते कथानकही बऱ्यापैकी बांधून ठेवणारे असलेले आणि असे असूनही केवळ त्यावरच अवलंबून न राहता एक रेखीव बांधेसूद प्रयोग पाहिल्याचे समाधान मिळवून देणारे ' हँड्स अप् ' म्हणजे एक सुखद धक्काच होता. एक रहस्यनाटय असूनही सबंध नाटक हास्याचे फवारे उसळवत चालते; पण नाटकातील विनोदाना हसत असतानाही नाटकातील रहस्याचा ताण कमी तर होत नाहीच, उलट त्याची तीव्रता सतत वाढती राहते. एका जीवघेण्या कटात अडकलेल्या असहाय माणसाची तडफड आणि त्या कोंडलेल्या जिवाच्या सर्व वाटा बंद करून त्याच्याशी मांजराप्रमाणे खेळणारे कटवाले, हा विरोध त्या विनोदाच्या पार्श्वभूमीवर अधिकच उठून दिसतो, हेच या नाटयसंहितेचे यश आहे.

नाटकाचे दिग्दर्शक आहेत सदाशिव अमरापूरकर. नाटकाची निवड करताना त्यात घडणाऱ्या घटनांमध्ये पुरेसे रहस्य भरलेले असल्याची काळजी घेतल्यामुळे ती रहस्यमयता वाढविण्यासाठी रंगीबेरंगी अंधार-प्रकाशाचे खेळ अथवा अवाजवी वाटणारे गूढ संगीत-चमत्कार असल्या उसन्या कुबड्या न वापरताच अमरापूरकरांनी नाटकातील घटनाचा वेग,त्यामुळे निर्माण होणारा ताण आणि वाटणारी उत्कंठा शेवटपर्यंत कायम राखली आहेत. पात्रांची अतिशय योग्य निवड, हाही त्यांच्या कौशल्याचा आणखी एक भाग.

नाटकामध्ये रविराजचे मुख्य पात्र रंगवले आहे अविनाश मसुरेकरांनी. गडाचे सगळे दोर कापले गेल्यानंतरचा असहाय्य कोंडमारा मसुरेकरांनी सुरेख दाखवला; पण बरेचदा त्यांच्या कामातील अतिनाटयामुळे ही असहाय्यता बावळटपणाकडे झुकत होती. आपल्या गळयात पडू पाहणाऱ्या बाईला झुरळाप्रमाणे झटकणे, ती अत्यंत गंभीरपणे धमक्या देत असताना तबल्याचा ताल वाजवून तिच्या धमक्यांची टर उडवणे इत्यादी अनेक गोष्टी त्यांच्या समर्थ अभिनयाची उदाहरणे म्हणून सांगता येतील. तोतया मरियाची भूमिका भक्ती बर्व्यांनी केली आहे. क्षणाक्षणाला रंग पालटणारी ही तोतया मरिया आणि तिच्या तावडीतून सुटकेसाठी धडपडणारा रविराज म्हणजे रंगमंचावरची जुगलबंदीच होती. सदाशिव अमरापूरकर स्वत. इन्स्पेक्टर यादव झाले होते. रंगेल, बेरकी आणि तक्रार करणाऱ्यावरही विश्वास न ठेवणारा, छिद्रान्वेषी,संशयी इन्स्पेक्टर त्यांनी झकास उभा केला. या सगळ्यांना फादर डिसूझा झालेल्या राजा नाइकांनी आणि मामा फाटकाचे काम करणाऱ्या कलाकाराने अतिशय सुरेख साथ दिली.

प्रभाकर पारकरांनी उभारलेला हिल स्टेशनवरचा बंगला प्रेक्षणीय होता.

या सगळयाच्या साघिक प्रयत्नातून उभे राहिलेले हे नाटक पाहिल्यानंतर बरेच दिवसानी एक सुरेख रंजक प्रयोग पाहिल्याचे समाधान मिळाले.

□


## नवीन दाखल झालेली पुस्तके

१. संपूर्ण अरेबियन नाईटस्–(६ भाग)–कृष्णशास्त्री / विष्णुशास्त्री चिपळूणकर
२. योद्धा शेतकरी–विजय परुळकर
३. साता उत्तराची कहाणी–(कादंबरी)–ग. प्र. प्रधान
४. चकवा (कादंबरी)–सुभाष भेण्डे
५. चि. सौ. कां. चंपा गोवेकर (नाटक)–रत्नाकर मतकरी
1. **The Magus–(Novel)–John Fowles**
2. **The Collector–(Novel)–John Fowles**
3. **Eating People is Wrong–(Novel)–Malcolm Bradbury**
4. **Portrait of The Artist As A Young Dog–(Stories)–Dylan Thomas**
5. **Tropical Asia–(A Time–Life–illustrated Book)**
6. **Eurasia–(A Time–Life illustrated Book)**

□ Your search for good books ends at the 'Phoenix !'

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ४११ ०३०

राजकपूर, 'मॅन' देसाई, प्रकाश मेहरा व 'भारत' मनोजकुमार यांच्या फिल्मी पूर्वजांचे जन्मशताब्दीनिमित्त स्मरण :

# सेसिल बी दमिल्

## ग्रेटेस्ट शोमन ऑन दि अर्थ

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी, मिरज

जागतिक चित्रपटाच्या इतिहासात विराट भव्यता, सुपरहिट्स्, बॉक्स ऑफिस यशाचा शुअर फायर फॉर्म्युला देणारा व लोकांना काय हवं याचा नाडी-वेत्ता, धंदेवाईक व कमाल यशस्वी चित्रपट दिग्दर्शक व निर्माता सेसिल बी दमिल् याची चालू वर्षात जन्मशताब्दी साजरी झाली. मायावी चित्रपटसृष्टीच्या घाऊक स्वप्नाच्या गिरणीचा भाडवलदार-ठेकेदार हा किताब ह्या अचाट माणसाने पन्नास वर्षांपूर्वीच मिळवला. त्याला जाऊनही २२ वर्षे झाली. व्ही. शांताराम-सारख्यांनामुद्धा 'नवरंग' चित्रपटाच्या प्रारंभी 'गिमिक्' वजा नाटक करून, 'दो आँखे बारह हाथ' चे वेळी माझे डोळे शेकले गेले व त्या काळात मी जे 'रंग' उघळलेले पाहिले, त्याचे चित्रीकरण म्हणजे 'नवरंग,' अस प्रस्तावनावजा नमन करण्याची प्रेरणा व्हावी यामागे सेसिल बी दमिल् असावा काय ? सेसिल बी दमिलने चित्रपटाना जी देणगी दिली ती चार्ली चॅप्लिन्, डेव्हिड लीन्, फ्रॅन्सिस कोपोल, दादासाहेब फाळके किंवा सत्यजित रे याच्या जातीची नाही, ती सवंग स्वरूपाची आहे, तितकीच अत्यंत यशस्वी अशीही आहे. यशाचा फॉर्म्युला म्हणजे काय, तर त्याचे उत्तर सेसिल बी दमिलचे चित्रपट. मनमोहन देसाई आपण इतक्या 'हिट' दिल्या म्हणून "बोटे" मोजतो, सेसिल बी दमिलने दिलेल्या हिट्स मोजण्यासाठी सात मनमोहन देसाईंच्या हाताची बोटे लागतील ! दमिलने एकूण ७० चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शन केले; पैकी ६८ 'हिट्स्' होत्या ! (अबब !) स्वप्नांची कारखानदारी त्याने एवढी परिपूर्ण केली की, प्रचंड खर्च व महाप्रचंड नफे याची त्याने घातलेली गणिते व फॉर्म्युले आजही 'मिसाल' बनून 'हॉलीवुड' मध्ये कायम आहेत.

त्याचा पहिला चित्रपट 'स्क्वॉमॅन' हा एका नाटकाचे चित्रपटीकरण होते. हा चित्रपट १९१३मध्ये झळकला. १९१३ सालीच दादासाहेब फाळक्यांनी पहिला भारतीय चित्रपट तयार केला (राजा हरिश्चंद्र). त्याच साली चार्ली चॅप्लिनने 'स्टेज' सोडून "चित्रपटां"च्या मयसृष्टीत प्रवेश केला. सेसिलची कामगिरी फाळके किंवा चॅप्लिन यांच्याप्रमाणे एका संस्थापकाची किंवा कोलंबसाची नव्हती, परंतु 'सेट' वर मेगॅफोन वापरणे, सेटवर दिग्दर्शकाच्या नावाने खुर्ची टाकणे, कॅमेऱ्याच्या चमत्कारिक हालचाली वगैरे 'गिमिक्स्' करून भव्य (तरीही दडपणारे व तकलादू) चित्रपट काढणारा म्हणून दमिलने आपले घराणे स्थापन केले. सर्वच लोकप्रिय गोष्टींना नाके मुरडणारे 'इंटुक' जगभर आढळतात; परंतु कला किंवा एखादा कलाप्रकार जिवंत राहतो तो तिकिट-खिडकीवर तोबा गर्दी करणाऱ्यांच्या सहकार्यावरच ! 'ग्रेटेस्ट शो ऑन् दि अर्थ', 'किंग ऑफ किंग्ज्' 'टेन कमाड्मेंट्स्' ह्या चित्रपटानी जो इतिहास घडविला तो रेकार्ड स्वरुपाचा आहे. आजही हे चित्रपट 'हाउस फुल्ल'च्या बोर्डावरची धूळ झटकायला लावतात ! सेसिल बी दमिल्स् × × × असे नाव वाचले की कोट्यवधी चित्रपट-चाहते करमणूकनगरीचा 'व्हिसा' खरेदी करण्याकरता थिएटरकडे वळतात. भारतात अशी 'गॅरंटी' देणारी नावे किती आहेत ?

सेसिल ब्लाउंट दमिलचे पूर्वज डच होते. त्याचा जन्मदाता विख्यात नाट्यनिर्माता होता. सेसिल 'बँकर' होता; पण ३१ व्या वर्षी तो चित्रपट-दिग्दर्शक बनला. तेही आईने मेट्रो गोल्डविनच्या 'सॅम'कडे शब्द टाकला म्हणून ! त्याने आपला 'बँकर'चा अनुभव (म्हणजे फायदेशीर गुंतवणूक) चित्रपटांना चपखलपणे लावून 'हॉलीवुड'ला सोन्याच्या खाणीचे स्वरूप प्राप्त करून दिले आणि १९२५ नंतर अमेरिकेत दुसरी 'गोल्ड रश' सुरू झाली. बँकाना चित्रपटात पैसे गुंतविण्यास मनधरणी करून त्यात यशस्वी ठरलेला पहिला महाभाग म्हणजे दमिल! (आणि इकडे भारतात महाबँकेने चित्रपटनिर्मितीसाठी कर्ज देणे बंद केल्याचे कळले ! ) दमिलने चित्रपटनगरी न्यूयॉर्कच्या बाहेर काढून हॉलीवुडला नेली ती कायमचीच ! उलट आपल्याकडे पुणे, कोल्हापूर व नाशिकमधून चित्रपट मुंबईच्या धाई-गर्दीत गेले ते गेलेच ! हॉली'वुड' हे अमेरिकेतच नव्हे तर जगाच्या चित्रपटाचे अभयारण्य बनले, ते एवढे की, हॉलीवूड ही आजही एक 'लिजंड' व 'मिथ' आहे ! चित्रपटाचा वैकुंठ आहे ! 'इनटॉलरन्स' व 'टेन कमांडमेंट्स्' (प्रथम आवृत्ती) ची निर्मिती भव्य प्रमाणावर झाली ती हॉलीवुडलाच ! चॅप्लिनने 'गोल्ड रश' काढला तोही इथेच! वाढता वाढता हॉलीवुड एवढे वाढले की, एर्न्स्ट लुबिटश् म्हणाला की, 'मी पॅरिस (फ्रान्स) पाहिले आहे आणि पॅरिस (पॅरॅमाँउंट स्टुडिओमधले) ही पाहिले आहे. मला पॅरॅमाँउंट स्टुडिओमधले पॅरिस अधिक आवडले!' ह्या विधानावरून दमिलची सेट्स् उभे करण्यातली उधळपट्टी ध्यानात यावी ! पॅरॅमाँउंटमध्ये असताना सेसिलने सेक्सची मजेशीर सूचक फोडणी दिलेले 'मेल ॲण्ड फिमेल', 'ॲडम्स् रिब' व 'व्हाय् चेंज युवर वाइफ ?' अशा हिट कॉमेडीज्-करिता बाथरूमचा सीन, साबणाचे फुगे व बुडबुडे, नायिकेच्या शरीरावर ठराविक ठिकाणी आवरण म्हणून वापरून 'धडकन्' सिच्युएशन्स् प्रथम निर्माण करून दाखविल्या त्या सेसिलने ! 'बबल व्हेल'चा निर्माता म्हणून तो गाजला !

आर्टी (कलात्मक) चित्रपटवाले 'पडीक' चित्रपट हे त्यांच्या कलेचे व्यवच्छेदक लक्षण मानतात ! तो एक भंपकपणा आहे. कारण एकादा सत्यजित रे २५-२६ वर्षे टिकतो तो

त्याचे चित्रपट कुठे तरी 'हाउसफुल्ल' चालतात म्हणूनच.! चित्रपट हा अमेरिकन बिलियन डॉलर्स बिझिनेस आहे. हे अचूक ओळखून सेसिलने सिनेमाला येणाऱ्याना काय हवे असते याचा एक विस्तारपूर्ण 'रेसिपी' तयार केला व खमंग पदार्थांचे वाटप केले ! जॉन फोर्ड व आल्फ्रेड हिच कॉकने देखील असेच परंतु अधिक कला-प्रोटीन असलेले फॉर्म्युलेच वापरले, हे नाकारता येणार नाही. 'बहुजन सुखाय' म्हणून चित्रपट निघाला पाहिजे तरच तो चालतो, मग ते नेत्रसुख का असेना.! एक कृतक् 'हिरॉइझम' ताई-भाऊ भावनिक पाझर आणि आक्रस्ताळा नाटकीपणा हे मसालेदार गुणधर्म वापरून त्याने ६८ हिट्स् दिल्या. हा विक्रम नाही तर काय आहे ? शिवाय ही फिल्म 'जेनर्' तयार करताना त्यात त्याने 'हजारो पात्रे' वापरण्याचा पायंडा पाडला. के. असिफचा 'मुगले आझम्' कॉलेजियन् वाटला तर सेसिलचा भव्यपणा पोस्ट-डॉक्टोरल म्हणायला हवा !

आता 'लास्ट टँगो इन् पॅरीस', 'लिपस्टिक' सांप्रदायिक पोर्नोवजा तरीही कलापूर्ण चित्रपट पचविणाऱ्यांनी सेसिलच्या चित्रपटाविरुद्ध 'बोहाडा' सुरू केला आणि अमेरिकेत निर्मात्याची 'स्वयं-सेन्सॉरशिप' जन्माला आली. मग धार्मिक-नैतिक-ऐतिहासिक अशा 'फॉर्म' कडे सेसिल वळला. अल्बर्ट मोरावियाच्या 'घोस्ट अॅट नून'-मधील चित्रपट-निर्माता म्हणतो की, 'आपण पौराणिक-ऐतिहासिक चित्रपट काढू या, कारण कमी कपड्यातील बायकाची उत्तान दृश्ये त्यात 'सहज' खपून जातात!' पहिला रंगविलेला चित्रपट-(म्हणजे एकेक फ्रेम रंगवून) काढला तो सेसिलने-त्याचे नाव 'जोन, द वुमन'.

१९२३ मध्ये सेसिलने 'टेन कमांडमेंटस्' (प्रथम आविष्करण) काढले. १९५६ मध्ये दुसरे काढले. मोझेस एकीकडे 'आज्ञा' स्वीकारतो व तिकडे 'गोल्डन काफ' जवळ सेक्स ऑर्गि (लैंगिक मेळावा) भरलेला दाखविलेला खपला, कारण बायबलमध्ये तसे म्हटले आहे म्हणूनच ! त्याच सुमारास 'रीप द वाइल्ड विंड,' 'किंग ऑफ किंग्ज' (म्हणजे ख्रिस्त), 'ग्रेटेस्ट शो ऑन दि अर्थ' (सर्कस-त्यातूनच 'मेरा नाम जोकर' ला सर्कसची पार्श्वभूमी लाभली असावी !) आले व गाजवून गेले. उधळपट्टीवजा सर्वच गोष्टीचा अतिरेक हे सेसिलचे सूत्र यशस्वी चित्रपटाची 'किल्ली' बनून गेली ! हॉलीवुडचे हे वेड मुंबई-मद्रासच्या 'फॉलीवुड-पर्यंत' पसरले ! भव्यतेसाठी भव्यता हे सेसिलचे ध्येयवाक्य होते. मग कथा, 'थीम', अभिनय गचपणात का पडेनात ! त्यातच धार्मिक व बायबलवर आधारित चित्रपट काढले की जागतिक मार्केट पक्के होते, हा भाग वेगळाच. वैश्विक आवाहन म्हणतात ते शेवटी धर्माच्या माध्यमातूनच साधते, हे धंदेवाईक सेसिलला समजते ते कित्येक राजकारण्यानाही कळू नये ना !

तरीही अशी जिवंत पैशाची खाण असलेल्या चित्रपट-निर्मात्या सेसिलची एकाही मोठ्या टीकाकाराने आवर्जून दखल घेतलेली नाही. कारण त्या काळात चित्रपट-परीक्षणे हे काम साहित्यिक-परीक्षणे लिहिणारेच करत ! म्हणजे चित्रपट व कादंबरी ही एकाच मापाने मोजली जात. सेसिलची भव्य प्रसिद्धीमोहीम, रिंगमास्टरप्रमाणे भडक वाटणारी 'शोमनशिप' तत्कालीन शेळपट टीकाकारांना 'चुभत' असे ! मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर आलेल्या समीक्षकाच्या नव्या पिढीने सेसिलचे पुनरुज्जीवन केले ! (जसे झार निकोल्स सेकंडला आता संत ठरविण्यात आले आहे तसे !) अॅन्ड्रू सॅरिसने लिहिले की, 'इतक्या विलक्षण तन्मयतेने गोष्ट सांगणाऱ्या वेल्हाळातील सेसिल हा अखेरचा होता !'

आपले ७० चित्रपट 'प्रेक्षकार्पणमस्तु' ह्या भावनेने काढणारा सेसिल आज जिवंत नसला तरी तो चित्रपटीय भव्यतेचे 'दुसरे नाव' होऊन बसला आहे ! ऑस्कर अॅवॉर्ड्स्, प्रतिभाशाली व प्रसिद्ध वगैरे बिरुदे भूषविणारे पाच वर्षांनी विस्तृत होतात; रात्रीचा काजवा सकाळी वळवळणारा कीटक वाटावा असे पारोसे होऊन जातात; अशा वेळी आजही २५ वर्षांपूर्वी निघालेला 'टेन कमांडमेंटस्' गर्दी खेचतो, हीच काळाने सेसिलला वाहिलेली श्रद्धांजली नाही काय ? चित्रपटीय मिथ् (mith) होऊन राहिलेला सेसिल आज काळाची कसोटी वापरायची तर 'क्लासिक' बनलेला आहे ! ☐

# चित्रपटाबाहेर....

## ३३ कोटी देव + एन. टी. रामाराव

आपला देश म्हणजे खरोखरच एक अस्ताव्यस्त पसरलेलं अवाढव्य म्युझियम आहे. अगदी काचेवर नाक टेकवून बघण्यालायक. अगडबंब व अर्थहीन अशा सांस्कृतिक विसंगती आणि वैचित्र्य इथे हरघडी मौजूद आहे. देवादिकांचे वेड आणि त्याबरहुकूम रचलेल्या खुळचट कल्पनानी तर अगदी कळस (मंदिराचा नव्हे !) गाठला आहे आणि याच वेडगळ कल्पनांनी या म्युझियमच प्रशस्त दालन व्यापलं आहे.

भारतीय मनाला (किंवा जनालो म्हणूया) न गवसलेल्या प्रश्नांना उत्तर म्हणून की काय, या देशात जागोजाग शेंदूर फासलेल्या दगडांची प्रश्नचिन्हं (?) अगदी मैलाच्या दगडाप्रमाणे विखुरलेली आहेत. 'सांस्कृतिक वारसा' आणि 'धार्मिक अधिष्ठान' लाभलेल्या या दगडांनी, विविध पंथ, धर्म, वंश व जातीप्रमाणे नानाविध आकार व उपरे पोशाख परिधान केले आहेत.

या सृष्टीचा निर्माता कोण, म्हणून अचंबा व्यक्त करून कायमच तोंडात बोट घातलेल्या भारतीय माणसानं आपलं डोस्कं नेहमीच या दगडाच्या पायाशी घातलं आहे. तरी पण या सृष्टीचा निर्माता देवच असावा असं जरी तात्पुरतं गृहीत धरलं तरी या देवांचा निर्माता हा बनेल व बेरकी भारतीय माणूसच असावा, असं सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा देणारी घटना नुकतीच दक्षिण भारतात घडली.

दक्षिणेतील पाडूमारू या एका दुर्गम अशा खेड्यात एक देऊळ बांधण्यात आलं असून त्या देवळातील त्या पवित्र वगैरे जागेवर बसण्याचं भाग्य उपलब्ध अशा तेहतीस कोटी देवांपैकी कोणालाही लाभलेले नाही,

तर ती जागा व्यापली आहे तेलगू–तामिळ चित्रपटातील एन. टी. रामाराव, या फिल्मी हिरोनं ! या चंदेरी ताऱ्याचे त्याच्या जिवंतपणीच इथे देऊळ उभारलं आहे. नुकताच रामाराव यांचा वाढदिवस या ठिकाणी साजरा करण्यात आला. त्या वेळी लाखो चित्रपटशौकीन (आता भाविक म्हणणं भाग आहे ) श्रीकृष्णाचा हा नवा अवतार बघण्यास हजर होते !

'अवतारकल्पना ' अशीच भारतीय मनाच्या कोंदणातून मिळालेली एक देणगी आहे इथे स्वत.ला कोण 'भगवान ' म्हणून घेईल आणि कोण कोणाला 'बनवेल ' याचा थाग–पत्ताच लागत नाही.

आपले तेहतीस कोटी देव, ते सहासष्ट कोटी जनतेचे राजकीय पुढारी आणि फिल्मी आकाशात झगमगणारे तारे हे सर्व या 'अवतार-कल्पने'चे बळी आहेत आणि मग या 'अवतार–कल्पने'भोवती वलय निर्माण करण्यासाठी तयार केलेल्या दंतकथा आणि अक्षरवाङ्मय यांना तर ऊतच आला आहे.

तसे आमचे देव, राजकीय पुढारी आणि फिल्म-तारे यांच्यात बरेच साम्य आहे. या तिघांच्या भोवती वलय आहे. देवांना भरपूर भक्तगण आहे, पुढाऱ्यांना 'फॉलोअर ' आहेत तर फिल्म ताऱ्याना 'फॅन्स ' आहेत ! 'गॉसिप ' आणि 'अफवा ' ही दोन्ही कारणं याचं वलय टिकविण्यास कारणीभूत आहेत.

देवानी तर 'गॉसिप्स ' बाबत आघाडीच मारलेली आहे. ब्रह्मा–सरस्वती, शिव–गंगा, पार्वती, इंद्र तर मूलतःच लंपट त्यामुळे इंद्र-अहल्या, इंद्र – अरुणा, श्रीकृष्णाला तर १६००८ बायका, शिलावती–शाकरा आणि अय्यप्पा या केरळ व तामिळनाडूत पूजल्या जाणाऱ्या देवाचा जन्म याबाबत पुरेपूर 'गॉसिप ' आमच्या धर्मग्रंथात अथवा पुराण –कथातून पेरलेलं आहे. ( त्या वेळी आजच्यासारखं God & style ' असं मासिक निघत असावं आणि आजचेच, गॉसिप-लेखक असावेत).

अर्थातच या देवांनंतर 'गॉसिप्स ' मध्ये नंबर लागतो फिल्मी ताऱ्यांचा ! चित्रपट जगताची सारी गंमतच न्यारी असल्यामुळं त्यांत 'ताऱ्याचा' कितपत दोष आहे हे कळणं मुश्कील आहे.

इथे चांगला पांढरास्वच्छ, पडदा असताना आपण त्याला 'रुपेरी पडदा' म्हणतो ! वलयांकीत झगमगाटापायी आपण आकाशातील सर्व तारे–तारकाच खाली आणल्या आहेत. मग असंही गाणं ऐकायला मिळतं, 'स्वर्ग लोक में एक है इन्दर, पृथ्वीपर है तीन इन्दर ! जय जितेंदर, जय धर्मेंदर, जय जय हो राजेंदर !' शिवाय इंद्राच्या दरबारात जेवढ्या अप्सरा असतील त्याहून किती तरी जास्त 'अप्सरा ' इथे मौजूद आहेत.

देवाचे भक्तगण 'भजन, कीर्तन ' ऐकण्यात गुंग होतात, तर या तारे–तारकांचे 'फॅन्स ' त्यांचे चित्रपट आणि फिल्मी - गीत ऐकण्यात दंग होतात. सोवळं नेसून, भस्म लावून हिंडणारे भक्तगण जसे आहेत तसे तारे–तारकांप्रमाणे केसांची ठेवण व पोषाख घालून फिरणारे 'फॅन्स ' ही गल्लोगल्ली आहेत ! मात्र या तारे–तारकाची देवळं तेवढी नव्हती.आता या कामाला एन. टी. रामाराव याच देऊळउभारून सुरुवात झाली आहे !

देवापेक्षा आता या तारे–तारकांना आणि चित्रपटांना अधिक भाव मिळत आहे ! गणपतीउत्सवातील चित्रपटाची चलती, सत्यनारायणाच्या पूजेच्या दिवशी 'शोले ' अथवा तत्सम हिंदी चित्रपटांतली गाणी सत्यनारायणाच्या पोथीपेक्षा कान देऊन ऐकली जातात, हे भाव वधारल्यचंच लक्षण आहे !

चित्रपटाचा प्रभाव न थोपविता येणारा आहे, हे सर्वांनाच मान्य आहे. 'अलबेला ' सारखा चित्रपट पाहून थिएटरात पडद्यावर पैसे फेकणारे पाहून ही माणसं चित्रपटात किती गुग होतात, हे लक्षात येतं !

पण जेव्हा चित्रपट आणि राजकारण, चित्रपट आणि देवादिकांच्या कल्पना यांची एकत्र जुळणी केली जाते तेव्हा आणखीनच अघटित घडतं ! 'संपूर्ण रामायण ' अशा नावाचा चित्रपट दरवर्षी निघतो. 'राजकपूर'सारखा धंदेवाईक पहिल्यांदा 'राजकपूरच्या बाहुपाशात नर्गिस ' असं आर. के. बॅनर दाखवतो आणि नंतर पृथ्वीराज कपूर शंकराच्या पिंडीवर फुल वाहताना दाखवतो. भक्तगण आणि 'फॅन्स ' या दोघांनाही समाधान देतो !

चित्रपटात कृष्णाची मूर्ती दिसली की, 'गुपचूप' नमस्कार करणारे 'भक्तगण–कम्–फॅन्स् ' जसे आहेत तसे 'जय संतोषी माँ ' सारख्या चित्रपटांना स्वत.च्या चपला चित्रपटगृहाबाहेर काढून जाणारे आहेत !

आपले चित्रपट म्हणजे आधीच मायावी, फसवं, बेगडी जीवन उभं करणारे, त्यात देवादिकाच्या भाकड कथा यांची सरमिसळ करून, 'ट्रिक सीन्स ' द्वारे हे सर्व 'विश्वासार्ह ' वाटावं अशा पद्धतीनं उभं केलं जातं. भारतीय मनावर कोरलेल्या त्या 'कपोलकल्पित' कल्पनांना भरभक्कम पुरावा असल्याच्या थाटात हे फिल्मी निर्माते या भाकड कथांना आपल्या चित्रपटांतून उभं करतात ! परिणामी भक्तगण ही वाढतात व फॅन्सही वाढतात !

दक्षिणेकडील चित्रपटनिर्मात्यानी तर याच सर्व गोष्टीचा कल्पकतेनं वापर केला आहे. द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाचे अध्वर्यु अण्णा दुराई यांनी तर चित्रपट आणि राजकरण यांची अशी काही सरमिसळ केली की, परिणामी एम. जी. रामचंद्रन हे आजही मुख्यमंत्रीपदावर आहेत. त्यांनी चित्रपटातून 'एम. जी. आर. ' प्रतिमा 'अन्यायअसंतोषाविरुद्ध लढणारा ' अशी जोपासली. झालं ! 'एम. जी. आर. ' याना फॅन्स मिळाले आणि द्रमुक पक्षाला 'कार्यकर्त्यां 'चं भक्कम पाठबळ मिळालं.'

एकीकडे चित्रपट–राजकारण यांची सरमिसळ तर दुसरीकडे हिंदू देवदेवतांच्या कथा या दक्षिणेतील चित्रपट-निर्मात्यानी चित्रपटांतून उभ्या केल्या. श्रीकृष्णावर तर अक्षरशः शेकडो चित्रपट निघाले आहेत. एन. टी. रामाराव हेही चित्रपटातून 'श्रीकृष्णाची' भूमिका साकार करणारे हिरो !

श्रीकृष्णाशिवाय एन. टी रामाराव अमिताभ स्टाइल गुप्तहेराच्या भूमिकाही करतात. दुष्टांचा नायनाट करणारा, अन्यायाविरुद्ध 'खाकी पोषाखात' झुंज देणारा इन्स्पेक्टर अशा काही भूमिका सातत्याने अनेक चित्रपटातून केल्यामुळे रामाराव सततच फॅन्सच्या गराड्यात अडकलेले दिसतात.

'एम. जी. आर.' याचे 'फॅन्स क्लब' जसे चित्रपटगृहापाशी चित्रपटाच्या रांगेत उभे राहणाऱ्याना सोडालेमन सिगारेट 'सर्व्ह ' करण्याचं काम अगदी भक्तिभावपूर्वक करत होते तसंच एन. टी. रामाराव याचे आध्रामध्ये 'फॅन्स क्लब' आहेत. ( देवाला प्रसाद

पोचविण्यासाठी जसा 'पुजारी' नामक दलाल लागतो तसंच हे आहे.)

'एम जी. आर.' यांचे तर वीस हजार फॅन क्लब होते. त्यांना मुख्यमंत्रीपद मिळालं. कारण ते राजकीय पुढारीही होते; पण रामाराव पुढारी नसल्यामुळं म्हणा, त्यांचं जिवंतपणी देऊळ उभारलं गेलं आहे. 'स्क्रीन'चे संपादक बी. के. करंजिया म्हणतात त्याप्रमाणे रूडॉल्फ व्हॅलेन्टिनो, जेम्स डीन आणि एल्व्हीस प्रिस्ले यानाही जे भाग्य मिळालं नाही ते एन. टी. रामाराव यांना मिळालं आहे!

पुढच्या वर्षी एन. टी. रामाराव यांना साठ वर्षं पूर्ण होत असून त्या वेळी 'पोइमारु' या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पाच लाख भक्त जमतील, असा विश्वास या देवळाच्या पुजाऱ्याने व्यक्त केला आहे. त्याच्या या अंदाजाबद्दल कोणी शंका व्यक्त करेल असे आता तरी वाटत नाही!

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे या सृष्टीचा निर्माता देव आहे, असं गृहीत धरलं तरी या देवांचा निर्माता हा भारतीय माणूस असावा, हे खरं वाटतं ते यामुळंच! शिवाय 'स्टार' या कल्पनेचा निर्माताही चित्रपटाचा निर्माताच आहे.

आपणच निर्माण केलेल्या देवकल्पनेत भारतीय माणसाची गत 'हातचं सोडून पळत्यामागं धावणाऱ्या माणसासारखी झाली आहे' या 'स्टार' कल्पनेला जन्म देणाऱ्या चित्रपटनिर्मात्याची गतही तशीच झाली आहे आणि या निर्मात्याकडे मात्र आता पुजाऱ्याची भूमिका आली आहे, हेही खरंच!!

—बिलंदर

## बांगलादेश : पृष्ठ २ वरून

मतदानापूर्वी दोन दिवसपर्यंत अवामी लीगचा जोर होता. डॉ. कमाल हुसेन विजयी झाले तर देशात लष्करी कायदा जारी होईल अशा अफवा पसरल्या होत्या. अवामी लीगचा विजय झाला तर लष्कर सत्ता हाती घ्यावयास कचरणार नाही असा इशारा लष्करी नेत्यांनी दिला होता. काही लष्करी नेत्यांनी तर निवडणुकीपूर्वीच सत्ता हाती घेण्याची धमकी दिली होती. ऑगस्ट १९७५ पासून बांगलादेशच्या जनतेला शांतता लाभलेली नव्हती, रक्तपात, अस्थिरता, लष्कराचे लहान-मोठे उठाव व कट यामुळे स्थिर सरकार फार काळ अस्तित्वात नव्हते. झिया उर रहमान देशाला स्थिर राजवट देणारे असे वाटू लागले होते, एवढ्यात त्यांचा खून झाला तेव्हा आणखी अस्थिरता व अशांततेपेक्षा सध्याची राजवट बरी असा विचार करून मतदारांनी सध्याची राजवट चालू ठेवण्याच्याच बाजूने कौल दिला असावा असे दिसते.

अवामी लीगच्या निष्ठेबद्दलच शंका घेणारा व त्या पक्षाची बदनामी करणारा प्रचार सत्तारूढ पक्षाने केला होता. पक्षाच्या अध्यक्ष हसीना वाजेद यांचे भारताशी संबंध आहेत. अवामी लीगचा विजय झाला तर देश भारताच्या प्रभावाखाली जाईल असे चित्र निर्माण करण्यात आले होते त्याचा मतदारांवर परिणाम होऊन शेवटच्या दोन दिवसांत त्यांचा कल सत्तार यांच्या बाजूस झुकला असावा असे मानले जाते, बांगलादेश नॅशनल पार्टीच्या भित्तीपत्रामध्ये हसीना वाजेद याना 'शेख हसीना गांधी' असे खोडसाळपणे संबोधण्यात आले होते डॉ. कमाल हुसेन यांना मत द्या असा प्रचार सीमा भागात भारताच्या हद्दीतून ध्वनिक्षेपकावरून करण्यात येत आहे असा प्रचारही बांगलादेशची वृत्तपत्रे व रेडिओवर करण्यात आला होता अवामी लीग उमेदवाराच्या देशनिष्ठेबद्दलची शंका निर्माण करावी हा या विपर्यस्त प्रचारामागे उद्देश होता. त्यात काहीही तथ्य नव्हते; पण मतदारांवर काही प्रमाणात त्याचा परिणाम झाला असणे शक्य आहे. ढाक्यामधील भारतीय हायकमिशनच्या कचेरीने भारतीय दृष्टीतून लाउडस्पीकरवरून प्रचार होत असल्याच्या आरोपाचा इन्कार केला; पण त्याला फारशी प्रसिद्धी मिळाली नाही आणि मूळ आरोपाचाच ठसा लोकांच्या मनावर राहिला

परदेशी वकिलातींनी वास्तविक निवडणुकीपासून अलिप्त राहायला हवे; पण सौदी अरेबिया व पाकिस्तानच्या वकिलातींनी सत्तार यांना आम्ही अनुकूल आहोत हे काही बांगलादेश वृत्तपत्रांना कळविले. त्यासंबंधी बातम्याही प्रसिद्ध झाल्या. मतदारांवर त्याचाही परिणाम झाला असणे शक्य आहे.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या पायावर देशाची उभारणी करण्याचा शेख मुजीब यांचा प्रयत्न होता; पण अतिरेकी इस्लामी गटांनी मुजीब यांची हत्या करून सत्ता हाती घेतली आणि धर्माधिष्ठित सत्ता स्थापन केली. पाकिस्तान, सौदी अरेबिया, इराण या देशात कडव्या इस्लामी गटांच्या हाती सत्ता आहे. बांगलादेशचे स्वाभाविकच त्यांच्याशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित झाले. सत्तार याच्या विजयाने हेच धोरण पुढे चालू रहाणार आहे.

निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर बनावट मतदानाचे प्रकार झाल्याची अवामी लीगच्या नेत्यांची तक्रार आहे त्यामुळे या राजवटीत खुल्या निवडणुका होतील यावर त्यांचा आता विश्वासच राहिलेला नाही. निवडणुकांच्या मार्गाने आपल्या हाती सत्ता येईल असे त्यांना वाटत नाही. अवामी लीगला बांगला देशामध्ये संसदीय लोकशाही प्रस्थापित करायची आहे. शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने सत्तासंक्रमण अशक्य झाल्यावर त्या पक्षालाही सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचाच अवलंब करावा लागेल!

सत्तार यांच्या निवडणुकीनंतर सत्तार आणि लष्करप्रमुख मेर्शाड यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता दिसत आहे देशाचे संरक्षण एवढेच लष्कराचे काम. देशाच्या राजकारणात किंवा राज्यकारभारात लष्कराला हस्तक्षेप मी करू देणार नाही असे अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरच्या पहिल्याच भाषणात सत्तार यांनी स्पष्टपणे सांगितले; पण त्यानंतर थोड्याच दिवसांनी केलेल्या भाषणात देशाचे भवितव्य घडविण्यास लष्कराकडे अधिक महत्त्वाची भूमिका येते, असे मत लष्करप्रमुख मेर्शाड यांनी व्यक्त केले. लष्कराची पकड बसविण्याच्या त्यांच्या प्रयत्नातून सत्तार यांच्याशी त्यांचा संघर्ष अटळ दिसतो. □